उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



महिला दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!



आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर
आपली भूमिका योग्य
पद्धतीने साकारणाऱ्या,
आई, बहीण, पत्नी,
लेकीस महिला दिनाच्या
शुभेच्छा!

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १६९ ■ नाशिक, शनिवार, दि. ८ मार्च २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# राज्यासमोर आर्थिक संकट, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त

## आर्थिक पाहणी अहवाल, सोमवारी अर्थसंकल्प

**मुंबई :** महाराष्ट्राच्या २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.३ टक्के दराने वाढण्याचा अंदाज आहे. जो भारताच्या अंदाजे ६.५ टक्के जीडीपी वाढीपेक्षा जास्त आहे. सध्याच्या किमतींवर राज्याचे सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) ४५.३१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे, तर वास्तविक जीएसडीपी २६.१२ लाख कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. राज्यासमोर आर्थिक संकट वाढले, महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला आहे. कर्ज आणि व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नसल्याचे समोर आले आहे.

कृषी आणि संलग्न क्षेत्रातील वाढ (८.७ टक्के), उद्योग (४.९ टक्के) आणि सेवा (७.८ टक्के) व्यापक विस्तार दर्शवते. महाराष्ट्र देशाच्या आर्थिकदृष्ट्या आघाडीवर आहे, भारताच्या



एकूण जीडीपीमध्ये १३.५ टक्के योगदान देत आहे. दरम्यान, दरडोई उत्पन्न २०२३-२४ मध्ये २.७८ लाख रुपयांवरून २०२४-२५ मध्ये ३.०९ लाख रुपयांपर्यंत वाढण्याचे निश्चित आहे, जे संपूर्ण राज्यात उत्पन्नात वाढ दर्शवते. जून २०२४ मध्ये सुरू झालेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे सरकारने सामाजिक कल्याणाला, विशेषतः /-...४

### काय आहे आर्थिक सर्वेक्षण अहवालात

● २०२४-२५ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित तर महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित ● कर, महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ४ लाख १९ हजार ९७२ कोटी आणि ७९ हजार ४९१ कोटी अपेक्षित ● २०२४-२५ मध्ये जानेवारीपर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा ३ लाख ८१ हजार ८० कोटी रुपये ही रक्कम अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७६.३ टक्के आहे. ● अर्थसंकल्पीय अंदाजानुसार २०२४-२५ करिता राज्याचा महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित आहे. ● स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे. ● सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट २.४ टक्के, महसुली तूट ०.४ टक्के असणार आहे. ● २०२४-२५ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठीचा वार्षिक कर्ज आराखडा ७ लाख २५ हजार कोटी रुपये असणार आहे. त्यामध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा २४.४ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग' क्षेत्राचा हिस्सा ६०.७ टक्के आहे.

# नार-पार-गिरणा प्रकल्पांना मान्यता

## मुख्यमंत्री १.३० लाख घरांना मोफत वीज



**मुंबई :** महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी मिळाली असून, यामुळे नाशिक आणि जळगाव जिल्ह्यांतील हजारो शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा लाभ होणार आहे. हा प्रकल्प राज्यातील दुसरा मोठा नदीजोड प्रकल्प असून, यामुळे ४९,५१६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. विशेषतः कळवण, देवळा आणि मालेगावसह जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांना याचा फायदा होईल. तसेच वैनगंगा ते नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत ३१ नवीन धरणांचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच ४२६ किलोमीटरचा कालवा निर्माण करण्यात येणार आहे. या नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भाचे चित्र बदलणार असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विदर्भात दुष्काळ दिसणार नाही. तसेच यामुळे पाण्यावरून होणारे प्रादेशिक वाद उद्‌भवणार नाहीत. नदीजोड प्रकल्पांमुळे पाणीटंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळेल. या प्रकल्पांसाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबवली जाणार असून, शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याकरिता शासन कटिबद्ध आहे. हा प्रकल्प म्हणजे राज्यातील जलसंपत्तीचे प्रभावी व्यवस्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे. राज्यातील सिंचन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी अशा महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. विधानसभेत राज्यपाल यांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या उत्तरादरम्यान मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली.

महाराष्ट्र सरकारने 'सूर्यघर मोफत वीज योजना' प्रभावीपणे राबवून देशभरात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या योजनेंतर्गत ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळणार असून, त्यांना अतिरिक्त वीजनिर्मिती केल्यास ती सरकार खरेदी करणार आहे. त्यामुळे ग्राहक वीज देयकांच्या चिंतेतून मुक्त होणार आहेत. या योजनेंतर्गत आतापर्यंत १ लाख ३० हजार घरांवर रूफटॉप सोलर पॅनल बसवण्यात आले आहेत. राज्य सरकारने या ग्राहकांना १००० कोटींपेक्षा अधिक अनुदान (सबसिडी) दिले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या २० लाख घरांमध्ये थेट सोलर पॅनल बसवले जाणार आहेत. त्यामुळे या घरांना वीज देयक येणार नाही. हे पाऊल स्वच्छ ऊर्जा आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने महत्त्वाचे ठरणार आहे. यासोबतच, राज्य सरकारने केंद्राच्या धर्तीवर एक नवीन योजना आणण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील ७० टक्के /-...४

### घरगुती वीजग्राहकांसाठी मोठा दिलासा

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी दर १७ टक्क्यांनी कमी केले जात आहेत. यामुळे ९५ टक्के घरगुती ग्राहकांना वीजदर कपातीचा थेट लाभ मिळणार आहे. ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवले, तर दिवसा वापरलेल्या विजेवर १० टक्के सवलत मिळेल. राज्यात सौरऊर्जा आणि ऊर्जा क्षेत्रातील क्रांतीमुळे ऊर्जा विभागाला २१ प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## महत्त्वाचे

### पंकजा मुंडेंनी घेतली धनंजय मुंडेंची भेट

**बीड :** भाजप आमदार पंकजा मुंडेंनी काल धनंजय मुंडेंची भेट घेतली. सातपुडा बंगल्यावर दोघांमध्ये दीड तास चर्चा झाली. गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे आजारी आहेत. धनंजय मुंडे यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यांच्यावर रिलायन्स रुग्णालयात उपचार सुरू होते. या आजारामुळे त्यांना सलग दोन मिनिटेही व्यवस्थित बोलताही येत नव्हते. त्यांनी स्वत: ट्विट करत याबद्दलची माहिती दिली होती. धनंजय मुंडे यांची प्रकृती बरी नसल्याने भेट घेतल्याची चर्चा आहे.

### ज्येष्ठ अभिनेत्री प्रेमा साखरदांडे यांचं निधन

**मुंबई :** . सुलभा देशपांडे यांची



धाकटी बहीण आणि ज्येष्ठ अभिनेत्री प्रेमा साखरदांडे यांचे मुंबईत वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. प्रेमा साखरदांडे यांनी मुंबईतल्या माहिमच्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. प्रेमा यांच्या पार्थिवावर रात्री उशिरा दादरच्या शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या मुली आहेत. प्रेमा साखरदांडे यांच्या निधनामुळे मराठी इंडस्ट्रीवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांनी प्रेमा साखरदांडे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

### पार्लेजीच्या कार्यालयावर आयकर विभागाचा छापा

**मुंबई :** मुंबईतील प्रसिद्ध बिस्किट उत्पादक कंपनी पार्ले प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या विलेपार्ले येथील कार्यालयावर आयकर विभागाने शुक्रवारी छापा टाकला. यासोबतच गुजरातमधील कच्छ येथील कंपनीच्या इतर कार्यालये आणि कारखान्यांवरही तपासणी सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या छाप्यांचे नेमके कारण अद्याप उघड करण्यात आलेले नाही. मात्र, केंद्रीय तपास संस्थेच्या आर्थिक शाखेच्या पथकाने कंपनीच्या आर्थिक व्यवहारांची बारकाईने तपासणी सुरू केली आहे. ही तपासणी परकीय मालमत्ता युनिट आणि आयकर विभागाच्या तपास शाखेद्वारे करण्यात येत आहे.

### दिल्लीतील महिलांना २५०० रुपये मिळणार

**नवी दिल्ली :** दिल्लीतील भाजप सरकार ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला समृद्धी योजना सुरू करणार आहे. या योजनेंतर्गत पात्र महिलांना दिल्ली सरकारकडून दरमहा २५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल. जेणेकरून त्यांची आर्थिक स्थिती सुधारता येईल. ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा कमी आहे आणि ज्या कर भरत नाहीत त्यांना या योजनेचा फायदा होईल. या योजनेचा लाभ १८ ते ६० वयोगटातील महिलांना मिळेल ज्यांच्याकडे नोकरी नाही आणि ज्यांना इतर कोणतीही सरकारी आर्थिक मदत मिळत नाही.

### सांगलीत मालवाहतूक बोगी रुळावरून घसरली

**सांगली :** सांगलीत मोठी रेल्वे दुर्घटना घडली आहे. सांगलीच्या मिरजेत मालवाहतूक बोगी रुळावरून घसरल्याची घटना घडली आहे. मिरजमध्ये दुसऱ्यांदा बोगी रुळावरून घसरल्याची घटना घडली आहे. यामुळे मिरज, पुणे, मुंबईकडे जाणारी रेल्वे वाहतूक दोन तासांपासून ठप्प झाली होती. मालवाहतूक बोगी रुळावरून घसरल्यानंतर लोकांची एकच गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. मिळालेल्या माहितीनुसार, सांगलीतील मिरज रेल्वे स्टेशन गुड शेडजवळ मालवाहतूक करणारी बोगी काल शुक्रवारी रुळावरून घसरल्याची घटना घडली आहे. काल शुक्रवारी दुपारी सुमारास घटना घडल्यानंतर रेल्वे अलर्ट करणारा भोंगा वाजला. त्यानंतर रेल्वे प्रशासन आणि लोहमार्ग पोलिसांनी गुड शेड रेल्वे मार्गावर धाव घेतली.

# कामांना स्थगिती द्यायला मी उद्धव ठाकरे आहे का?

## फडणवीस यांची टोलेबाजी

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळातील काही निर्णयांना स्थगिती दिल्याची व त्यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी सुरू करण्यात आल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात आहे. तसेच तानाजी सावंत यांच्या कार्यकाळातील तब्बल ३१९० कोटींच्या कामांना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याचंही बोलले जाते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करत या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच विकासकामांना स्थगिती द्यायला मी काय उद्धव ठाकरे आहे का? असा सवाल करत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

महायुती सरकार सत्तेत आल्यापासून आपण १०० दिवसांचं मिशन हातात घेतलं. तालुक्याच्या पातळीवरील कार्यालय आहेत, त्यांना आपण सात प्रकारच्या गोष्टी सांगितल्या. तेथील कार्यालयातील रेकॉर्ड, लोकांना भेटण्याच्या वेळा यांसह वेगवेगळे सात कामे आपण त्यांना दिले. त्यांना आपण एक टार्गेट दिलं, काय काय काम करायचं? तसेच १०० दिवसांच्या निकषावर किती काम केली याचा आढावा देखील आम्ही घेत आहोत. १०० दिवसांच्या कामाचं प्रत्येक विभागाने एक टार्गेट फायनल केलं आहे. तसेच याचं प्रेझेंटेशन देखील त्यांनी केलं आहे, यामध्ये ज्यांनी उत्तम काम केलं आहे, त्यांचा सत्कार सरकार करेल. यातील अनेक विभागांनी खूप चांगले काम केलं. असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.



# तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा

## अमेरिकन न्यायालयाने फेटाळली याचिका

**नवी दिल्ली :** २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणा याचा आणीबाणीचा अर्ज अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. त्याने त्याच्या प्रत्यार्पणाला विरोध केला. त्याने आपल्या आणीबाणीच्या याचिकेत असा युक्तिवाद केला होता की, जर त्याला भारतात प्रत्यार्पण केले गेले तर तिथे त्याचा खूप छळ केला जाईल. यामागे त्याने दिलेले कारण म्हणजे तो पाकिस्तानी वंशाचा मुस्लिम आहे, ज्यामुळे तो भारतात सुरक्षित राहणार नाही.

तहव्वूर राणाचे वकील आता मुख्य न्यायाधीश रॉबर्ट्स यांच्यासमोर अपील करतील. पाकिस्तानी वंशाचे कॅनेडियन नागरिक असलेल्या राणा यांनी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे असोसिएट जस्टिस आणि नवव्या सर्किटच्या सर्किट जस्टिससमोर आपत्कालीन स्थगिती अर्ज दाखल केला होता. /-...४

### हरियाणात हवाईदलाचे लढाऊ विमान कोसळले

**नवी दिल्ली :** भारतीय हवाईदलाच्या जग्वार या लढाऊ विमानाचा हरियाणातील पंचकुला येथे अपघात झाला आहे. हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, अंबाला येथील हवाई अड्ड्यावरून प्रशिक्षण उड्डाण घेतल्यानंतर विमानात काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे सदर लढाऊ विमानाचा अपघात झाला. सुदैवाने वैमानिक यात वाचला आहे. तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर वैमानिकाने विमान लोकसंख्या नसलेल्या निर्जनस्थळी विमान नेले. या घटनेनंतर पंचकुला येथील गावात भीतीचे वातावरण आहे. अपघात होण्याआधी वैमानिकाने पॅराशूटच्या आधारे सुरक्षित बाहेर पडण्यात यश मिळवले. माहितीनुसार, हवाईदलाने सांगितले की, सायंकाळी नियमित प्रशिक्षण उड्डाण घेतल्यानंतर सदर अपघात घडला.

# आम्ही गरिबांना ३२ लाख कोटी दिले : पंतप्रधान मोदी

## गुजरातमध्ये नमो रुग्णालयाची पायाभरणी

**सिल्व्हासा :** आम्ही मुद्रा योजनेंतर्गत कोणत्याही हमीशिवाय गरिबांना ३२ लाख कोटी रुपये दिले. ज्यांनी आम्हाला शिवीगाळ केली त्यांना ३२ लाखांत किती शून्य असतात हेही माहीत नाही, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. सिल्व्हासा येथे त्यांनी ४५० खाटांच्या नमो रुग्णालयाचे उद्घाटन केले आणि ६५० खाटांच्या क्षमतेच्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी केली. विमानतळ ते लिंबायत असा त्यांचा जवळजवळ ३ किमी लांबीचा रोड शो पार पडला. या काळात त्यांच्या स्वागतासाठी दर १०० मीटरवर ३० प्लॅटफॉर्म बांधण्यात आले. यानंतर ते जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी लिंबायतमधील निलगिरी मैदानावर पोहोचले. त्यांनी कार्यक्रमस्थळी अनेक /-...४





# सत्ताधाऱ्यांवर हक्कभंगाच्या आरोपानंतर विरोधकांचा सभात्याग

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्य राष्ट्रवादी काँग्रेसचे बीडमधील नेते धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची माहिती सभागृहाला न दिल्यावरून विरोधकांनी चांगलाच गोंधळ घातला. ही माहिती सभागृहाला अगोदर न दिल्याने हक्कभंग झाल्याचा आरोप करत, सत्ताधारी बहुमताच्या जोरावर सभागृहात ऐच्छिक पद्धतीने नियम बनवून वागत असल्याचा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला.

बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर हत्या झाली. याची माहिती गृह मंत्रालयाला नव्हती का? असा सवाल करत मुख्यमंत्र्यांनी ही माहिती लपवली. तसेच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची माहिती सभागृहाला न कळवता थेट माध्यमांना दिली. हा सभागृहाचा अपमान असून, याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात हक्कभंग आणणार, असा इशारा विरोधकांनी दिला होता. काँग्रेस नेते नाना पटोले यांच्यासह विरोधक चांगलेच आक्रमक होते.

सभागृहाचे कामकाज सुरू होताच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना पक्षाचे नेते आमदार अनिल परब यांनी काल केलेल्या विधानावरून विधान परिषदेच्या सभागृहात गोंधळ झाला. त्यानंतर विधानसभेच्या सभागृहात विरोधकांनी एकी दाखवत सत्ताधाऱ्यांना धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या माहितीवरून घेरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहविभागाच्या खात्याचा कारभार आहे. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची संपूर्ण माहिती गृहखात्याला नसणार असे होणार नाही, असे म्हणून ही माहिती लपवली गेली. धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची माहिती सभागृहाला देण्याऐवजी ती माध्यमांना अगोदर दिली. ही माहिती सर्वांत प्रथम सभागृहाला द्यायला हवी होती. पण तसे न केल्याने सभागृहाचा अपमान झाला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, काँग्रेस नेते नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांनी केला.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात आज दोन महिन्यांचे पैसे

## मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

**मुंबई :** राज्यामधील महिलांसाठी महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली. विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर करण्यात आलेली ही योजना अल्पावधीमध्येच लोकप्रिय झाली. या योजनेंतर्गत दर महिन्याला महिलांना दीड हजार रुपये दिले जातात. विधानसभा निवडणुकीमध्ये लाडकी बहीण योजना महायुतीसाठी 'गेमचेंजर' ठरली. प्रचारामध्ये या योजनेचा जोरदार वापर करण्यात आला. दरम्यान, आज (दि.८) जागतिक महिला दिन साजरा करण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी खास 'गिफ्ट' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून अनेक योजना करण्यात येत आहे. अनेक सवलतींसह आता राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दोन महिन्यांचे हप्ते एकाच दिवशी दिले जाणार आहे. याबाबत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे. महिला दिनाचे औचित्य साधून फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना एकत्र देणार आहोत, अशी घोषणा आदिती तटकरे यांनी केली आहे. मुंबईमध्ये महिला व बालविकास मंत्री आदिती



तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी लाडक्या बहिणींबाबत महायुती सरकारने घेतलेला निर्णय जाहीर केला आहे. त्या म्हणाल्या की, खात्यात थेट वितरित करणार आहोत. २ कोटी ५२ लक्ष महिलांना हा हप्ता वितरित करण्यात येणार आहे. एकही महिना असा नाही की महिलांना लाडक्या बहीण योजनेचा हप्ता मिळाला नाही. ८ मार्चचं उद्दिष्ट समोर ठेवून आम्ही फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता देणार आहोत, अशी घोषणा मंत्री आदिती तटकरे यांनी केली आहे.

# साडेतीन लाखांची लाच घेताना भूमिअभिलेखचा शिपाई जाळ्यात

## निफाड येथे लाचलुचपतची कारवाई

**नाशिक : प्रतिनिधी**

जमिनीच्या हद्दी खुणा दाखवून नकाशा काढून देण्याच्या मोबदल्यात भूमिअभिलेखचे अधीक्षक आणि स्वत:साठी चार लाखांची लाच मागून साडेतीन लाख रुपये स्वीकारताना भूमिअभिलेखच्या शिपायास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. नितेंद्र काशीनाथ गाढे,



रा. निफाड असे या शिपायाचे नाव आहे. तक्रारदार यांच्या मावशीची मौजे दिक्षी, तालुका निफाड येथे शेतजमीन असून, ही शेतजमीन मोजणीसाठी त्यांनी भूमिअभिलेख कार्यालय निफाड /-...४

## महत्त्वाचे

### वरदविनायक मंदिरामध्ये १४ पासून हरिनाम सप्ताह

**सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी लागणार**

**नाशिक : प्रतिनिधी**

पंचवटीतील हिरावाडी येथील वरदविनायक मंदिर वर्धापन दिनानिमित्त दि.१४ मार्च २०२५ पासून सुरुवात होत आहे. २० मार्चपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात काकडा भजन, गाथा भजन, हरिपाठ, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी लागणार आहे. वै. रामनाथ महाराज शिलापूरकर यांचे प्रेरणेने मधुकर महाराज सूर्यवंशी यांच्या कुशल मार्गदर्शनाने व परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने नाम सप्ताह होत आहे. सप्ताहास महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी लागणार आहे. त्यात हभप रामनाथ महाराज सोनवणे, कैलास महाराज वाघ, दत्ताजी महाराज वाघ, शब्दप्रभू गंगाधर महाराज कवडे, पंढरीनाथ महाराज डांगे, शारदाताई जाधव, गीताताई घोरवडकर यांची उपस्थिती लाभणार आहे. २० मार्च रोजी कैलास महाराज वेलजाळी यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होईल. त्यानंतर प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भव्य दिव्य स्वरूपात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी वारकरी बांधवांनी, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकनाथ महाराज सांगळे, मधुकर सूर्यवंशी, विष्णू कुडके, विजू मोरे, किशोर खैरनार, नितीन मोरे, ज्ञानेश्वर पवार, सागर नाईक व आयोजन समितीतर्फे केले आहे.

### विद्यार्थिनींनी निर्भीडपणे तक्रार करावी : अतुल डहाके



**पंचवटी : वार्ताहर**

महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे छेडछाडीसारखे प्रकार झाल्यास विद्यार्थिनींनी ११२ डायल करून मदत मागावी किंवा पोलिस ठाण्यात तक्रार करावी, असे आवाहन म्हसरूळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल डहाके यांनी केले. मुख्यमंत्री शंभर दिवस कृती आराखडा अंतर्गत पोलिस आयुक्त यांच्या आदेशान्वये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून म्हसरूळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील के. के. वाघ ॲग्रीकल्चर कॉलेज, सरस्वतीनगर येथे उपक्रम राबविण्यात आला. यावेळी वरीष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके यांनी ॲग्रीकल्चर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना नवीन कायद्याची माहिती व इतर कायदेशीर तरतुदी नियम अटींबाबत तसेच डायल ११२ बाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी म्हसरूळ पोलिस ठाण्यातील महिला पोलिस अंमलदार व दामिनी पथक तसेच सुमारे २५० ते ३०० विद्यार्थिनी व महिला शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### शालेय विद्यार्थ्यांना छावा ऐतिहासिक चित्रपट मोफत



**नाशिकरोड : प्रतिनिधी**

बालाजी सोशल फांउडेशन, नाशिक रोड, संस्थापक अध्यक्ष कैलास मुदलियार यांच्या वतीने व्हिजन अकॅडमी इंग्लिश मीडिअम स्कूल इयत्ता पाचवी ते आठवीच्या सुमारे चारशे विद्यार्थ्यांना छावा हा ऐतिहासिक चित्रपट मोफत दाखवण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांचे स्वराज्याप्रति असणारे प्रेम, त्यासाठी त्यांचे बलिदान विद्यार्थ्यांना समजावे, विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल कुतूहल निर्माण होऊन त्या प्रति आदर निर्माण व्हावा, या हेतूने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. चित्रपट पाहताना विद्यार्थी भारावून गेले होते. जय भवानी, जय शिवाजीच्या जयजयकाराने चित्रपटगृह दुमदुमून निघाले होते. या वेळी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### रस्ता सुरक्षा अभियानात उत्कृष्ट कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव



**पंचवटी : वार्ताहर**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियानात जनजागृती करून उत्कृष्ट कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचा शहर पोलिस आयुक्तालयाच्या वतीने गौरव करण्यात आला. राष्ट्रीय रस्ता सुरक्षा २०२५ अभियान १ ते ३१ जानेवारीदरम्यान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत 'स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्रॅम' उपक्रमांतर्गत मनपा उर्दू शाळा, बडी दर्गा, नाशिक, सिंधू सागर अकॅडमी, जुनी पंडित कॉलनी, नाशिक ,विधी महाविद्यालय, मराठा विद्या प्रसारक समाज, गंगापूर रोड यांनी सहभाग घेऊन रस्ता सुरक्षा याबाबत जनजागृती केली. त्यामुळे या अभियाना सहभागी होऊन उत्कृष्ट कार्य केलेल्या विद्यार्थ्यांना पोलिस उपायुक्त मुख्यालय व वाहतूक चंद्रकांत खांडवी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलिस आयुक्त शहर वाहतूक शाखा सुधाकर सुरडकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी वाहतूक शाखा युनिट दोनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिवाणसिंग वसावे, पोलिस हवालदार सचिन जाधव तसेच शिक्षक वर्ग उपस्थित होते.

# मूल्यमापन चाचणी वेळापत्रकाला मुख्याध्यापक संघाचा विरोध

## शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन; शिक्षकांपुढे पेचप्रसंग

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी २ परीक्षेचे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने(एससीई आरटी)जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार दिनांक ८ ते २५ एप्रिल या कालावधीत ही चाचणी परीक्षा घेण्यात येणार आहे. राज्य मंडळाच्या सर्वच शाळांतील परीक्षा एकाच वेळी घेण्यात येणार असल्याने या वेळापत्रकावर नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघ तसेच जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी आक्षेप घेतला आहे.**



याबाबतचे निवेदन माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी प्रकाश अहिरे यांना देण्यात आले आहे. परीक्षा एप्रिल अखेरीस होणार असल्याने या वेळापत्रकावर शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच स्तरातून आक्षेप घेण्यात आला असून, इतक्या उशिरा संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा झाल्यास दिनांक १ मे रोजी निकाल जाहीर करण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होऊन शाळा १ मे रोजी निकाल कसा जाहीर करणार, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे. एससीइआरटीने दिलेल्या सूचनांनुसार शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षेसाठी प्रथम भाषा, गणित, आणि तृतीय भाषा इ. विषयांच्या प्रश्नपत्रिका शासनाच्या वतीने पुरविण्यात येणार असून, इतर व्यवस्थापनाच्या शाळांनी सर्व प्रश्नपत्रिका शाळास्तरावर तयार करावयाच्या आहेत.

याप्रसंगी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख यांनी वरील परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत व्यथा मांडून सदर परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करून शाळांना निकाल तयार करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी मुख्याध्यापक संघाच्या वतीने केली आहे.

याप्रसंगी जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी देखील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. या परीक्षेच्या वेळापत्रकाबाबतचे निवेदन माध्यमिक शिक्षण विभागाने त्वरित शासनास पाठवून ग्रामीण भागात पाणीटंचाई, वाड्या-वस्त्यांवरून शाळेत येणारी मुलं या बाबीचा विचार करून वेळापत्रकात बदल करावे, अन्यथा आंदोलन पुकारले जाईल. या वेळी मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख, उपाध्यक्ष प्रदीप सांगळे, विस्तार अधिकारी पी. यू. पिंगळकर, रवींद्र मोरे, मोहन चकोर, भागीनाथ घोटेकर, सी. पी. कुशारे, सचिन पगार, ए. के. खालकर, नीलेश ठाकूर, भाऊसाहेब शिरसाठ, चंद्रशेखर सावंत, सुभाष दळवी, एस. के. देवरे, प्रा. बी. ए. बंगाळ, बी. के. नागरे, डॉ. अनिल माळी, मनोज वाघचौरे,एम.डी.काळे मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.



**सिडको : शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी डी. जी. सूर्यवंशी यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करताना शिवसेना राज्यसंघटक विनायक पांडे, ऋतुराज पांडे, शिवसेना महानगर संघटक सचिन बांडे, उपमहानगरप्रमुख संदेश फुले, संदीप कानडे, चेतन दाते, नीलेश कुसमोडे आदी छायाचित्रात दिसत आहेत. (छाया : दिलीपराज सोनार)**

## सूर्यवंशी यांच्या नियुक्तीबद्दल सिडको कार्यालयात जल्लोष

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**शिवसेनेच्या (उबाठा गट) नाशिक जिल्हाप्रमुखपदी माजी नगरसेवक डी. जी. सूर्यवंशी यांची नियुक्ती जाहीर झाल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांसह शिवसैनिकांनी त्यांच्या भोळे मंगल कार्यालयानजीक असलेल्या संपर्क कार्यालयाबाहेर फटाक्यांची आतषबाजी करीत आणि गुलालाची उधळण करत जल्लोष केला.**

मेनरोड येथील संत गाडगे महाराज पुतळ्याजवळ देखील नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना राज्यसंघटक विनायक पांडे, ऋतुराज पांडे, शिवसेना महानगर संघटक सचिन बांडे, उपमहानगरप्रमुख संदेश फुले, संदीप कानडे, चेतन दाते, नीलेश कुसमोडे, दत्ता क्षीरसागर, शिवा चव्हाण, बाबा चव्हाण, रवी राऊत, दिनेश साठे, कमलाकर नागपुरे, बल्ली गायकवाड आदी उपस्थित होते.

## इन्स्पायर मॉडेल निवडीत राज्यात नाशिकचा डंका

**नाशिक : प्रतिनिधी**

**इन्स्पायर अवॉर्ड मानक २०२४-२५ निवड यादीत सर्वाधिक मॉडेलची निवड नाशिक जिल्ह्याची झालेली असून नाशिक जिल्ह्याने निवड यादीत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.**

नुकतीच इन्स्पायर अवॉर्ड मानक निवड यादी इन्स्पायर अवॉर्डच्या वेबसाइटवर जाहीर झाली असून, यात राज्यात प्रथम क्रमांकावर नाशिक जिल्ह्याने बाजी मारली आहे. राज्यातील निवड झालेल्या एकूण मॉडेल्समधून नाशिक जिल्ह्याचे सर्वाधिक ३१७ मॉडेल निवडले गेलेले आहेत. इन्स्पायर नोंदणीत राज्यात नाशिक जिल्ह्याने द्वितीय क्रमांक मिळवला होता.

माध्यमिक शिक्षण विभाग जि.प. नाशिकचे शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील, सर्व तालुक्यांचे इन्स्पायर मानक, तालुका समन्वयक, सहसमन्वयक, उपसमन्वयक, जिल्हा समन्वयक, नाशिक जिल्हा विज्ञान अध्यापक संघ सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी, सर्व मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक यांच्या अथक मेहनतीने हे यश मिळवता आले. माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## इस्त्रोनंतर मनपा विद्यार्थ्यांची लवकरच नासा केंद्राला भेट

### गुणवत्तेवर निवड होणार

**नाशिक : प्रतिनिधी**



**महापालिकेच्या शाळांमध्ये स्मार्ट स्कूलद्वारे डिजिटल क्रांती आणल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून मनपा शिक्षणाधिकारी बापूसाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा क्र. १८ च्या विद्यार्थ्यांनी बंगळुरु येथील इस्त्रोच्या कार्यालयाला भेट देऊन अंतराळ शास्त्राचा अभ्यास केला. त्यानंतर आता मनपाच्या शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना थेट अमेरिकेच्या नासाची सफर घडवली जाणार आहे.**

काही दिवसांपूर्वीच मनपा शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची सफर घडवली. त्यानंतर जगविख्यात अंतराळ एजन्सी नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा) ला भेट दिली जाणार आहे. याकरिता मनपाच्या शाळातील आठवीच्या विद्यार्थ्यांची मेरिट टेस्ट घेतली जाईल. त्यातील गुणवत्तेनुसार पंचवीस विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. त्यांना नासाची सफर घडवली जाईल. जगभरातील अंतराळप्रेमींसाठी मनासाफला भेट देणे स्वप्न असते. मनपा शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करून देणार असून, यासाठीचा येणारा सर्व खर्च करणार आहे. पहिल्या शंभर विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना नासाची सफर घडवली जाईल. दरम्यान, याआधी विद्यार्थ्यांनी इस्त्रोला भेट दिल्यानंतर तेथे रॉकेटचे उड्डाण, अवकाशात सॅटॅलाइट उपग्रह कसे सोडले जातात, त्याचा कंट्रोल जमिनीवरून कसा केला जातो, तसेच अवकाशातील विविध उपग्रहांपर्यंत एंटीनाद्वारे पाहिजे तेव्हा कसे पोहोचले जाते, आजपर्यंत इस्त्रोने सोडलेले विविध उपग्रह व यापुढे इस्त्रोचे असलेले प्रोजेक्ट असे विविध बाबींचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. रॉकेट प्रक्षेपण कसे केले जाते याचे प्रात्यक्षिकही इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी करून दाखवले. तत्पूर्वी मनपा विद्यार्थ्यांची दिल्लीवारी घडवली जाईल. विद्यार्थ्यांना संसद व राष्ट्रपती भवनची सफर घडवली जाणार आहे.

> मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची लवकरच अमेरिकेच्या अंतराळ एजन्जी नासाला भेट दिली जाणार आहे. त्यादृष्टीने तयारी सुरु केली असून, याआधी विद्यार्थ्यांनी इस्त्रोच्या केंद्राला भेट दिली. विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ मोहिमांची माहिती मिळावी आणि याचा त्यांना फायदा व्हावा, हा यामागचा उद्देश आहे.
>
> **–बापूसाहेब पाटील,** शिक्षणाधिकारी, मनपा

## वीज देयक थकबाकी वसुली अत्यावश्यक

### दत्तात्रय पडळकर : महावितरणची आढावा बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

**महावितरणच्या सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांना चांगली व अखंडित वीज सेवा देणे हे आपले सर्वांचे आद्यकर्तव्य असून, दिलेल्या सेवेची १०० टक्के वसुली व थकबाकी दरमहा वसुली करणे सुद्धा अत्यावश्यक आहे, त्यामुळे या आर्थिक वर्षात वीजग्राहकांना दिलेल्या प्रत्येक युनिटच्या वीज देयकाची वसुली अत्यावश्यक असून, वीजग्राहकांना अखंडित वीज सेवा देण्यासाठी वीज बिल वसुलीला पर्याय नाही, असे प्रतिपादन महावितरणचे कार्यकारी संचालक(वितरण) दत्तात्रय पडळकर यांनी केले.**

महावितरणच्या जेलरोडवरील ऊर्जा व्यवस्थापन आणि प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात महावितरणच्या नाशिक, अहिल्यानगर व मालेगाव मंडळातील सर्व अभियंत्यांची व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावप्रसंगी ते बोलत होते.

मार्च महिन्यामध्ये नाशिक परिमंडळामध्ये वसुलीसाठी पथके तयार करून वापरलेल्या विजेचे देयक न भरणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा नियमानुसार खंडित करण्याचे तसेच सोबतच वीजपुरवठा खंडित केलेल्या थकबाकीदार ग्राहकांच्या जोडणीची तपासणी करून, थकबाकी न भरता अनधिकृत वीज जोडणी आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश कार्यकारी संचालक पडळकर यांनी दिले. बैठकीला महावितरणच्या नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, मुख्य महाव्यवस्थापक दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंते ज्ञानदेव पडळकर व जगदीश इंगळे उपस्थित होते.



**नाशिक आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर व उपस्थित मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अधिकारी व अभियंते.**

बैठकीमध्ये विविध विषयांचा व योजनांचा संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून सविस्तर आढावा घेतला. महावितरण पुनर्रचना आराखडा सादरीकरण व त्याबाबतची माहिती कार्यकारी संचालक पडळकर यांनी बैठकीत दिली. वीज जोडणी तथा इतर सेवा ग्राहकांना तत्काळ व ठराविक वेळेतच दिल्या गेल्या पाहिजेत यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावे असे आवाहन केले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, प्रधानमंत्री सौरघर मोफत वीज योजना, सौर ग्राम योजना, मागेल त्याला सौर पंप, अभय योजना या सर्व योजनांचा सविस्तर आढावा घेतला. मार्च अखेर परिमंडळात सर्वांनी वीजदेयकाची शून्य थकबाकी मोहीम यशस्वी करून आणखी गतिमानतेने व उत्कृष्ठ कार्य करण्याचे आवाहन कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर यांनी केले.बैठकीला नाशिक, मालेगाव व अहिल्यानगर मंडळातील सर्व कार्यकारी अभियंते, अधिकारी उपस्थित होते.

# अक्षय मराडे ठरला 'नाशिक श्री'चा मानकरी

**नाशिक : प्रतिनिधी**

**बॉडी बिल्डिंग ॲण्ड फिटनेस असोसिएशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या मान्यतेने डॉ. संजय मोरे, आय.बी.बी.एफ. व एबीबीएफचे सरचिटणीस यांच्या मार्गदर्शनाने व डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, अध्यक्ष, बॉडी बिल्डिंग ॲण्ड फिटनेस असोसिएशन, नाशिक यांच्या पुढाकाराने राजेंद्र सातपूरकर यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या नाशिक श्री २०२५ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १५० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.**

७५ किलो वजनी गटातील अक्षय मराडे याने आपल्या पिळदार शरीरयष्टीची प्रात्यक्षिके दाखवून 'नाशिक श्री २०२५'चा किताब पटकावला. ज्युनिअर नाशिक श्री २०२५ या स्पर्धेचा मान सौरभ अमृतकर तर मेन्स फिजिक नाशिक श्री या स्पर्धेचा मान आदर्श पवार याने मिळविला व महिलांच्या नाशिक वूमन्स बॉडी बिल्डिंग या स्पर्धेमध्ये गायत्री पाटील हिने बाजी मारली. ४० वर्षावरील पुरुषांच्या शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये प्रमोद पाळदे याने मास्टर श्री २०२५ चा किताब पटकावला.

स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून मिस्टर एशिया किरण साठे, डॉ. मंजिरी भावसार, महाराष्ट्र श्री किताब विजेते मल्लेश धनगर, मिस्टर पुणे, अमोल गिरी, मिस्टर युनिवर्स हबीब सय्यद तसेच माजी नगरसेवक दिलीप दातीर, राहुल दिवे, विशाल दिवे, शाहू महाराज खैरे, डी. जी. सूर्यवंशी यांची उपस्थिती लाभली. स्पर्धेचे सूत्रसंचालन भाऊदास सोनवणे यांनी केले. गुणलेखक म्हणून किशोर सरोदे यांनी काम बघितले. पंच म्हणून ॲड.नीलेश संधान, हेमंत साळवे, सत्यजित बच्छाव, गोसावी यांनी काम पाहिले.

स्टेज मार्शल म्हणून नदीम खान, जालिंदर लोंढे, मिलिंद रहाणे, समाधान निसाळ, जय ढगे, प्रवीण मोरे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी भाऊदास सोनवणे, मृदुल सवई, सनी दातीर, कल्याणी धात्रक, जान्हवी नंदे, भाऊसाहेब मते, शीतल मते, आयेशा खान, लोकेश तायडे, शोईब मन्सुरी यांनी परिश्रम घेतले.



**नाशिक : अमोल गिरी, किरण साठे, मल्लेश धनगर, भाऊदास सोनवणे, हबीब सय्यद, ऋषिकेश गायकवाड, हेमंत साळवे, प्रसाद जाईगुडे, माधुरी सवई, मृदुल सवई, सनी दातीर, तारीक वारसी, वैभव महाले, विशाल शेलार, नीलेश बामणे, भाऊसाहेब मते, जान्हवी नंदे, शीतल मते, शेहबाझ सय्यद, वैभव महाले, फैझान खान, बब्बू शेख, विशाल शेलार, फैझ पठाण.**

**स्पर्धेचा निकाल :**

५५ किलो वजनी गट: १. विकी पाटील, क्लासिक जिम नाशिक २. भरत गायकवाड, बॉडी झोन जिम, सिडको ३. अतुल बनसोडे गोल्डन जिम नाशिक ४. शुभम शिरसाठ, बॉडी झोन जिम, सिडको ५. ऋषिकेश काळे, पाळदे जिम नाशिक, ६० किलो वजनी गट: १. फैजी खलील, मसल फॅक्टरी, मालेगाव २. कासीम सय्यद, एस. एस. फिटनेस नाशिक ३. विजय कदम, पाळदे फिटनेस नाशिक ४. अनिल कांबळे, रिफ्लेक्शन जिम नाशिक, ऋषिकेश पवार, स्वामी हेल्थ क्लब नाशिक, ६५ किलो वजनी गट: १. सौरभ अमृतकर रोअर जिम नाशिक २. जुनेद अन्सारी ए-वन जिम मालेगाव, राहुल पवार रोअर फिटनेस नाशिक ४. संदीप सोनवणे, मॅक्स फिटनेस नाशिक ५. अभिषेक जगताप, क्लासिक फिटनेस नाशिक, ७० किलो वजनी गट: १. हर्शल हांडगे, स्वामी हेल्थ क्लब, नाशिक २. आदर्श पवार रोअर जिम नाशिक ३. गौरव ठाकरे, रिफ्लेक्शन जिम नाशिक ४. शिवाजी भोईर, २४ जिम नाशिक, ५. वैभव भालेराव, द वर्ल्ड जिम, मालेगाव, ७५ किलो वजनी गट: १. अक्षय मराडे, रॉयल फिटनेस नाशिक, २. शिवांग वगळ, आयर्न स्पोर्ट, नाशिक ३. नामदेव शिंदे ४. किशोर महाले, टायगर जिम नाशिक, ५. दत्तात्रेय पगार. ८० किलो वजनी गट: १. अभय गाडे २. अमित अन्सारी, ३. संकेत शिंदे, पाळदे जिम नशिक ४. निलेश भामरे, वारसी फिटनेस. बेस्ट पोझर : अमर गाडे, मोस्ट इम्पृव्हड बॉडी बिल्डर : सौरभ अमृतकर, ज्युनिअर नाशिक श्री २०२५ : सौरभ अमृतकर,मास्टर्स श्री २०२५ : प्रमोद पाळदे, पाळदे फिटनेस, नाशिक विकी पाटील क्लासिक जिम ३. संदीप सोनवणे, मॅक्स फिटनेस नाशिक ४. फैजी खलील, मसल फॅक्टरी, मालेगाव ५. निलेश भामरे, सप्लीमेंट पोर्ट, मेन्स फिजीक : (१७० सेमी) १. राहुल पवार, रोअर फिटनेस २. जुनेद अन्सारी ए-वन जिम मालेगाव ३. कासीम सय्यद, एस. एस. फिटनेस नाशिक ४. उमेर अहमद एम. बी. जिम मालेगाव ५. अतुल बनसोडे, गोल्डन जिम, मेन्स फिजीक : (१७० सेमी वरील) आदर्श पवार, रोअर जिम राहुल घोलप, पाळदे फिटनेस ओम बागूल पाळदे, फिटनेस सहेल दिवेकर, के.एफ.सी. जिम, भगूर, वूमन्स फिजीक: १. गायत्री पाटील, स्वामी हेल्थ क्लब, वैष्णवी पवार, धनंजय फिटनेस, शुभांगी मोरे, लेव्हल अप जिम ४. कोमल काळे ५. मीना वाकळे, पाळदे फिटनेस, नाशिक.

गांवकरी



## महत्त्वाचे



### खड्ड्यांनी घेतला चिमुकलीचा जीव; बायपासवर नागरिकांचे धरणे

**भंडारा :** सॅनफ्लॅग कंपनी गेट ते पाचगाव फाटा बायपास पुलावर अनेक ठिकाणी खड्डे आहेत. रेल्वे रुळाच्या अलीकडच्या भागात चढावावर खोल व लांब मोठा खड्डा आहे. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वाराचा तोल सुटला व समोरून येणाऱ्या ट्रकला धडक बसली. यात एकलारी येथील ११ वर्षाच्या चिमुकलीचा जीव गेला. वडील व तिचा वर्गमित्र गंभीर जखमी झाले. सहा महिन्यातील ही दुसरी घटना आहे. वाढत्या अपघातांमुळे नागरिकांचा रोष असून संबंधित बांधकाम विभागावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी नागरिकांनी आंदोलन केले. एकलारी येथील विजय सेलोकर (५०) हे नेहमी प्रमाणे मुलांचे शिकवणी वर्ग आटोपून दुचाकीने परत जात होते. त्यांच्या सोबत मुलगी एकता व तिचा वर्गमित्र विराज कन्हैयालाल मारवाडे (११) होते. बायपास पुलावर गाडी चढवताना समोरून अचानक वाहनांची वर्दळ आली. दरम्यान पुलाच्या चढावावर असलेल्या खड्ड्यामुळे दुचाकींचा तोल गेला. यामुळे समोरून येणाऱ्या ट्रकची त्यांना जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकीस्वार व त्याच्या सोबत असलेली दोन्ही मुले निपचित पडली. काही वेळानंतर गावातील काही नागरिकांनी त्यांना उचलून रस्त्या शेजारी केले. दरम्यान पोलीस घटनास्थळावर दाखल झाली व जखमींना तात्काळ उपचारासाठी भंडारा येथील खासगी दवाखान्यात हलवण्यात आले. उपचारदरम्यान मुलीचा मृत्यू झाला.

### मोटारीची काच फोडून पाच लाखांचे दागिने चोरीस

**पुणे :** मगरपट्टा मेगासेंटरच्या आवारात व्यावसायिकाच्या मोटारीची काच फोडून चोरट्यांनी पाच लाख ३० हजार रुपयांचे दागिने नेण्यात आल्याची घटना घडली.ियाबाबत एकाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सासवड-हडपसर रस्त्यावरील वडकी नाला भागात राहायला आहेत. त्यांचा जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. ते गुरुवारी दुपारी सव्वादोनच्या सुमारास कामानिमित्त मगरपट्टा मेगासेंटरमध्ये आले होते. मेगासेंटरच्या आवारातील वाहनतळावर त्यांनी मोटार लावली होती. मोटारीतील कप्प्यात त्यांनी पाच लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने ठेवले होते. काम आटोपून ते पंधरा मिनिटांनी वाहनतळावर आले. तेव्हा मोटारीची काच फोडण्यात आल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी मोटारीच्या कप्प्यातून पाच लाख ३० हजारांचे दागिने चोरुन नेल्याचा प्रकार उघडकीस आला. या घटनेनंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. आवारातील सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांनी तपासले असून, पोलीस उपनिरीक्षक हसन मुलानी तपास करत आहेत.

### यवत गावात दरोडा, मारहाणीत एकाचा मृत्यू

**पुणे :** पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत गाव परिसरात एका घरावर दरोडा टाकून चोरट्यांनी केलेल्या बेदम मारहाणीत एकाचा मृत्यू झाला. महिलांना मारहाण करुन पसार झालेल्या चोरट्यांना ग्रामीण पोलिसांनी येरवडा परिसरातून अटक केली. विश्वजीत शशिकांत चव्हाण (वय ३३, रा. निळकंठेश्वर मंदिराजवळ, सहकारनगर, यवत, ता. दौंड, जि. पुणे) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सलमान दिलशाद शेख (वय २८), मोमीन अकबर शेख (वय ४५, दोघे रा. पठाणकोट मोहल्ला, जि. बागपत, उत्तर प्रदेश), रावतसिंग चौधरी जगजीतसिंग तोमर (वय २६), गुलशन उर्फ मोटा जहाँगीर खान (वय २५, दोघे रा. बडौत, जि. बागपत, उत्तर प्रदेश) यांना अटक करण्यात आली. आरोपी यवत परिसरात एका गुऱ्हाळात गूळ तयार करण्याचे काम करत होते. बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास यवत गावातील निळकंठेश्वर मंदिराजवळ राहणारे विश्वजीत चव्हाण यांच्या घरात आरोपी शेख, तोमर, खान शिरले. आरोपींनी चव्हाण यांना बेदम मारहाण केली. चोरट्यांनी दोन महिलांसह चौघांना मारहाण केली. चव्हाण यांच्या घरातील ऐवज लुटून चोरटे पसार झाले. या घटनेची माहिती विश्वजीत चव्हाण यांची पत्नी सारिका यांनी यवत पोलिसांना दिली. सारिका यांनी आरडाओरड केला. चोरटे रेल्वे रुळाच्या बाजूने पसार झाले. चव्हाण कुटुंबीयांचा आवाज ऐकून नागरिक जागे झाले. त्यांनी चोरट्यांचा पाठलाग केला. चोरटे अंधारात पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक गणेश दडस, उपविभागीय अधिकारी बापूराव दडस यांनी घटनास्थळी भेट दिली. ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने तपास सुरू केला.

### चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी तब्बल ३२ वर्षांनी सापडला

**मुंबई :** चोरीच्या गुन्ह्यांत ३२ वर्षांपासून फरार असलेल्या ५० वर्षीय आरोपीला पुन्हा अटक करण्यात पायधुनी पोलिसांना यश आले. आरोपी पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होता. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. आरोपीविरोधात आणखी गुन्हे दाखल आहेत का याबाबतही पोलीस तपास करीत आहेत. इजाज शहाजहान शेख असे या आरोपीचे नाव असून तो दक्षिण मंबईतील रहिवासी होता. इजाजविरुद्ध १९९२ मध्ये पायधुनी पोलिसांनी भारतीय दंड विधान कलम ३९२, ३९७ व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल होता. आरोपीने त्याच्या साथीदारांसह चोरी केली होती. यावेळी तक्रारदार जखमी झाला होता. याच गुन्ह्यांत १९९२ मध्ये त्याला पोलिसांनी अटक केली. सुरूवातीचे काही दिवस पोलीस कोठडीत राहिल्यानंतर न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यावेळी त्याने जामिनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने त्याला जामीन दिल्यानंतर याप्रकरणाची सुनावणी सुरू झाली. तो खटल्याच्या सुनावणीसाठी १९९३ मध्ये गैरहजर राहू लागला. वारंवार गैरहजर राहिल्यानंतर सत्र न्यायालयाने १९९३ मध्ये त्याच्याविरोधात अजामिनपात्र वॉरंट जारी केले होते. त्याप्रकरणात त्याला फरार घोषित करण्यात आले.

### कचरा विलगीकरणाचे शेड हटवून थाटले दुकान, ग्रामपंचायतीची तक्रार

**नाशिक :** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाके हर्ष येथील ग्रामपंचायतीला कचरा विलगीकरणाची सोय व्हावी म्हणून दिलेल्या जागेवरील शेड हटवून तेथे दुकान थाटण्यात आले आहे. यासंदर्भात ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांनी पोलिसांत तक्रार दिली. टाके हर्ष यषथील गट नंबर ७६ वरील जागा कचऱ्याच्या विलगीकरणासाठी ग्रामपंचायतीला देण्यात आली होती. या जागेवर ग्रामपंचायतीने कचरा विलगीकरणासाठी शेड बांधले होते. मात्र, गावातील एका कुटुंबाने हे पत्र्याचे शेड हटवून त्याठिकाणी दुकान टाकले होते. जागा मालकाने आपल्या जागेवरील दुकान हटविण्यास सांगितल्याचा राग आल्याने दोन कुटुंबातील सदस्यांमध्ये हाणामारीचा प्रकार घडला. याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. व्यसनमुक्ती संघटनेचे अध्यक्ष सनील पगारे यांनी याबाबत पोलिसांत अर्ज दिला असून, या जागेवरील दुकान हटविण्याची मागणी केली आहे. आता याबाबत ग्रामपंचायतीने येथे पुन्हा शेड उभारण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

# जिल्ह्यात आजपासून ‘तेरे मेरे सपने’

## विवाहपूर्व समुपदेशन केंद्र होणार सुरू

**नाशिक : प्रतिनिधी**

**राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या उपक्रमातून जिल्ह्यात ८ माच रोजी ‘तेरे मेरे सपने’ (विवाहपूर्व संवाद केंद्र) सखी वन स्टॉप सेंटर, शासकीय मुलींचे अनुरक्षणगृह आवार, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड येथे सुरू होणार आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील दुसाने यांनी दिली.**

प्रभावी संवाद आणि भावना विकसित करणे, सामाजिक आणि सांस्कृतिक अपेक्षा समजून घेणे व परिवारात सामंजस्य आणि आदर भाव राखणे हाच ‘तेरे मेरे सपने’ (विवाह पूर्व संवाद केंद्र) चा आहे. विवाहाच्या अल्प कालावधीत वाढत



जाणारे कौटुंबिक वाद, त्यामुळे होणारे घटस्फोट टाळण्यासाठी विवाहानंतर उद्‌भवणाऱ्या विविध शारीरिक, मानसिक कौटुंबिक समस्यांबाबत माहिती व्हावी, तसेच परस्परांबाबत माहिती होणे, परस्परांच्या नोकरीचे स्वरूप व त्यामुळे होणारे संभाव्य ताणतणाव इत्यादीबाबतची पूर्वकल्पना आणि यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे व्यवस्थापन याबाबत पूर्व वधू-वरांना या संवाद केंद्राच्या माध्यमातून माहिती दिली जाणार आहे. तसेच प्रतिबंधनात्मक खबरदारी घेणे, कौटुंबिक न्यायालये, पोलीस विभाग, कौटुंबिक सल्ला केंद्रातील प्रकरणांची संख्या कमी करणे, कुटुंबात आनंदी वातावरण राहावे आणि सामंजस्य राहावे यासाठी विवाहपूर्व संवाद होणे आवश्यक आहे.

> जिल्ह्यात ‘तेरे मेरे सपने’ (विवाहपूर्व संवाद केंद्र) कार्यान्वित करण्यासाठी महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत समुपदेशकांना दिल्ली येथे राष्ट्रीय महिला आयोगाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दुसाने यांनी दिली आहे.

### ११ मार्चपासून कोकण रेल्वेची दादर-रत्नागिरी विशेष गाडी

**रत्नागिरी :** मध्य रेल्वेने दादर-रत्नागिरी मार्गावर होळीसाठी दि. ११ मार्च २०२५ पासून विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या गाडीच्या एकूण सहा फेऱ्या होणार आहेत. ही गाडी पूर्णपणे अनारक्षित धावणार आहे.

गाडी क्र. ०११३१ दादर रत्नागिरी होळी विशेष गाडी ११, १३ व १६ मार्च, २०२५ दुपारी १४:५० ला सुटून रात्री २३:४० ला रत्नागिरीला पोहोचेल. परतीची गाडी क्र. ०११३२ रत्नागिरी दादर गाडी १२, १४ आणि १७ मार्च २०२५ पहाटे ४:३० ला सुटून दुपारी १३:२५ ला दादरला पोहोचेल. गाडीला एकूण १६ डबे असतील.त्यातील सर्वसाधारण श्रेणीचे १४, तर एसएलआर २ डबे असतील. ही विशेष गाडी ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड येथे थांबेल.

### मासुंदा तलावावर दीपोत्सव साजरा होणार

**ठाणे :** गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला मासुंदा तलावावर दीपोत्सव साजरा केला जातो. या दीपोत्सवाचे एक वेगळेच आकर्षण असते. परंतू, यंदा या दीपोत्सवासह तलावाच्या काठावर गंगा आरती केली जाणार आहे. या आरतीसाठी खास वाराणसीहून पंडीत येणार आहेत.


**दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस**

मिळकतीचे वर्णनः– तुकडी जिल्हा नाशिक पैकी पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे नाशिक शिवारातील नाशिक महानगरपालिका हद्दीतील ना.ज.क.म. कायद्याचे कक्षेतील टाकळी रोड म्हणुन ओळखल्या जाणा–या विभागातील बिनशेती मिळकत यांसी रेव्हेन्यु सर्व्हे नंबर ३९५/१ व ३९५/४ यांसी अनुक्रमे क्षेत्र १२३००.०० व ९३००.०० चौ. मी पैकी सर्व्हे नंबर ३९५/४ वर मंजुर करण्यात आलेल्या गृप हौसिंग स्किम मधील असुन विल्डींग नंबर एक–४ यांसी बांधीव क्षेत्र ६५६.१२ चौ. मी. मधील श्रीरामकुंज एफ–४ अपार्टमेंट मधील तळ + पहिल्या मजल्यावरील वाधीव फ्लॅट / सदनिका नं.४ यांसी चटई क्षेत्र ९०.३० चौ. मी. म्हणजेच बांधीव क्षेत्र १०८.३६ चौ.मी. यासी चतुःसिमा मंजुर बिल्डींग नकाशाप्रमाणे व दस्ताप्रमाणे.

वरील निवासी मिळकत ही सौ. शितल केशव डिंगोरे व श्री. केशव अंबादास डिंगोरे दोघेही रा. श्री. शांतीनिकेतन चौक, बंगला नं. ५, गंगापुर रोड, नाशिक यांची खरेदी मालकीची मिळकत असुन आज रोजी देखील सदर मिळकत ही त्यांच्याच कब्जेत व वहिवाटीत आहे. सदर मिळकत ही सौ. शितल केशव डिंगोरे व श्री. केशव अंबादास डिंगोरे यांनी श्री. शंकर दामु काश्मिरे व इतर ६ तर्फे जनरल मुखत्यार म्हणुन मे, अलोक कन्स्ट्रक्शन प्रा. लि. करिता जनरल मुखत्यार श्री. संजय रमेशचंद्र अगरवाल यांचेकडुन फ्लॅट विक्री करारनामा या दस्तान्वये खरेदी घेतलेली असुन त्तदरचे करारनाम्याचा दस्त मे. दुय्यम निबंधक वर्ग–२ नाशिक ५ यांचे कार्यालयात दस्त क्रमांक ५८७७/२०१० अन्वये दिनांक ०८/०७/२०१० रोजी नोंदविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर डिड ऑफ अपार्टमेंट चा दस्त मे. दुय्यम निबंधक वर्ग–२ नाशिक–३ यांचे कार्यालयात दस्त क्रमांक ४४०६/२०१६ दिनांक १६/०५/२०१६ रोजी नोंदविलेले आहे. परंतु आजमितीस सदरचा विक्री करारनाम्याचा मुळ दस्त कुठेही आढळुन येत नाही. सदरचा दस्त हा गहाळ झालेला असुन बरेच प्रयत्न केले तरी देखील कुठेही सापडलेले नाही.

तरी सदर या नोटीसीने कळविण्यात येते की वरील नमुद मिळकती बाबतचे विक्री करारनामा हे कोणाकडे असल्यास किंवा कुठे आढळुन आल्यास आजपासुन ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर त्वरीत संपर्क करून ताब्यात देण्यात यावे. ही विनंती. कळावे,

हा दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस.

दिनांक: ०७/०३/२०२५

ॲडव्होकेट व नोटरी,

सही/– **राजश्री जयंत नाईक**

फ्लॅट नं.२, आशिर्वाद को ऑप. हौ. सोसा. शरणपुर रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक–४२२००२. मोबा.८४८४०१४७९९


# एसटी विभागातील ६५० बसेसना एचएसआरपी नंबरप्लेट लावण्यात येणार

**पुणे : राज्य परिवहन विभागाने २०१९ च्या पूर्वीच्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविण्याचा आदेश काढला आहे.**

त्यानुसार पुणे एसटी विभागातील ६५० बसेसना एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यात येणार आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. त्यानुसार पुणे आरटीओ विभागात नंबरप्लेट बसविण्यास सुरुवात झाली आहे. पुणे एसटी विभागात १४ आगार असून, यामध्ये ८०० पेक्षा जास्त एसटी बस आहेत. यातील ६५० एसटी बस ह्या २०१९ पूर्वीच्या आहेत. तर १५० बसेस नवीन इलेक्ट्रिक आहेत. नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी नंबरप्लेट असल्याने त्यांना बसविण्याची गरज नाही. परंतु जुन्या एसटी बसला बसवावे लागणार आहे.

वाहनधारकांकडून प्रतिसाद वाढला२०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून आदेश काढण्यात आले आहेत. सुरुवातीला वाहनधारकांकडून याला अल्प प्रतिसाद मिळत होता. परंतु आता नंबरप्लेट बसविण्याच्या



कामाला गती मिळाली असून, वाहनधारकांची संख्या वाढत आहे.

# छत्रपती संभाजीनगरजवळील औरंगजेब कबर परिसरात पोलिस बंदोबस्त

**छत्रपती संभाजीनगर) :**

**मागील महिन्यात प्रदर्शित छावा चित्रपटानंतर अनेक नेत्यांची वक्तव्य आणि सोशल मीडियातून देशभरात औरंगजेब प्रकरणावरून मोठा गदारोळ उडालेला आहे.**

अनेक हिंदुत्ववादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी खुलताबाद येथील औरंगजेब कबरीबाबत अपशब्द वापरून इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी या कबर परिसरास कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुघल सम्राट औरंगजेबची कबर खुलताबाद येथील जैनोद्दीन चिश्ती यांचा दर्गा येथे आहे. गेल्या काही दिवसापासून चित्रपट, नेत्यांची वक्तव्य यामधून औरंगजेब प्रकरण देशभरात तापले आहे. याच प्रकरणावरून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना विधानसभेत आणि बाहेरही अनेक आरोप-प्रत्यारोप, इशारे सुरू झाले आहेत. त्यामुळे दक्षता म्हणून खुलताबाद येथील औरंगजेब यांच्या कबर परिसरात पोलिसांनी तसेच पुरातत्त्व विभागाने अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहेत. हे सुरक्षा कर्मचारी भाविक व पर्यटकांवर लक्ष ठेवून आहे.

या परिसरात व्हिडिओ शूटिंग, फोटो काढण्यास बंदी आहे. मात्र, अचानक उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील इलेक्ट्रॉनिक माध्यमाचे प्रतिनिधी येथे दाखल झाले असून, वार्तांकन करताना दिसत आहेत. अबू आझमींना औरंगजेब प्रेम भोवले; निलंबनाची कारवाई समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी विधानभवन आवारात औरंगजेब किती चांगला शासक होता, अशा आशयाचे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरून मंगळवारी विधानसभेचे कामकाज स्थगित करण्यात आले.


**जाहीर नोटीस (टायटल व्हेरीफिकेशनसाठी)**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका नाशिक** पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे बेलगांव ढगा** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यांसी नविन संगणकीय उताऱ्यानुसार **गट/सर्व्हे नं. ३६/१** यांसी क्षेत्र ०४ हे. ०५ आर + पो.ख. ०० हे. ०३ आर असे **एकुण क्षेत्र ०४ हे. ०८ आर** यांसी यांसी आकार रु.०३=६४ पैसे ही मिळकत या मिळकतीपैकी **क्षेत्र ०० हे. ६० आर** यांसी आकार रु.००=५४ पैसे ही मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेस -: रस्ता, पश्चिमेस -: श्री.गांगुर्डे यांची मिळकत, दक्षिणेस -: पोल्ट्री फार्म, उत्तरेस -: श्री.सोना गांगुर्डे यांची मिळकत

उपरोक्त मिळकत **श्री.सुभाष मोहनराव आहेर व सौ.सिमा सुभाष आहेर** यांचे खरेदी मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री कामी मिळकत मालकाचा आमचे पक्षकार यांचेशी व्यवहाराचे बोलणे झालेले असुन व्यवहार पक्का झालेला आहे. उपरोक्त मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचे मिळकत मालकांनी खात्रीलायक रित्या सांगितले आहे. त्यामुळे टायटल व्हेरीफिकेशन कामी नोटीस प्रसिध्द करीत आहे. उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा, जसे की, विसारपावती, साठेखत, गहाणखत, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, कोर्टवाद, हद्दीचा वाद, इजमेंटचा वाद या अगर तत्सम प्रकारचा बोजा व हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून **०८ दिवसांचे आत** खालील नमुद पत्यावर समक्ष येवुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येईल. मुदतीनंतर तसेच कागदपत्राविना घेतलेल्या हरकती व परस्पर वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे, दि.०७/०३/२०२५.

**ॲड.बाबासाहेब सदाशिव वल्टे**

ऑफिस-६१, माहेश्वरी चेंबर्स मेघदुत शॉपिंग सेंटर, सी.बी.एस, नाशिक मो.९६०४०३९३०३


# रुग्णवाहिकेला उशीर, शल्यचिकित्सक निलंबित

**शहापूर : प्रतिनिधी**

**सरकारची १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने उल्हासनगरात एका ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केल्यानंतर अखेर उल्हासनगर शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.**

२३ जानेवारी रोजी राहुल इंधाते या तरुणाचा उपचाराअभावी मृत्यू झाला. उल्हासनगरच्या कॅम्प १ भागात हर्षवर्धन नगर परिसरात राहणारे राहुल इंधाते यांना २२ जानेवारीच्या मध्यरात्री अचानक शारीरिक त्रास जाणवू लागल्याने त्यांना कुटुंबीयांनी तातडीने उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांनी येथे प्राथमिक उपचार केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांची खाजगी रुग्णालयात तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गुरुवारी दुपारी डॉक्टरांनी राहुलची स्थिती चिंताजनक असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना तातडीने कळवा येथील रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर कुटुंबीयांनी १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका मिळण्यासाठी संपर्क केला. मात्र रूग्णवाहिका येण्यास उशिर झाला. त्यामुळे राहूल यांना दुसऱ्या रूग्णालयात नेण्यास उशिरा झाला. शेवटी कुटुंबीयांनी स्वतःच्या वाहनाने रूग्णाला रूग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत उल्हासनगरच्या शासकीय रुग्णालयातच रूग्णालाचा मृत्यू झाला होता. या प्रकारानंतर उल्हासनगर शहरातून संपात व्यक्त करण्यात आला होता. तर १०८ रूग्णवाहिका वेळेत उपलब्ध न झाल्याने संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत होती.

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा विषय तारांकीत प्रश् म्हणून उपस्थित करण्यात आला. अखेर मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांना निलंबीत करण्यात आले आहे. त्यांच्यासोबत आणखी एका डॉक्टरचे निलंबन करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश आरोग्य सेवा उपसंचालकांनी काढले आहेत. तसेच डॉ. बनसोडे यांना पुढील आदेशपर्यंत मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे.

या निलंबन कारवाईनंतर रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजात अडथळा येऊ नये म्हणून शासनाने डॉ. उत्कर्ष दुधेडिया यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा शल्यचिकित्सक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.


**टायटल व्हेरीफिकेशन नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका इगतपुरी** पैकी **मौजे तळोशी** या गांवचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी **गट नंबर २८९** यांसी क्षेत्र १ हेक्टर ७४ आर + पो.ख. ०.०५ आर असे **एकूण क्षेत्र १ हेक्टर ७९ आर** यांसी आकार रुपये १=०६ पैसे. पैकी ....

१) **श्री.भगवान देवराम शेळके** यांचे मालकीचे **क्षेत्र ० हे. २० आर**

२) **श्री.शिवराम लक्ष्मण शेळके** यांचे मालकीचे ० हे. ५७.१८ आर + पो.ख. ०.०२.८२ आर असे **एकूण क्षेत्र ० हे. ६० आर**

३) **श्री.चंद्रभान देवराम शेळके** यांचे मालकीचे **क्षेत्र ० हे. २० आर**

४) **श्री.गोरख नंदू शेळके, सत्यभामा नंदू शेळके, वैष्णव नंदू शेळके** यांचे मालकीचे **क्षेत्र ० हे. २० आर** असे **एकत्रित १ हेक्टर २० आर**

वर वर्णन केलेली मिळकत ही वर उल्लेख केल्याप्रमाणे संबंधीत मालकांच्या वडीलोपार्जित मिळकती असून त्यांच्या मालकीच्या व कब्जे वहिवाटीत आहेत. सदर मिळकती निर्वेध व बिनबोजाच्या आहे, असे त्यांनी खात्रीने सांगितले आहे. सबब वर वर्णन केलेल्या मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, बक्षिसपत्र, बँक बोजा, जप्ती, जामीनकी अगर कोणत्याही प्रकारे हक्क व अधिकार पोहचत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात कागदपत्रांनिशी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत, असे समजुन टायटल सर्टीफीकेट दिले जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे, ही नोटीस. नाशिक. दि.७/३/२०२५.

**रविंद्र पंडीतराव सोनवणे**, ॲडव्होकेट

ए-५, मेघदूत शॉपिंग सेंटर, सीबीएस.समोर, नाशिक.


# ‘होय, मी लेखक होणारच’ कार्यशाळेचे आयोजन

**पुणे : प्रतिनिधी**

**नवोदित लेखकांना प्रेरणा व दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘होय, मी लेखक होणारच!’ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठात येत्या १५ ते १८ मार्चदरम्यान कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.**

पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागामध्ये पत्रकार परिषदेत कार्यशाळेच्या आयोजनाची माहिती सांगण्यात आली. ‘मीडिया नेक्स्ट’चे संचालक अभय कुलकर्णी, विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय तांबट, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, माध्यम सल्लागार व मुक्त आशयनिर्माते श्री. प्रसाद मिरासदार उपस्थित होते

नवीन लेखकनिर्मितीची गरज लक्षात घेता उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात जरी माहिती सहजगत्या उपलब्ध होत असली, तरी वैचारिक लेखन आणि दर्जेदार सर्जनशीलतेला मोठे महत्व आहे. नवोदित लेखक, विद्यार्थी आणि युवा साहित्यप्रेमींना लेखनाची सखोल समज, तांत्रिक दृष्टिकोन आणि सृजनशीलतेचा विकास करण्याची संधी मिळावी, यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे . कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, येथे होणार असून ३०० निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे साहित्य प्रकार: कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, पटकथा लेखन आदी विषय असणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक. प्रवीण तरडे व राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक युवराज मलिक व उपस्थित राहणार आहे.

# जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिला वेशभूषेतून एकात्मतेचा संदेश



**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या वतीने गुरुवारपासून (दि. ६) सुरू झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत काल संस्कृतिक कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्यासह खातेप्रमुखांनी सहभागी होऊन विविध स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारक यांची वेशभूषा सादर करून एकात्मतेचा संदेश दिला.**

जिल्हा परिषदेकडून अधिकारी, कर्मचारी यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या मैदानावर क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कतिक कार्यक्रमामध्ये गायन, समूहनृत्य, एकल नृत्य, एकांकिका आदींचा समावेश आहे.

काल जिल्हा परिषद मुख्यालयाकडून विविध स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारक यांची वेशभूषा करून स्वातंत्र्यासाठी लढलेल्या शूरवीरांना मानवंदना देण्यात आली. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, अर्जुन गुंहे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या सर्व विभागप्रमुखांनी सहभाग घेतला.


**IIFL FINANCE**

CIN: L67100MH1995PLC093797
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **11.03.2025** रोजी **सकाळी 10.00** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **पंचवटी कारंजा नाशिक – वसंत सिटी मॉल पहिला मजला मानस हॉटेल जवळ पंचवटी कारंजा नाशिक**, येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL33371899, GL33361896, GL33457388, GL33436861, GL32164176, GL32173917, GL33076904, GL33540081, GL33529645, GL33982663, GL21993891, GL33082672, GL33061606, GL32295552, GL32311038, GL32908677, GL32922572, GL33129072, GL33146359, GL31464757, GL31465542, GL31808693, GL33616917, GL33604290, GL33632221, GL33643838, GL33756346, GL33889373, GL33872594, GL33896462, GL33913159, GL33393976, GL33610268.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : 08.03.2025
स्थळ: नाशिक

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

पान १ वरुन....

## राज्यासमोर आर्थिक संकट

महिलांसाठी प्राधान्य दिले आहे. डिसेंबरपर्यंत, या योजनेने २.३८ कोटी महिलांना १७५०५.९० कोटी रुपयांची आर्थिक मदत दिली आहे.

**कृषी लागवड क्षेत्रात घट**

राज्यातील २०३ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, ६८ तालुक्यांमध्ये सरासरी आणि ८४ तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला आहे. कृषी गणनेनुसार लागवड क्षेत्रात प्रचंड घट झाली. १९७०-७१ नुसार राज्यातील सरासरी लागवड क्षेत्र ४.२८ हेक्टर होती. २०२१-२२मध्ये सरासरी लागवड १.२३ हेक्टर राहिली आहे. सन २०२४-२५ च्या खरीप हंगामामध्ये १५७.५९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली. २०२४-२५ च्या रब्बी हंगामामध्ये ६२.८१ लाख हेक्टर क्षेत्रांवर पेरणी पूर्ण झाली आहे.

## नार-पार-गिरणा प्रकल्पांना मान्यता

घरगुती ग्राहक (सुमारे १.५ कोटी कुटुंबे) हे दरमहा ० ते १०० युनिट वीज वापरतात. यामुळे नवीन योजनेच्या माध्यमातून ही कुटुंबे त्यांच्या घरावर सोलर पॅनल बसवू शकतील आणि पूर्णपणे वीज बिलमुक्त होतील.

**राज्यात गुंतवणुकीत विक्रमी वाढ**

महाराष्ट्राने गुंतवणुकीच्या क्षेत्रात स्वतःचाच विक्रम मोडला आहे. दावोस जागतिक अर्थ परिषदेत महाराष्ट्राने सर्वाधिक गुंतवणुकीचे करार केले आहेत. जवळपास १५ लाख ७० हजार कोटीचे गुंतवणूक करार झाले आहेत. या परिषदेत एकूण ५४ करार झाले आहे. गुंतवणुकीचे करार झाल्यानंतर प्रत्यक्षात प्रकल्प सुरू करण्यामध्ये महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत पुढे आहे. गुंतवणूक करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण राज्यात ८० ते ९१ टक्क आहे. गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली यांच्या तुलनेत तीन पट अधिक गुंतवणूक यावर्षीच्या आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने मिळवली आहे. या गुंतवणूक करारामध्ये स्टील, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम बॅटरी, सोलर, डेटा सेंटर आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील विविध कंपन्यांच्या समावेश आहे.

**२० लाख घरांना मंजुरी**

केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्राला पहिल्याच वर्षी २० लाख घरांची मंजुरी दिली आहे. हा देशातील सर्वाधिक मंजूर घरांचा आकडा असून, महाराष्ट्र सरकारने या योजनेसाठी वेगाने पावले उचलली आहेत. ग्रामविकास विभागाने घेतलेल्या वेगवान निर्णयांमुळे महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण होत आहे.

ग्रामविकास विभागाच्या कार्यक्षमतेमुळे मंजुरी मिळाल्यानंतर अवघ्या एका महिन्यात १६ लाख घरांना मान्यता देण्यात आली. तसेच १० लाख लोकांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करण्यात आले आहे. उर्वरित ६ लाख लाभार्थ्यांना लवकरच निधी मिळणार आहे. राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून अतिरिक्त ५०,००० रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर केले आहे. त्यामुळे आता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना एकूण २ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय मिळणार आहे.

**रस्ते सिमेंट काँक्रीटचे करणार**

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून गावांना जोडणारे रस्ते यापुढे सिमेंट काँक्रीटचे करण्यात येणार आहेत. राज्यात ग्रामीण भागातील १४ हजार किलोमीटरचे रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यात येणार आहे. तसेच १ हजार लोकसंख्या असलेल्या सुमारे ४ हजार गावांमध्ये सिमेंट काँक्रिटीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येईल.

## आम्ही गरिबांना ३२ लाख कोटी दिले

लोकांना ऑटोग्राफही दिले.

**मुद्रा योजनेवरून विरोधकांवर निशाणा**

सुरतमधील एका जाहीर सभेत पंतप्रधान मोदींनी मुद्रा योजनेवरून विरोधकांवर निशाणा साधला. पूर्वी ज्या लोकांचा जन्मही झाला नव्हता त्यांच्यासाठी रेशनकार्ड बनवले जात होते. आम्ही प्रणालीतून पाच कोटी बनावट नावे काढून टाकली. संपूर्ण प्रणाली आधार कार्डशी जोडल्याने, रेशन कार्डशी संबंधित एक मोठी समस्या सोडवली गेली. इतर राज्यातील लोक येथे मोठ्या संख्येने काम करतात.

**चुल पेटू नये, हे भारताला मान्य नाही.**

पंतप्रधान म्हणाले - अन्न, वस्त्र आणि निवारा यापेक्षा महत्त्वाचे काहीही नाही. भाकरीसाठी संघर्ष करणाऱ्या गरीब माणसाचे दुःख काय असते हे मला कोणत्याही पुस्तकात वाचण्याची गरज नाही. मला ते जाणवते. म्हणून, आमच्या सरकारने गरजूंच्या अन्नाची काळजी घेतली आहे. .

## राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा

याचिकेत राणाने असा युक्तिवाद केला की त्याचे भारतात प्रत्यार्पण करणे हे अमेरिकन कायद्याचे आणि छळाविरुद्ध संयुक्त राष्ट्रांच्या कराराचे उल्लंघन करते. जर त्याला भारतात प्रत्यार्पण केले गेले तर त्याला छळाचा धोका राहील त्यांच्या प्रकरणात छळ होण्याची शक्यता आणखी जास्त आहे.

कारण मुंबई हल्ल्यातील आरोपी हा पाकिस्तानी वंशाचा मुस्लिम आहे.

## शिपाई जाळ्यात

येथे दिनांक २५ जानेवारीला अर्ज केला होता. तक्रारदार यांनी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर या जमिनीची भूमि अभिलेख कार्यालय यांच्यामार्फत दिनांक २८ फेब्रुवारीला मोजणी झाली होती परंतु हद्दी खुणा दाखवायच्या बाकी होत्या. शिपाई गाढे यांनी भूमिअभिलेखचे उपअधीक्षक भाबड यांच्या ओळखीचा तक्रारदार यांच्यावर प्रभाव पाडून भाबड यांच्याशी बोलून हे काम दिलेल्या तारखेस दिनांक ०७.मार्च २०२५ रोजी हद्दी खुणा दाखवून व नकाशा काढून काम पूर्ण करून देण्याच्या मोबदल्यात दिनांक ०६ मार्च रोजी स्वतः साठी व भाबड यांच्या नावे ४ लाख रुपये लाचेची मागणी केली तडजोडी अंती साडेतीन लाखांवर तडजोड केली. याबाबत तक्रारीनुसार सापळा रचण्यात आला असता या लाचेची रक्कम काल स्वीकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. पोलीस निरीक्षक मीरा कौतिका वसंतराव आदमाने, पोलीस हवालदार पंकज पळशीकर, पोलीस हवालदार प्रमोद चव्हाणके यांच्या पथकाने अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर–घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली.


**कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालय, नाशिक निर्मित आणि इप्टा नाशिक प्रस्तुत, महाराष्ट्र शासन अनुदान प्राप्त दोन अंकी मराठी नाटक**

**प्रथम पुरूष**

लेखक, दिग्दर्शक- संकेत सीमा विश्वास

**शनिवार, दि.८ मार्च २०२५, सकाळी ११ वा.**

**स्थळ- मनोरंजन कक्ष, संचार परिसर (BSNL) कॅनडा कॉर्नर, नाशिक**

**तिकिटांसाठी संपर्क**
80 87 48 67 81


### टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मौजे नाशिक शहर,** ता. जि. नाशिक येथील भुमापन क्रमांक व **उपविभागः ६७९/१/२ पैकी प्लॉट नं.१० यांसी क्षेत्र ५९८.०८ चौ.मी.** यांसी फायनल **प्लॉट नं. ४०७** यांसी सिटी **सर्व्हे नं. ७४६४** यावर बांधण्यात आलेल्या **सिध्दी पुजा रिजन्सी अपार्टमेंट** या इमारतीमधील **स्टील्ट (पहिल्या मजल्यावरील रुम नं. २ यांसी कार्पेट क्षेत्र २१.०१ चौ.मी.** ही मिळकत.

उपरोक्त मिळकत **भारती निंबा पाटील** यांचे खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे त्यांनी सांगितले आहे. तथापी मिळकतीचे निर्वे धपणाची खात्री करणेकामी सदरची टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सबब सदर मिळकतीबाबत कोणतेही व्यवहार, गहाण, दान, तारण, लिन, लिज, भाडेपट्टा, अन्नवस्त्र, खावटी, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विकसन करारनामा, हक्क हितसंबंध, हरकत असल्यास त्या संबंधित इसमाने अगर संस्थेने त्यांचे लेखी कागदपत्रांचे पुराव्यानिशी आपली हरकत आमचे खालील कार्यालयात प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत नोंदवावी.मुदतीनंतर व कोणत्याही पुराव्याशिवाय हरकत नोंदविल्यास अगर परस्पर वर्तमानपत्रात हरकत प्रसिध्द केल्यास, ती हरकत आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व वर नमूद मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याबाबतचा दाखला मिळकत मालकांना देण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस. **नाशिक. दिनांक : ०७/०३/२०२५**

**समाधान एन. देवकर, ॲडव्होकेट**
**ऑफीस-बी-२०५, मेघदूत शॉपींग सेंटर, सी. बि.एस., जिल्हा न्यायालयासमोर, नाशिक मो.नं.९७६६०५७९८८**

### टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१. मिळकतीचे वर्णनः** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे गंगापूर** या गावचे शिवारातील **सर्व्हे नं. ५८/३ ब** पैकी बिनशेती **प्लॉट नंबर २०** यांसी **क्षेत्र ३३०.०० चौ.मी. प्लॉट नं. २१ यांसी क्षेत्र ४२९.०० चौ.मी व फ्लॅट नंबर २२ यांसी क्षेत्र ३५६.०० चौ.मी** यांसी **एकत्रित क्षेत्र १११५.०० चौ.मी** यांसी प्लॉट मिळकती एकत्रिकरणानंतरचा **सर्व्हे नंबर ५८/३/ब/ प्लॉट/२०/२१/२२ यांसी क्षेत्र १११५.०० चौ.मी** यातून रस्ता रूंदीकरणाकरीता वजा झालेले **क्षेत्र २०.२० चौ.मी.** क्षेत्र वगळता उर्वरीत **क्षेत्र १०९४.८० चौ.मी** या मिळकतीवर बांधकाम केलेली मिळकत **गोकुळ अपार्टमेंट फेज -१** या नावाने बांधलेल्या इमारतीतील बिल्डींग क्रमांक १ मधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ०६ सहा यांसी बांधीव **क्षेत्र ४९. २५ चौ.मी. म्हणजेच ५३०.०० चौ. फुट** असलेली फ्लॅट मिळकत, यामध्ये हॉल, एक बेडरूम, किचन संडास बाथरूम इत्यादीसह फ्लॅट मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट्स प्रमाणे.. अशी नमुद मिळकत ही **श्री. गौतम त्रंबक बोढारे** यांची स्वकष्टार्जीत मिळकत असुन त्यांनी निर्वेध व बिनबोज्याचे असल्याचे खात्रीने सांगितलेले असुन तथापी सदरची नोटीस टायटल व्हेरीफिकेशन कामी प्रसिध्द केली आहे. यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे... त्यासाठी सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफिकेशन कामी सदरहु नोटीस प्रसिध्द केलेली आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क, बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, तारण, बँक बोजा, कुळ वारस, कोर्टखटले अथवा कुठल्याही प्रकारचे करार मदार, विसार पावती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत संबंधीतांनी वर नमुद केलेल्या पत्यावर कागदपत्रांच्या पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर विनाकागदपत्र आलेली हरकत व परस्पर वर्तमानपत्रात जाहिर केलेल्या हरकती आमचे पक्षकारांवर व मिळकतीवर बंधनकारक राहाणार नाही याची नोंद घ्यावी. उपरोक्त विहित मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध समजुन मिळकत मालकास तसा दाखला देण्यात येईल, व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे. ही नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांचे सुचनेवरून प्रसिध्दीस दिली असे. **ता. ०६/०३/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्दीस रवाना**

**ॲड.गोरक्ष एल बोडके**
**ऑफीस पत्ताः चेंबर नं. २०९/१ बिल्डिंग नं. १, मारूती चेंबर जिल्हा व सत्र न्यायालय आवार, नाशिक २**

## महिलांवरील अत्याचाराच्या निषेधार्थ मोर्चा

**पुणे :** महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ संतुलन कष्टकरी शेतकरी महिला परिषदेकडून शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात विविध संघटनांच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. विधानभवनापासून मोर्चा प्रारंभ करण्यात आला. पोलीस आयुक्तयालयावर मोर्चा नेण्यात आला. तेथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. संतुलन कष्टकरी शेतकरी महिला परिषदेच्या पदाधिकारी ॲड. पल्लवी रेगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्चा काढण्यात आला. मोर्चाची सांगता जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ करण्यात आली.

### टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मोजे- म्हेळुस्के** या गावचे शिवारातील मिळकती **गट नं. ११६ यांसी क्षेत्र ०० हे ३५ आर** यांसी **आकार रु. ००.९८ पैसे** यासी चतुः सिमा गाव नकाशाप्रमाणे...

वर उल्लेख केलेली मिळकत ही **श्री. बाळासाहेब मुरलीधर बनकर** (मयत) यांचे वारस **श्री. प्रकाश बाळासाहेब बनकर, राजेंद्र बाळासाहेब बनकर, भुमेंद्र बाळासाहेब बनकर,** रा. म्हेळुस्के, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांचे मालकी हक्काची, कब्जेवहिवाटीत अशी आहे. सदरील निर्वेध व बिनबोजाची आहे, असे सांगुन मिळकत मालक यांनी आमचे पक्षकारांसोबत मिळकत खरेदी देणेबाबत व्यवहार करून व्यवहाराकामी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत खात्री करण्यासाठी त्याकरीता सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

सबब उपरोक्त मिळकतीमध्ये कोणाचाही कोणतेही स्वरुपाचा हक्क, अधिकार जसे गहाण, दान, लीन, लीज, अनवस्त्र, जप्ती, जामिन की, कोटं वाद इ. स्वरुपाचा हितसंबंध असल्यास अगर मिळकतीबाबत कुठल्याही स्वरुपाचा वाद असल्यास संबंधीतांनी कागदोपत्री पुरावेनिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ (पंधरा)** दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी हरकती नोंदवाव्यात. सदरच्या मुदतीत हरकत न आल्यास मिळकतीबाबत पुढील व्यवहार पूर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर अथवा दैनिक वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द होणाऱ्या या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**दिनांक ०७/०३/२०२५ कळावे, ही जाहीर नोटीस**

**श्री. प्रकाश बाळासाहेब बनकर- मिळकत मालक**
**राजेंद्र पंढरीनाथ पठाडे-पक्षकार**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**ॲड. संतोष जनक जाधव**
**बी.एस.एल., एलएल.बी. ऑफीस ॲडव्होकेट चेंबर्स, मार्केट यार्ड गाळा नं. २६, २७ निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

### टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मोजे- म्हेळुस्के** या गावचे शिवारातील मिळकती **गट नं. ११५ यांसी क्षेत्र ०२ हे ७७ आर** यांसी **पो.ख ०.०६ आर** यांसी **एकूण क्षेत्र ०२ हे ८३ आर** यांसी **आकार रु. ११.९९ पैसे** यासी चतुः सिमा गाव नकाशाप्रमाणे...

वर उल्लेख केलेली मिळकत ही **श्री. बाळासाहेब मुरलीधर बनकर** (मयत) यांचे वारस **श्री. प्रकाश बाळासाहेब बनकर, राजेंद्र बाळासाहेब बनकर, भुमेंद्र बाळासाहेब बनकर,** रा. म्हेळुस्के, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांचे मालकी हक्काची, कब्जेवहिवाटीत अशी आहे. सदरील मिळकतीवर म्हेळुस्के वि.का.से.सो, लखमापूर वि.का.से.सा, तसेच नाशिक जिल्हा मध्य. सहकारी बँक शाखा करंजवण यांचे कर्ज बोझे व्यतिरिक्त सदरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे सांगुन मिळकत मालक यांनी आमचे पक्षकारांसोबत मिळकत खरेदी देणेबाबत व्यवहार करून व्यवहाराकामी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत खात्री करण्यासाठी त्याकरीता सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब उपरोक्त मिळकतीमध्ये कोणाचाही कोणतेही स्वरुपाचा हक्क, अधिकार जसे गहाण, दान, लीन, लीज, अनवस्त्र, जप्ती, जामिन की, कोटं वाद इ. स्वरुपाचा हितसंबंध असल्यास अगर मिळकतीबाबत कुठल्याही स्वरुपाचा वाद असल्यास संबंधीतांनी कागदोपत्री पुरावेनिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ (पंधरा)** दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी हरकती नोंदवाव्यात. सदरच्या मुदतीत हरकत न आल्यास मिळकतीबाबत पुढील व्यवहार पूर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर अथवा दैनिक वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द होणाऱ्या या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**दिनांक ०७/०३/२०२५ कळावे, ही जाहीर नोटीस**

**श्री. प्रकाश बाळासाहेब बनकर- मिळकत मालक**
**राजेंद्र पंढरीनाथ पठाडे-पक्षकार**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**ॲड. संतोष जनक जाधव**
**बी.एस.एल., एलएल.बी. ऑफीस ॲडव्होकेट चेंबर्स, मार्केट यार्ड गाळा नं. २६, २७ निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय जालखेड ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम/दुत्तोय प्रसिद्धी**

### जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय जालखेड ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई- निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०७/०३/२०२५ पासून ते १३/०३/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय जालखेड, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय जालखेड ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय ननाशी ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

### जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय ननाशी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, अल्पसंख्याक योजन सन २०२४-२५,१५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०७/०३/२०२५ पासून ते १४/०३/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय ननाशी, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत..

**ग्रामपंचायत अधिकारी** **प्रशासक**
**ग्रामपंचायत कार्यालय ननाशी ता. दिंडोरी, जि. नाशिक**

### जाहीर नोटीस

नि.नं:०६ प्रोसेस जमा — **श्रीमती. किरण के. देवरे, (पवार) ॲडव्होकेट, सटाणा (नाशिक)**

**जा.क्र.६०६/२०२५ दि.०७/०३/२०२५ वारस प्रमाणपत्र नं.४७/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात.....**

**श्री. संजय शामा पवार**, वय-४२ वर्ष, धंदा-शेती
रा. भिलवाड, ता. बागलाण, जि. नाशिक **व इतर - ९** **अर्जदार**

**विरुद्ध**

**श्रीमती. गुंताबाई काशिराम पवार**, वय ८० वर्ष, धंदा- शेती
रा. देवठाण दिगर, ता. बागलाण, जि. नाशिक **व इतर - २** **सा.वाले**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांचे आजोबा, अर्जदार नं. ६ ते १० व सा.वाले नं. २ व ३ यांचे वडील तसेच सा.वाली नं. १ हिचे पती **काशिराम गंगाराम पवार** हे **दि. ०६/०५/२००९** रोजी **मौजे देवठाण दिगर**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. **कै. काशिराम गंगाराम पवार** यांचे अर्जदार व सा.वाले हेच कायदेशीर वारस असले बाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार व सा.वाले हे मयत **कै. काशिराम गंगाराम पवार** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि. २१/४/२०२५** रोजी स्वतः अगर वकीला मार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणने दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करतील मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ५/३/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** — **दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा, नाशिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक** — **दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा, नाशिक**

### जाहीर नोटीस

नि.नं:०६ प्रोसेस जमा — **श्री. चंद्रकांत नामदेव आहिरे ॲडव्होकेट, सटाणा, (नाशिक)**

**जा.क्र.५९०/२०२५ दि.०६/०३/२०२५ वारस प्रमाणपत्र नं.४९/२०२५**

**सटाणा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्युनि. डिव्ही यांचे कोर्टात.....**

**१) श्रीमती मंगल उर्फ मंगला सुनिल पवार**, वय ४८ वर्षे,
**२) श्री. तन्मय सुनिल पवार**, वय २३ वर्षे, **३) चेतना सुनिल पवार**, वय २० वर्षे नं. १ ते ३ रा. नासिक, ह.मु.अजमेर सौंदाणे, ता. बागलाण, जि.नासिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील नामे **सुनिल रावबा पवार** हे दिनांक **३०/०४/२०१८** रोजी **मौजे नासिक** ता. जि. नासिक येथे मयत झाले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस असलेबाबतचे लिगल हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने ते मिळणेकामी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **सुनिल रावबा पवार** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक १६/०४/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे सादर करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ६/०३/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** — **दिवाणी न्यायालय, सटाणा** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक** — **दिवाणी न्यायालय, सटाणा**

### जाहीर नोटीस

नि.नं:०६, प्रोसेस जमा — **श्री. व्हि.एम. सोनवणे, ॲडव्होकेट/नोटरी** ऑफिस पत्ता - ''मोतीव्दार'' नेहरू रोड, सटाणा ता. बागलाण, जि. नाशिक, **मो.नं.९८९०६३८७८१**

**जा.क्र.५६६/२०२५ दि.०५/०३/२०२५ वारस प्रमाणपत्र नं.४६/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात...**

**श्री. संदीप विनायक जाधव,** वय-५४ वर्ष, धंदा-व्यापार
रा. सोनार लेन, सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सा.वाले**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे वडील **कै. विनायक बाळकृष्ण जाधव** हे दिनांक २४/०१/२००६ रोजी **मौजे सटाणा,** ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदाराची आई नामे **हिराबाई विनायक जाधव** ही देखील प्रकृती स्वास्थाचे कारणास्तव अपोलो हॉस्पिटल नाशिक येथे औषोधोपचार घेत असताना **दिनांक २२/१०/२०२४** रोजी मयत झालेली आहे. तत्पूर्वी उभयतांचे म्हणजे **विनायक बाळकृष्ण जाधव व हिराबाई विनायक जाधव** यांचे विवाह संबंधातून अर्जदार तसेच त्यांचा भाऊ **जयंत विनायक जाधव** हा देखील **दिनांक ०२/१०/२०२४** रोजी **मौजे सटाणा**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे अविवाहीत मयत झालेला असुन त्यांचे मृत्युनंतर अर्जदार हा एकमेव कायदेशिर वारस असलेबाबतचे कथन करून अर्जदाराने मे.कोर्टाकडून वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हा मयत **कै. विनायक बाळकृष्ण जाधव, कै. हिराबाई विनायक जाधव** व **कै. जयंत विनायक जाधव** या सर्वांचे मृत्युनंतर अर्जदार हा कायदेशिर वारस आहे/नाही. याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि.१५/४/२०२५** रोजी स्वत: अगर वकीलामार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणने दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करतील मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ०५/०३/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** — **दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा, नाशिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक** — **दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा, नाशिक**

### जाहीर नोटीस

नि.नं:६ — **ॲड.एन.बी.जाधव**

**दिवाणी चौकशी अर्ज नं.३०/२०२३**

**दिंडोरी येथील मा. दिवाणी न्यायाधीश साहेब क-स्तर दिंडोरी (निर्मळे मॅडम) यांचे न्यायालयात**

**सौ. ताई सिताराम गवळी.** **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

**मिळकतीचे वर्णन-** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी सुरगाणा पैकी सुरगाणा पंचायत समिति हद्दीतील **मौजे उंबरविहीर** या गावचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी **गट नं.१२६** यांसी एकूण **क्षेत्र ३ हे.३९ आर यांसी आकार रु.३.८७ पैसे**. या मिळकतीपैकी अर्जदार यांच्या हिश्यांची ० **हे.८४ आर** यांसी **आकार रु.०.९७ पैसे** यांसी चतु:सीमा गावचे रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे येणेप्रमाणे चतु:सीमेतील वर्णनाची शेतजमीन मिळकत जल, तरू, तृण, काष्ट, पाषाण, निधी निक्षेपासह जाणे-येण्याचे वागवहिवाटीसह हक्क व अधिकारासह तदगभूत वस्तुसह दरोबस्त.

२) अर्जदार न.१ व २ यांचे आजोबा मयत महारु दल्या महाले यांचे दि.१३/०८/२०१५ रोजी रा.उंबरविहीर ता.सुरगाणा जि.नाशिक येथे निधन झाले आहे,त्यांचे पश्चात वर नमूद अर्जदार हे वारस आहेत,तलाठी यांच्याकडे वारस लावण्याकरिता व इतर ठिकाणी सरकारी कामासाठी मे.कोर्टामार्फत वारस दाखल्याची मागणी केली आहे. त्यामुळे अर्जदार यांना वारस दाखल मिळणे आवश्यक आहे, त्याकरिता सदर अर्ज अर्जदार यांनी दाखल केला आहे, त्याचे मृत्यू पश्चात अर्जदार क्र.१ व २ असे कायदेशीर वारस आहेत मयत महारु दल्या महाले यांचे मृत्यू पश्चात तलाठी यांच्याकडे वारस लावण्याकरिता व इतर ठिकाणी सरकारी कामासाठी मा. न्यायालयाकडून वारस दाखला नावे असे सांगितले त्यामुळे अर्जदार यांना वारस दाखला मिळणे आवश्यक आहे, त्याकरिता सदर अर्ज अर्जदार यांनी दाखल केला आहे त्यामुळे अर्जदार यांना वारस दाखला मिळणे आवश्यक आहे, बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १९२७ प्रमाणे मा.न्यायालयाकडून मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे सदर अर्जदार यांचे अर्थ अर्जदार यांना वारस दाखला देण्यात कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **३०** दिवसात अगर **दि.१५/०४/२०२५** रोजी सकाळी अकरा वाजता न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी,अन्यथा हरकत नाही असे समजून अर्जदाराची मागणी ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. **दि.०७/०३/२०२५**

**लिपिक** — **दिवाणी न्यायालय, क, स्तर, दिंडोरी** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक** — **दिवाणी न्यायालय, क.स्तर, दिंडोरी**

### जाहीर नोटीस

**प्रो.जमा** — **ॲड. सचिन पी. गोरवाडकर**

**विशेष दिवाणी दावा नं.८६९/२०२४** **निशाणी - २५**

**नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांचे कोर्टात (मा.ए.जी.बेहेरे सो)**

**मे. निर्मिती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स**
**नोंदणीकृत भागीदारी संस्था यांसी**
**नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता.** उत्तम अपार्टमेंट, फ्लॅट नं.६, कॅनडाकॉर्नर, नाशिक
**तर्फे भागीदार-**
१. **श्री. जयंत बाबुराव भडांगे,** उ. व. ४५, धंदा. व्यवसाय,
२. **श्री. बाबुराव गणपत भडांगे,** उ. व ७५, धंदा. व्यवसाय,
३. **श्री. सुप्रिया जयंत भडांगे,** उ. व ४०, धंदा. व्यवसाय
४. **श्री. विद्या बाबुराव भडांगे,** उ. व ७२, धंदा. व्यवसाय,
सर्व रा. उत्तम अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, कॅनडा कॉर्नर, नाशिक. — **वादी**

**विरूद्ध**

१. **श्री. विजय रतन गायकवाड,** उ. व. ३६ वर्षे, धंदा. व्यापार, रा.फ्लॅट नं.१०४, बी विंग, एकता ग्रिन व्हॅली, पाथर्डीफाटा, नाशिक.
२. **श्री. धीरेन्द्रकुमार तिर्थाचंद पासवान,** उ. व. २२ वर्षे, धंदा. नोकरी, सध्या रा. फ्लॅट नं. २२, वृंदावन अपार्टमेंट, विक्रीकर भवनाजवळ, राधाकृष्ण नगर, पाथर्डीफाटा, नाशिक. **कायमचा पत्ता.** वॉर्ड नं.१४, ग्वालपारा,गोअलपाडा,सुपौल,बिहार राज्य.
३. **श्रीमती गजाबाई उर्फ पुनम अनिल वारे उ. व. ३८ वर्षे, धंदा. गृहीणी,** सध्या रा. फ्लॅट नं. १८, वृंदावन अपार्टमेंट, विक्रीकर भवनाजवळ, राधाकृष्ण नगर, पाथर्डीफाटा, नाशिक. **कायमचा पत्ता.** मु.पो. मादणी, ता. मदानी, जि. यवतमाळ. — **प्रतिवादी**

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुम्ही **२.** श्री. धिरेन्द्रकुमार तिर्थानंद पासवान, रा. फ्लॅट नं. २२, वृंदावन अपार्टमेंट, पाथर्डी फाटा, नाशिक. कायमचा पत्ता. वॉर्ड नं. १४, ग्वालपारा, गोअलपाडा, सुपौल, बिहार राज्य. **३.** श्रीमती गजाबाई उर्फ पुनम अनिल वारे, रा. फ्लॅट नं. १८, वृंदावन अपार्टमेंट, विक्रीकर - भवनाजवळ, राधाकृष्ण नगर, पाथर्डी फाटा, नाशिक, कायमचा पत्ता. मु.पो. मादणी, ता. मदानी, जि. यवतमाळ यांचे विरूध्द मे. कोर्टात प्रस्तुतचा दावा दाखल केलेले आहे. तुम्ही प्रतिवादी यांना मे. कोर्टामार्फत समन्स व नोटीसा पाठविल्या असता, सदर समन्स/नोटीसांची बजावणी होवु शकलेली नाही. ज्याअर्थी वादी यांनी मे. कोर्टाकडे रितसर अर्ज करून दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीनुसार तुमच्यावर दैनिक वर्तमानपत्रात जाहीर समन्स / नोटीस प्रसिध्द करून समन्स/नोटीस ची बजावणी करण्याबाबत आदेश प्राप्त केलेला आहे. ज्याअर्थी तुम्ही प्रतिवादी यांना या जाहिर समन्स/नोटीस द्वारे कळविण्यात येते की, तुमच्या विरुध्द दाखल असलेल्या प्रस्तुत दाव्याची पुढील तारिख १७/०४ /२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमलेली आहे. सदर तारखेस तुम्ही स्वतः अगर वकिलांमार्फत मे. कोर्टात दाखल राहुन तुमचे लेखी म्हणणे सादर करावे. तुम्ही प्रतिवादी सदर तारखेस मे. कोर्टात उपस्थित न राहिल्यास सदर दाव्याचे कामकाज तुमच्या विरूध्द एकतर्फी चालविण्यात येईल.

हे जाहीर नोटीस आज दि. २०/०२/२०२५ माझ्या सहिनिशी आणि न्यायालयाच्या शिक्क्याने दिले असे.

(शिक्का) **अधिक्षक** **मे. दिवाणी न्यायालय, नाशिक**

### जाहीर फारकत नोटीस

**सौ.लक्ष्मी आशा मनोज भोये, द्वारा रवींद्र लक्ष्मण महाले,** रा.हट्टी, ता. सुरगाणा, जि. नाशिक हिस..तुझे व माझे लग्न **तारीखः३१/०५/२०२१** रोजी झालेले असून, आपणास एक मुलगी भाविका ही झालेली आहे तू आजमीतीस माझेपासून गरोदर नाही,लग्नानंतर माझे एकत्र कुटुंबात नांदू लागली, मुलगी होईपावेतो बरी नांदली,त्यानंतर तुझ्या वागणीत फरक पडला व विनाकारण माझ्यासोबत भांडणतंटा करू लागली,सन २०२४ चे महाशिवरात्रीचे यात्रेकरिता मुलगी भाविकेस सोडून, तू तुझे मावस भावाबरोबर माहेरी निघून गेली त्यानंतर तुझा मावस भाऊ व माहेरचे नातेवाईकांनी माझे बरोबर विनाकारण भांडणतंटा केला,तसे तू विनाकारण माहेरी राहते, तुला नांदविणे कामी स्वतः तसेच नातेवाईकांमार्फत प्रयत्न केले,परंतु तू नांदनेस येत नाही व फारकत मागते, माझी तुला नांदविण्याची मनापासून इच्छा असल्याने, दरम्यानच्या काळात मी स्वतः नातेवाईक अन्य वकिलामार्फत नोटीस पाठवून प्रयत्न केले, परंतु नोटीस मिळूनही तू नांदणेस येत नाही व फारकत मागते,यावरून तुला माझ्याबरोबर नांदावयाचे नाही हे स्पष्ट होते, तरी सदर नोटीस प्रसिद्धीपासून **सात** दिवसाच्या आत नांदणेस यावे न पेक्षा तुझे मागणीप्रमाणे व आपले कोकणा समाजाचे चालीरीतीप्रमाणे हीच जाहीर फारकत समजून तो दुसरा घरोबा करण्यास मोकळे होऊ कळावे ही जाहीर फारकत नोटीस, **ता.०७/३/२०२५**

**सही/- मनोज कांतिलाल भोये,**
**रा. मांगधे, ता.सुरगाणा जि.नाशिक**

आमचे मार्फत प्रसिद्ध

**सुनील माणिकराव पाटील**
**ॲडव्होकेट, दिंडोरी कोर्ट दिंडोरी**

### टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे नाशिक शहर-४** शिवारातील ना.म.पा.हद्दीतील **श्री सिध्दी विनायक सहकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत** मधील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी **सर्व्हे नं. ८७४/३/१२, यांसी प्लॉट नं. १२ यांसी क्षेत्र. ४१८.०६ चौ.मी.** पैकी अविभक्त अंशतः अर्ध्या हिस्स्याचे संपूर्ण **क्षेत्र.२०९.०२ चौ.मी.** यांसी चतु:सीमा रेकॉर्ड ऑफ राईटस्प्रमाणे. उपरोक्त मिळकत सदर संस्थेचे सभासद **सविता सोमनाथ गोरे व वर्षा नागेश आव्हाड** यांच्या मालकीची असून मालकी हक्काने कब्जा वहिवाटीत व उपभोगात आहे. उपरोक्त मिळकतीचे टायटल निर्वेध व बिनबोजाचे आहे. असे विश्वासाने सांगून मिळकत विक्री करणे कामी आमचे पक्षकारांबरोबर बोलणी करून व्यवहार निश्चित केला असून विसाराची रक्कम स्विकृत केली आहे. तत्राप मिळकतीचे टायटल निर्वेधपणाबाबत खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द करण्यास सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिज, लिन, अन्नवस्त्र, तारण, पोटगी, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, जामीन, जप्ती, कुळ, वारस, भाऊ हिस्सा, वाटणी, अदलाबदल, करार, न्यायालयीन वाद, नजराणा, सोसायटी बोजा किंवा इतर बोजा लेखी अथवा तोंडी करार, वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत नमूद केलेल्या पत्यावर कागदपत्रांच्या पुराव्यानिशी हरकती नोंदवाव्यात अन्यथा उपरोक्त मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल. मुदतीनंतर व लेखी पुरावा नसलेली हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेली जाहीर हरकत उपरोक्त मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी कळावे ही नोटीस. **दि.०५/०३/२०२५.**

**फटांगरे लिगल करीता**
**ॲड. कुणाल एम. फटांगरे, ॲड. गरीमा जोशी-फटांगरे**
**४४ प्रधान पार्क, एम.जी रोड, नाशिक. फोन नं. २५७३४४९**


## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे.
**संपर्क-९८६०१३६५३६**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे. श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक.
**संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे.
**८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

---

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### पाहिजेत

महात्मा नगर (नाशिक) येथे बंगल्यासाठी विवाहित चौकीदार जोडप्याची गरज आहे. माणसाला ड्रायव्हिंगचा अनुभव असल्यास मदत होईल. स्त्रीला घरकामात मदत करावी लागेल. बंगल्याच्या परिसरात राहण्याची सोय केली जाईल. वयोमर्यादा: ४० वर्षांपर्यंत. **९६५७०४९९९१** वर संपर्क साधावा.

---

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/८४८४८१०५५३

---

### पाहिजेत

बा.ब.बहुउद्देशीय संस्था संचलित, डिस्कव्हरी पब्लिक स्कूल, वडाळीभोई, खंडेराव मंदिराजवळ, ता.चांदवड, जि.नाशिक
**मुख्याध्यापक-** १ पद, **शिक्षक-** ९ पद, **सफाई कामगार-**१ पद, सिक्युरिटी गार्ड-१ पद, **वाहनचालक (वाहनासह)**-५ पद
**मुलाखत- वरील स्थळी**
दिनांक २१/०२/२०२५ ते दिनांक २५/०२/२०२५. वेळ स.११ ते ४
**संपर्क- ९४२२२५३०८४/ ९३७०४२२१२२**

### पाहिजेत

नामांकीत डेअरी प्रॉडक्ट कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे आहे.
संपर्क- **77750001666**

---

आश्रमशाळा, कन्येशाळेसाठी त्वरित लेडीज शिक्षिका पाहिजेत, निराधार, घटस्फोटीत, विधवा महिलांना प्राधान्य.
व्हॉटस्अप-**8862008788** वर फोटोसहीत त्वरित माहिती पाठवा.

### विकणे आहे

बोरगड नाशिक येथील १५३ वार जागेत ४ BHK कॉर्नर रो बंगलो त्वरित विकणे आहे.
संपर्क : **९५६१०४९४६१**

---

शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

### ज्योतिष

गायत्री ज्योषित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### वधू पाहिजे

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क-** ९३५९८०७२३१

### Name changed

I Have Changed My Name from Manisha Rajendra Kale to **Manisha Rajaram Kale** As Per **Affidavit No-12AA 130019**

---

I NO-JC392389P RANK NB SUB NAME BORSE MANOJKUMAR MOTIRAM S/O MOTIRAM UNIT- 14COSR C/O 56 APO HAVE CHANGED MY SPOUSE NAME FROM SHARDA SAHEBRAO TO **SHARDA MANOJKUMAR BORSE**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**

## महत्त्वाचे


### आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आजी-आजोबांचे स्नेहसंमेलन




**नाशिक :** मविप्र संचलित वणी येथील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आजी-आजोबांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. सर्वप्रथम मुख्याध्यापिका एस. डी. काळे यांनी उपस्थित आजी -आजोबांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गुलाबपुष्प देऊन व औक्षण करून आजी-आजोबांचे स्वागत करण्यात आले. प्री-प्रायमरीची विद्यार्थिनी कु. अनुजा बापू महाले हिने आपल्या नृत्यातून आजी-आजोबांविषयीच्या भावना सर्वांसमोर सादर केल्या. त्यानंतर सहशिक्षिका रुक्मिणी शर्मा यांनी प्रास्ताविक केले. नातवांनी आपापल्या आजी आजोबांबरोबर सेल्फी पॉइंटमध्ये फोटो क्लिक केले. प्लास्टिक चहाच्या कपांचा मनोरा तयार करणे, संगीत खुर्ची असे मजेशीर खेळ खेळत नातवांबरोबर आजी आजोबांनी मजेशीर खेळांचा आनंद लुटला. संगीत खुर्ची या स्पर्धेत पालक आजी खडताळे, कुमुद गडलिंग व कल्पना कड तर पालक आजोबांमध्ये आत्माराम जाधव, रविकांत बर्डे व दत्तात्रेय महाले हे विजेते ठरले. त्यानंतर उपस्थित पालकांमधून रवीकांत बर्डे व आत्माराम जाधव यांनी या कार्यक्रमाविषयीच्या भावना मनोगताद्वारे व्यक्त केल्या. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनी कु. झीनत शेख व यशश्री लोंढे यांनी सूत्रसंचालन केले.

### यशवंतराव चव्हाण केंद्र-मविप्रतर्फे १५ मार्च रोजी 'आठवणीतील साहेब'

**नाशिक :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त येथील यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नाशिक आणि मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'आठवणीतील साहेब' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



मधुकर भावे ज्येष्ठ पत्रकार | अरुण शेवते लेखक | ॲड. विलास लोणारी माजी आमदार

शनिवार दिनांक १५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता गंगापूर रोडवरील आयएमआरटी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत लेखक, ज्येष्ठ पत्रकार, राजकीय अभ्यासक हे दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या देदीप्यमान कार्यकाळाचा आढावा मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे सरचिटणीस तथा यशवंतराव चव्हाण सेंटर नाशिक केंद्राचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे असतील. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे हे 'समाजकारण, राजकारण आणि यशवंतराव' या विषयावर, लेखक अरुण शेवते 'साहित्य संस्कृती आणि यशवंतराव' या विषयावर तर माजी आमदार ॲड. विलास लोणारी 'नाशिक आणि यशवंतराव' या विषयावर भाष्य करणार आहेत. सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटरचे नाशिक अध्यक्ष व मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव डॉ. अशोक पिंगळे, विक्रांत मते, ॲड. राजेंद्र डोखळे, सुरेखा बोऱ्हाडे, मनिष लोणारी, समन्वयक भूषण काळे, गणेश ढगे यांनी केले आहे.

### मुंगसरे येथे आज वारकरी फलकाचे अनावरण

**नाशिक :** अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप गुरुवर्य सुधाकर महाराज इंगळे यांचे गाव तेथे वारकरी फलक या उपक्रमांतर्गत मुंगसरे येथे हनुमान मंदिराजवळ दि.८ मार्च शनिवारी सकाळी ९ वा.धर्मभुषण रामनाथ महाराज धोंडगे दुगावकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी येथील सामाजिक कार्यकर्ते राजाराम पा. फडोळ, सभापती विष्णुपंत म्हैसधुने, श्री हभप रावसाहेब महाराज लोणारे, हभपश्री विठ्ठल महाराज जाधव वैजापूरकर, पो.पा.श्री हभप बबनराव म्हैसधुने, उपाध्यक्ष हभपश्री विलास महाराज सांगळे, सचिव हभपश्री साहेबराव महाराज अनवट, हभपश्री एकनाथ महाराज भोर, हभपश्री दत्तात्रय फडोळ, जिल्हा सदस्यः हभपश्री उध्दव महाराज बिराजदार कर्नाटककर, जिल्हा कोषाध्यक्ष हभपश्री दिनकर महाराज खांडबहाले, संपर्कप्रमुख हभपश्री शिवाजी महाराज खांडबहाले, तालुकाध्यक्ष हभपश्री हिरामण महाराज म्हैसधुने, रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष हभपश्री निवृत्ती महाराज कापसे, तालुका संघटक हभपश्री भास्कर महाराज ढगे, सहसंघटक हभपश्री संजय महाराज बोढाई, युवा समिती तालुकाध्यक्ष हभपश्री बाळासाहेब गायकर, युवा समिती तालुका उपाध्यक्ष हभपश्री गणेश महाराज अनवट यांचे प्रमुख उपस्थितीत वारकरी फलक अनावरण करून नाशिक जिल्हा वारकरी भाविक सांगोला, जि. सोलापूर वारकरी संमेलनासाठी पंढरपूरकडे रवाना होणार आहे, अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष हभपश्री भरत महाराज वाघ शिवडा यांनी दिली आहे. कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी केले आहे.

### मविप्र विधी महाविद्यालयात जिल्हास्तरीय कौशल्य कार्यशाळा

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विधी महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळामार्फत आयोजित विद्यार्थी विकास कौशल्य कार्यशाळेच्या चार सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना चौघा तज्ज्ञांनी वक्तृत्व, नेतृत्व, चारित्र्य आणि कर्तृत्वाचे धडे दिले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात ॲड. मनीषा भामरे यांनी विद्यार्थ्यांना 'लाइफ स्किल' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात कौन्सिलर मधुरा क्षेमकल्याणी यांनी 'स्टेज डेरिंग' आणि 'पब्लिक स्पिकिंग स्किल' या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना थेट व्यासपीठावर बोलते केले.

# 'आदिवासी विकास'च्या ४५९ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा

## विभागीय परीक्षेचा निकाल विक्रमी वेळेत जाहीर

**नाशिक:प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० कलमी कार्यक्रमांतर्गत आदिवासी विकास विभागाने पहिल्या १०० दिवसांसाठी कामाचा आराखडा तयार केला आहे. त्याअंतर्गत जानेवारी-२०२५च्या दुसऱ्या आठवड्यात कर्मचाऱ्यांची विभागीय परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल विक्रमी वेळेत जाहिर करण्यात आला असून, ४५९ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यात सेवाप्रवेशोत्तरच्या ३२२ तर अर्हताकारीच्या १३७ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

> कर्मचाऱ्यांना पदोन्नती व वेतनवाढीसाठी खात्यांतर्गत अर्थात विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असते. प्रलंबित विभागीय परीक्षा १०० कलमी कार्यक्रमांतर्गत घेण्यात आली होती. परीक्षा सुरळीत पार पडल्यानंतर परीक्षार्थींना निकालाचे वेध लागले होते. विक्रमी वेळेत निकाल लागल्याने कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे.
> **-लीना बनसोड,** आयुक्त, आदिवासी विकास विभाग

सेवाप्रवेशोत्तर परीक्षार्थी कर्मचाऱ्यांमध्ये कनिष्ठ लिपिक तर अर्हताकारी परीक्षार्थी कर्मचाऱ्यांमध्ये वरिष्ठ लिपिक, उपलेखापाल, संशोधन सहायक, आदिवासी विकास निरीक्षक, वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक आदींचा समावेश आहे. सेवाप्रवेशोत्तर कर्मचाऱ्यांना ५ तर अर्हताकारी कर्मचाऱ्यांना ४ पेपर द्यावे लागले. प्रत्येक पेपर १०० गुणांचा होता.

आदिवासी विकास विभागाकडून पात्र सेवाप्रवेशोत्तर तसेच अर्हताकारी कर्मचाऱ्यांसाठी त्र्यंबकेश्वर रोडवरील ब्रम्हा व्हॅली शैक्षणिक संकुलातील केंद्रावर विभागीय परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेसाठी राज्यातून सेवाप्रवेशोत्तरचे ४६० तर अर्हताकारीचे १६० कर्मचारी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सेवाप्रवेशोत्तरच्या ५३ तर अर्हताकारीच्या १८ कर्मचारी परीक्षेला गैरहजर होते. सेवाप्रवेशोत्तरचे ३२२ तर अर्हताकारीचे १३७ कर्मचारी उत्तीर्ण झाले आहे. सेवाप्रवेशोत्तरचे ८५ तर अर्हताकारीचे ५ कर्मचारी अनुत्तीर्ण झाले आहे.

दरम्यान, आदिवासी विकास आयुक्तालय स्तरारून परीक्षा आणि उत्तरपत्रिका तपासणीचे नियोजन करण्यात आले होते. परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी आणि निकालासाठी अपर आयुक्त (मुख्यालय) संदीप गोलाईत, सहआयुक्त दिनकर पावरा, किरण माळी, उपायुक्त (प्रशासन) शशिकला अहिरराव, सहायक आयुक्त दिलीप खोकले यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. अतिशय कमी वेळेत निकाल लागल्याने परीक्षार्थी कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



## 'कायद्या'च्या विद्यार्थ्यांना 'खाकी'कडून शाबासकीची थाप

### मविप्र विधी महाविद्यालयाकडून वाहतूक नियमांचा जागर

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाजाचे विधी महाविद्यालय, नाशिक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि नाशिक शहर वाहतूक शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विधी सहाय्य विभागाच्या स्वयंसेवकांनी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहतूक नियमांबाबत जनजागृती केली होती. त्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या वतीने या सर्व स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.**

नाशिक शहरातील विविध सिग्नल परिसरात थांबून स्वयंसेवकांनी वाहतूक नियमांबाबत जनजागृती मोहिमा राबविल्या. या ठिकाणी घोषणा फलकाद्वारे, तसेच, प्रत्यक्ष वाहनचालकांना सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक नियम कसे महत्त्वाचे आहेत, हे समजावून सांगण्यात आले होते. सिग्नलचा वापर करा, सीट बेल्ट नियमित लावा, गाडी चालवताना मोबाइलचा वापर करू नका आदी नियम सांगण्यासाठी पथनाट्यासह विविध उपक्रम घेण्यात आले. याबद्दल पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त चंद्रकांत खांडवी, उपआयुक्त किरणकुमार चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव केला.

यावेळी पोलीस कर्मचारी, मविप्रचे विद्यार्थी उपस्थित होते.




## मविप्र विधी महाविद्यालयात कौशल्य कार्यशाळा

### विधीच्या विद्यार्थ्यांना वक्तृत्व, नेतृत्व, चारित्र्य, कर्तृत्वाचे धडे

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विधी महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळामार्फत आयोजित विद्यार्थी विकास कौशल्य कार्यशाळेच्या चार सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना चौघा तज्ज्ञांनी वक्तृत्व, नेतृत्व, चारित्र्य आणि कर्तृत्वाचे धडे दिले.**

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात ॲड. मनीषा भामरे यांनी विद्यार्थ्यांना 'लाइफ स्किल' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात कौन्सिलर मधुरा क्षेमकल्याणी यांनी 'स्टेज डेरिंग' आणि 'पब्लिक स्पिकिंग स्किल' याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना थेट व्यासपीठावर बोलते केले. तृतीय सत्रात डॉ. वृषाली सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना 'संवाद कौशल्य आणि त्यातून घडणारे व्यक्तिमत्त्व' याविषयावर सखोल मार्गदर्शन केले. चौथ्या आणि शेवटच्या सत्रात डॉ. वृषाली घारगे-पाटील यांनी 'चारित्र्य उभारणी' या विषयावर विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.

संपूर्ण कार्यशाळा ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सांगितलेल्या नियमानुसार आणि झिरो प्लास्टिक पॉलिसीनुसार आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, एसपीएच हिरे विधी महाविद्यालय पंचवटी तसेच नवजीवन विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. कुमारी अश्विनी पाटील हिने सूत्रसंचालन केले, तर रवींद्र पवार या विद्यार्थ्याने आभार मानले. कुमारी साक्षी झेंडे, अर्पिता चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यशाळा ही विद्यार्थी केंद्रित आणि विद्यार्थी सहभागातून यशस्वीरित्या पार पाडली. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्र डॉ. वृषाली घारगे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. विलास देशमुख आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. शिल्पा गांगुर्डे यांनी या कार्यशाळेचे नियोजन केले. या कार्यशाळेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नोकरी देणारे विद्यार्थी तयार व्हावेत : ॲड. ठाकरे

### मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकमध्ये स्पार्क-२०२५

**नाशिक : प्रत्येक विद्यार्थ्याने शाळा व महाविद्यालयीन जीवनात मिळालेली शिकवण आयुष्यभर लक्षात ठेवली पाहिजे. स्वतः च्या पायावर उभे राहून आपले नाव उंचावण्याचा प्रयत्न करा. त्याचबरोबर महाविद्यालयातून नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे विद्यार्थी तयार व्हावेत, अशी अपेक्षा मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी व्यक्त केली.**

मविप्र संचलित राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन (स्पार्क २०२५) व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण पवार, सदस्य संजय अहिरराव, कमलेश उशीर, रवींद्र कळवणकर, अशोक गायकवाड, क्षीरसागर, शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

महाविद्यालयात विविध डेज आणि क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांनी विविध एकल व सांघिक नृत्य, एकपात्री नाटक, काव्यवाचन, एकपात्री विनोद, ऑर्केस्ट्रासोबत अनेक गाणी सादर केली. कार्यक्रमादरम्यान प्रा. अजित पाटील, निलम अथरे, उमा जगळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्राचार्य प्रशांत पाटील यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. प्राचार्य प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्पार्क समन्वयक प्रा. पी. डी. बोरस्ते व प्रा. एस. एन. शेळके यांनी नियोजन तर प्रा. एस. एस. आहेर व प्रा. वर्षा बगदाणे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. शेळके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




## प्रणालीमुळे पर्यावरण संवर्धनाला हातभार : डॉ. पवार

### आयएमआरटीमध्ये परीक्षाविषयक देयके ऑनलाइन प्रशिक्षण कार्यशाळा

**नाशिक : परीक्षाविषयक देयके ऑनलाइन पद्धतीने भरण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तयार केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीमुळे मनुष्यबळ आणि वेळेची मोठी बचत होणार आहे. महाविद्यालये परीक्षेची देयके वेळेत सादर करू शकतील. त्यामुळे सर्वांना परीक्षेचे मानधन वेळेत अदा होणार आहे. शिवाय कामकाज पेपरलेस होणार असल्याने पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. धोंडीराम पवार यांनी केले.**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वित्त व लेखा विभाग आणि मराठा विद्या प्रसारक समाज संचलित व्यवस्थापन, संशोधन आणि तंत्रज्ञान संस्था (आयएमआरटी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'परीक्षाविषयक देयके ऑनलाइन पद्धतीने भरण्याचे प्रशिक्षण' या कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्र परिसर समितीचे सदस्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ. एस. एस. काळे, प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ. आर. एस. भांबर, सिनेट सदस्य ॲड. बाकेराव बस्ते, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्र नाशिकचे सहाय्यक कुलसचिव श्रीपाद बुरकुले, वित्त व लेखा विभागाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. मयूर चोरडिया उपस्थित होते.

याप्रसंगी सर्वांना नवीन संगणकीय कार्यप्रणालीचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. श्रीपाद बुरकुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रवीण रायते यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले. या कार्यशाळेस नाशिक जिल्ह्यातील २५० महाविद्यालयांतील परीक्षा अधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यापीठातील वित्त व लेखा विभाग आणि आयएमआरटी महाविद्यालयाने पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या या प्रशिक्षण कार्यशाळेबद्दल सर्व उपस्थित परीक्षा अधिकारी आणि कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

## मुक्त विद्यापीठात देशभरातील मुक्त विद्यापीठांच्या कुलगुरू परिषदेचा समारोप

**नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात देशभरातील सर्व सार्वजनिक मुक्त विद्यापीठांच्या कुलगुरूंची चौथी दोन दिवसीय गोलमेज परिषद झाली. त्यात भारतीय सार्वजनिक मुक्त विद्यापीठ महासंघाची स्थापना करण्यात आली असून, तसा ठराव या परिषदेत एकमताने पारित करण्यात आला.**

या महासंघाची रूपरेषा, उद्दिष्ट्ये व कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली एक पाच सदस्यीय अंतरिम समिती बनवण्यात आली आहे. याशिवाय विशेष म्हणजे विद्यापीठाने आपल्या विद्यार्थी परीक्षा व मूल्यांकन यामध्ये ब्लॉकचेन पद्धतीचा अंगीकार करून आणलेल्या पारदर्शकतेचे सर्वच कुलगुरूंनी कौतुक केले. या पद्धतीचा नव्याने निर्मित 'मुक्त विद्यापीठ महासंघा'द्वारे देशातील सर्व मुक्त विद्यापीठांसाठी अंमलबजावणी करण्याचे सूतोवाच यावेळी करण्यात आले. कॅनडा येथे आंतरराष्ट्रीय मुख्यालय असलेल्या कोल-सेमकाचे नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कार्यालय व मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व ७ मार्च २०२५ रोजी ही परिषद विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. विद्यापीठाच्या 'यश-इन आंतराष्ट्रीय परिषद केंद्र' येथे झालेल्या या परिषदेत श्रीलंका व बांगलादेश येथील मुक्त विद्यापीठांच्या कुलगुरूंसह देशभरातील सार्वजनिक मुक्त विद्यापीठांचे एकूण १४ कुलगुरू, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील वरिष्ठ शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.

## यशाचे शिखर गाठण्यासाठी सातत्याने परिश्रम आवश्यक : रुद्रे

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**माता-पित्यांचे अपार कष्ट आणि गुरुजनांची शिकवण यांचे संस्कार घेत आपण घडत असतो. जीवनात यशाचे सर्वोच्च शिखर गाठायचे असेल तर सातत्याने परिश्रम आवश्यक आहेत, असे प्रतिपादन सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी राजेश रुद्रे यांनी केले.**




**नासाका विद्यालयात अधिकारीपदांवर निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांसह प्रमुख पाहुणे कवी शरद आडके, मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी आदींसह शिक्षक आणि कर्मचारी.**

पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात विविध पदांवर नियुक्त झालेल्या माजी विद्यार्थी सन्मान सोहळ्यात सन्मानाला उत्तर देताना ते बोलत होते. मंचावर सन्मानार्थी विद्यार्थ्यांसह प्रमुख पाहुणे कवी शरद आडके, श्रीमती बकुळाबाई रुद्रे, चंद्रभान गायधनी, दिलीप ठुबे, सुरेश शिरोळे, मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी, लहू पूर्णे, नवनाथ होगाडे आदींसह शिक्षक-कर्मचारी उपस्थित होते.

माजी विद्यार्थी आणि सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी राजेश रुद्रे यांच्यासह विविध पदांवर निवड झालेल्या समाधान ठुबे (नौदल), संदीप शिरोळे (पोलीस), प्रवीण गायधनी (केंद्रीय सुरक्षा बल), विजय रुद्रे (पोलीस) या गुणवंतांचा विद्यालयाच्या वतीने पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारार्थी गुणवंतांनी आपल्या यशात विद्यालयातील गुरुजन आणि आपल्या परिवाराचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. कवी शरद आडके आणि मुख्याध्यापक अरुण पगार यांनीही गुणवंतांचे कौतुक केले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## कोरोनानंतर प्रथमच द्राक्षाला यंदा चांगला भाव

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**कोरोनामध्ये द्राक्षाचे दर मोठ्या प्रमाणावर कोसळल्यानंतर शेतकऱ्यांना अक्षरशः शेतातच द्राक्षे सोडून द्यावी लागली होती. त्यानंतर पाच ते सहा वर्षांनंतर प्रथमच द्राक्ष बागायतदारांच्या द्राक्ष पिकाला चांगले दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये थोडे फार का होईना समाधानाचे वातावरण बघायला मिळत आहे.**

> कोरोनामध्ये पाच ते सहा रुपये किलोने द्राक्ष विकावे लागले होते. त्यामुळे पाच ते सहा वर्षे द्राक्षबागा तोट्यात जात असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी द्राक्षबागा तोडल्या. पर्यायाने सध्या बाजारपेठेत द्राक्षाची मागणी वाढली असून, आवक कमी असल्याने द्राक्षांना दर चांगला मिळत आहे.
> **-संजय गायधनी,** शेतकरी (कृषी मित्र, पळसे)



यंदाच्या वर्षी बहुतांश द्राक्षबागांवर घडाची संख्या कमी असल्याने पर्यायाने एकरमध्ये १०० ते १२० क्विंटल सरासरी माल निघतो. मात्र यंदा एका एकरमध्ये केवळ ४० ते ५० क्विंटल द्राक्ष निघत आहेत. त्यामुळे एकूणच द्राक्षाचे उत्पादन घटण्याची चिन्हं आहेत. पर्यायाने भाव जरी चांगला असला पण एक एकरमध्ये कमी माल निघत असल्याने शेतकऱ्यांना पैसे होत नाही पण यंदा थॉमसन ५५ ते ६० रुपये किलोला भाव मिळत आहे तसेच सोनाका ६५ ते ७० रुपये किलोला दर आहे. तसेच काळ्या द्राक्षांना किलोला १०० ते १२० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी द्राक्ष कमी असल्याने पर्यायाने दर चांगला मिळत आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये कोरोनापासून पाच ते सहा वर्षांपूर्वी द्राक्षशेती प्रचंड तोट्यात सुरू होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्ष बागा तोडल्या तसेच यावर्षी उष्णता ही प्रचंड प्रमाणात असल्याने गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली व उत्तर प्रदेश या सर्वच राज्यांच्या बाजारपेठेत द्राक्षाला मोठी मागणी आहे. त्यामुळे व्यापारी वर्ग मात्र द्राक्षबागांचा शोध घेत आहे. तसेच यावर्षी द्राक्षाला वातावरणात चांगले असले तरी द्राक्ष उत्पादन कमी असल्याने चांगला आहे.

## महत्त्वाचे

### श्री दत्त मंदिरातून चांदीचा मुकुट अज्ञात चोरट्यांनी चोरला

**लासलगाव :** लासलगाव येथील विंचूर रोडवर असलेल्या श्री दत्त मंदिरातून १५० ग्रॅम वजनाचा ११ हजार रुपये किमतीचा चांदीचा मुकुट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून, दिनांक ६ गुरुवार रोजी पहाटे दोन ते चार वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी श्री दत्त महाराजांच्या मूर्तीवरील १५० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट चोरून नेला. या घटनेमुळे लासलगाव परिसरामध्ये खळबळ उडाली आहे. देवाचे अलंकारही चोरट्यांना अपुरे पडल्याचे या घटनेवरून दिसून आले. विशेष म्हणजे, पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर असलेले अत्यंत गजबजलेल्या ठिकाणी असे दत्त मंदिर लासलगाव-विंचूर रोडवर आहे. याबाबत श्रीराम मंदिर ट्रस्टचे विश्वस्त सुरेश वडनेरे यांनी लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिलेली आहे. पुढील तपास लासलगाव पोलीस करीत आहे.

### ईस्ट वेस्ट इंडिया कंपनीतर्फे वेहेळगाव शाळेस शौचालय लोकार्पण




**नांदगाव : प्रतिनिधी**

ईस्ट वेस्ट इंडिया प्रा. लि. कंपनीच्या चाइल्ड केअर प्रोग्राम कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा वेहेळगाव येथे शाळेसाठी शौचालय बांधून देण्यात आले. या शौचालय कामाचे लोकार्पण प्रमुख अतिथी वैशाली आवारे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी कंपनीचे अधिकारी रूपेश लाहोणकर, दत्ता जाधव, योगेश थोरात उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रमोद भाबड, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पाटील, वेहेळगाव वि.का. सोसायटी संचालक गोकुळ सांगळे आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी सागर भाबड, आनंद ताडगे व रघुनाथ भाबड यांनी कंपनीच्या कामकाजाबद्दल कौतुक केले व भविष्यात अशाप्रकारचे उपक्रम राबविण्यात यावे, अशी मागणी केली. दत्ता जाधव यांनी भविष्यात अशाप्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे नियोजन सुनील शिंत्रे, विश्वास काकड, मधुर चांदवडे, संदीप भाबड यांनी केले.

### वडाळीभोईत आज छावा चित्रपटाचे आयोजन

**सोग्रस :** वडाळीभोई येथे महिला दिनानिमित्त सप्तशृंगी महिला मंडळातर्फे छावा चित्रपटाचे आयोजन करण्यात आले आहे. पद्मावती मंगल कार्यालय, वडाळीभोई येथे शनिवार (दि.८) रोजी सायंकाळी सात वाजता या चित्रपटाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांचा विशेष सत्कार प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत महिला दिनानिमित्त करण्यात येणार आहे. कार्यक्रमास सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सप्तशृंगी महिला मंडळाने केले आहे.

### वेळापूर येथे जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी अक्षय गरुड

**लासलगाव : वार्ताहर**



वेळापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अक्षय गरुड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येथील समाजमंदिरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची बैठक ग्रामपंचायत सदस्य दुर्गेश गरुड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अक्षय गरुड, उपाध्यक्ष आकाश ढाले, कार्याध्यक्ष रूपेश रत्नपारखे, खजिनदार राहुल गरुड, सचिव संकेत गरुड यांची जयंती उत्सव समितीच्या कार्यकारिणीत सर्वानुमते निवड करण्यात आली.

## निधन वार्ता

### पत्रकार अजय भोसले यांना मातृशोक



**नाशिक :** मालेगाव येथील सेवानिवृत्त नायब तहसीलदार कै. व्ही. एम. भोसले यांच्या पत्नी श्रीमती रत्नप्रभा वसंतराव भोसले (८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात प्रा. संजय, पत्रकार अजय व राजेश अशी तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मालेगाव-कॅम्प येथे सकाळी ११.३० वा.अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

### विश्वास वेल्हाणकर



**नाशिक : प्रतिनिधी**

म्हसरूळ परिसरातील विश्वास श्रीकृष्ण वेल्हाणकर (७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा , सून व पत्नी आणि एक नातू असा परिवार आहे.

### राजेंद्र टाटिया



**नाशिक :** येथील राजेंद्र शेषमल टाटिया (६४ ) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रसन्न टाटिया यांचे ते वडील होत.

### चंद्रभागा आगळे




**नाशिकरोड : प्रतिनिधी**

पळसे येथील रहिवासी चंद्रभागा भिकाजी आगळे (७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्या नंदू व विकास आगळे यांच्या आई होत.

# नार-पार खोऱ्यातील ९.७६ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणार

**माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नावर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची सभागृहात माहिती**

**लासलगाव : वार्ताहर**



**पार-तापी-नर्मदा हा आंतरराज्यीय प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे नार-पार-औरंगा-अंबिका खोऱ्यात ९.७६ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून, हे सर्व पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी काल विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नावरील उत्तरात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माहिती दिली.**

पार-गोदावरी एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याबाबत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले की, पार-तापी-नर्मदा हा आंतरराज्य प्रकल्प रद्द करून घेतल्यामुळे नार-पार खोऱ्यातील शिल्लक ४.६७ टीएमसी आणि उपसा सिंचन योजना क्रमांक ३ आणि ४ चे जे काही ३ टीएमसी आणि नार-गिरणा नदी जोड प्रकल्पाला जाणार नाही असे उरलेले सर्व पाणी एकत्रित करून पार-गोदावरी हा राज्यांतर्गत एकात्मिक नदी जोड प्रकल्प राबविला जाणार आहे का? या प्रकल्पासाठी ज्या काही पायाभूत सुविधा लागणार आहे, त्या आपण मांजरपाडा योजनेच्या माध्यमातून आधीच करून ठेवल्या आहे. डोंगराला ९.५० किमी बोगदा तयार आहे. याच बोगद्याद्वारे पार -गोदावरीचे पाणी पुणेगाव धरणातून पुणेगाव-दरसवाडी-डोंगरगाव कालव्याद्वारे आपण दिंडोरी-चांदवड-येवला आणि संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर-गंगापूर या दुष्काळी भागात नेणार आहोत. जवळजवळ २५२ कोटी निधीमधून या कालव्याच्या लाइनिंगचे काम सुद्धा अंतिम टप्प्यात आहे. म्हणजेच पाणी वळविण्यासाठी आणि वाहून नेण्यासाठी सर्व सुविधा तयार आहे.

या पार-गोदावरी राज्यांतर्गत एकात्मिक नदी जोड प्रकल्प योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची जबाबदारी कोणावर सोपवली आहे? हा (सविस्तर प्रकल्प अहवाल) कधीपर्यंत (राज्य तांत्रिक सल्लागार समिती) सादर होईल? त्याचप्रमाणे पायरपाडा आणि गुगुळ या प्रवाही वळण योजनांचे पाणी पुणेगाव धरणात आणले जाणार आहे काय? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

या प्रश्नाच्या उत्तरात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, पार -तापी नर्मदा गोदावरी प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे नार-पार-औरंगा-अंबिका खोऱ्यात ९.७६ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून, हे सर्व पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी हायड्रोलॉजी विभागाला यासंदर्भातील सर्वेक्षण करण्याचे आदेश दिलेले आहेत. यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून तीन महिन्यांत हे सर्वेक्षण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी ड्रोनचा वापर करून जलद गतीने हे काम मार्गी लावण्यात येईल. एकूण ३० वळण योजना प्रस्तावित असून, १४ योजनांची कामे पूर्ण केली असून, ८ वळण योजनांची कामे सुरू आहे. या सर्व योजनांचा एकत्रित विचार करून विकास करण्यात येत असून, दिंडोरी तालुक्यासाठी पायरपाडा व गुगुळ योजना राबविण्यात येत असून, छगन भुजबळ यांच्या मागणीप्रमाणे हे पाणी पुणेगाव धरणात वळविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## मनविसेच्या दणक्यानंतर संदीप फाउंडेशन उचलणार जखमी विद्यार्थ्यांचा खर्च

**नाशिक : प्रतिनिधी**

**मनसे विद्यार्थी सेना आणि महिला आघाडी सेनेच्या प्रयत्नानंतर संदीप फाउंडेशन जखमी विद्यार्थ्यांच्या उपचाराचा खर्च उचलणार आहे.**




संदीप फाउंडेशन येथे मधमाशांचे मोहोळ पडल्याने विद्यार्थ्यांना मधमाशांनी मोठ्या प्रमाणात चावा घेतला. यात संदीप फाउंडेशनचे जवळपास ४० विद्यार्थी जखमी झाले. त्यातील पंधरा-वीस जणांना जवळच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले असता काही विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच मनसे विद्यार्थी व महिला सेनेने हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट दिली. जखमी विद्यार्थ्यांचा खर्च त्यांच्या पालकांना करायला लावला होता. मनसे विद्यार्थी सेना आणि महिला आघाडीने हा विषय घेऊन संदीप फाउंडेशन येथे जाऊन तेथील निकम यांना याबाबत विचारणा केली.

तसेच संदीप फाउंडेशनने त्या विद्यार्थ्यांना फक्त हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यानंतर त्यांची कोणत्याही प्रकारे काळजी घेतली नाही असे निदर्शनास आले. मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी जखमी विद्यार्थ्यांचा खर्च महाविद्यालय प्रशासनाने उचलावा, अशी मागणी केली. त्यानंतर विद्यार्थ्यांचा दवाखान्याचा संपूर्ण खर्च कॉलेज करेल, असे आश्वासन महाविद्यालय प्रशासनाने मनसेला दिले. तसेच महाविद्यालय प्रशासनाकडून दवाखान्यात फोन करून कोणत्याही विद्यार्थ्यांकडून त्याबाबत पैसे घेऊ नये, असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना सर्वांना मदत केली जाईल, असे मनसे विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाला सांगितले. यामुळे मनसेने घेतलेल्या आंदोलनाला यश आले आणि सर्व पालकांनी त्यांचे मनापासून मनसे विद्यार्थी सेना आणि महिला सेनेच्या शिष्टमंडळाचे अभिनंदन केले. यावेळी मनसे महिला आघाडी शहराध्यक्ष अक्षरा घोडके, अश्विनी बैरागी, मनसे विद्यार्थी सेनेचे प्रदेश कार्यकारिणी शशिकांत चौधरी, बाजीराव मते, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहराध्यक्ष ललित वाघ, रोहित उगावकर, वैभव राउंदल, दर्शन बोरसे आदी उपस्थित होते.

## माणुसकी फाउंडेशनतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त रणरागिणी पुरस्कार : निकाळे

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**येथील माणुसकी फाउंडेशनतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा रणरागिणी पुरस्कार देऊन सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक सागर निकाळे यांनी दिली आहे.**

निफाड येथील बाजार समिती सभागृहात रविवारी (दि. ९) दुपारी तीनला हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमासाठी गाढवाचं लग्न फेम सुप्रसिद्ध मराठी अभिनेते संजय खापरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. निफाड तालुक्यातीलच नव्हे, तर जिल्हाभरातील शेती, राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, प्रशासकीय, उद्योजक, विधिज्ञ, उत्कृष्ट गृहिणी यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान होणार आहे.

परीक्षक म्हणून ज्ञानेश्वर तासकर (कवी), पत्रकार रामभाऊ आवारे, बावा गिते, किरणकुमार आवारे, अमोल तुपे, योगेश अडसरे, किशोर पाटील आदी सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पत्रकार बांधवांचे सहकार्य लाभल्याने खऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान होणार आहे. याप्रसंगी प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत आवारे यांचे महिलांना मार्गदर्शन लाभणार आहे. नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माणुसकी फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.



## काळ्या फिती लावून शासनाचा निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**

**अंशत: अनुदानित शाळांना २० टक्के वाढीव टप्पा यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतुदीसह देण्यात येईल, असे आश्वासन तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिले होते. परंतु, या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पुरवणी मागणीत या विषयाचा समावेश करण्यात आला नाही. त्यामुळे याचा सर्व प्रशिक्षणार्थी यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला.**

यावेळी नाशिक जिल्हाध्यक्ष नीलेश गांगुर्डे, मुख्याध्यापक वाघचौरे, गिते, सोनार, विलास लोखंडे, सागर जगताप, संजय पाटील, धनंजय शिरसाठ, जगताप, कदम आदी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

गुरुवारी (दि.६) बाळासाहेब ठाकरे प्रबोधिनी शाळा क्र. ७१, रायगड चौक येथे प्रशिक्षणार्थी यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला. दरम्यान, शासनाने तात्काळ यामध्ये लक्ष घालून आम्ही केलेली वीस टक्के वाढीव टप्पा द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जिल्हाध्यक्ष नीलेश गांगुर्डे यांनी दिला.

## प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची संशोधन क्षेत्रात भरारी

**नाशिक : प्रतिनिधी**

**मानवधन सामाजिक, शैक्षणिक विकास संस्था संचलित प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूल, पाथर्डी फाटा येथे नैसर्गिक रंग तयार करण्याची कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी निसर्गात सहज उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक घटकांपासून विविध पर्यावरणपूरक नैसर्गिक रंग तयार केले.**



रंगांची नवनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्तीला व संशोधन वृत्ती वाढीस लागण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध रंगांची प्रदर्शनाची मांडणी करून पालक, विद्यार्थी व शिक्षकांना ते रंग घेण्यासाठी उपलब्ध करून दिले. या उपक्रमास पालकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

या उपक्रमाप्रसंगी भारत स्काऊट गाइडचे नाशिक जिल्ह्याचे प्रमुख श्रीनिवास मुरकुटे, स्काऊट गाइडच्या संचालिका कविता वाघ, संस्थेचे संस्थापक ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे, संस्था सचिव ज्योती कोल्हे, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानरत्न डॉ. प्रकाश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून, होळी, धूलिवंदन, रंगपंचमी यासारखे सण साजरे करताना पर्यावरणपूरक नैसर्गिक रंग वापरणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास उपस्थित श्रीनिवास मुरकुटे यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या या उपक्रमातून पालकांनी बोध घेऊन नैसर्गिक रंग वापरासाठी इतरांना प्रवृत्त करावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले. स्काऊट गाइडच्या संचालिका कविता वाघ यांनी विद्यार्थ्यांनी असेच नवनवीन समाजोपयोगी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांनी देशाचे सुजाण नागरिक बनावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध नैसर्गिक रंग तयार केले. होळी, धूलिवंदन, रंगपंचमी या सणांमध्ये देशभर मोठ्या प्रमाणात रंगांची उधळण होत असते. या सणांना वापरण्यात येणाऱ्या रासायनिक रंगांमुळे आपली त्वचा, डोळे, केस यांना त्रास होतो तसेच हे रंग आरोग्यास व पर्यावरणास घातक असतात. म्हणून मानवतावादी दृष्टिकोन ठेवून प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी निसर्गात सहज उपलब्ध होणाऱ्या चंदन, बीट, हळद, कडुनिंबाची पाने, संत्र्यांच्या साली, बेल इत्यादी नैसर्गिक घटकांपासून नैसर्गिक रंग तयार केले. हे रंग तयार करताना विद्यार्थ्यांनी कोणत्याही रासायनिक घटकांचा वापर न केल्यामुळे त्या नैसर्गिक रंगांपासून कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. विद्यार्थ्यांनी कमवा व शिका या योजनेंतर्गत हे विविध रंग तयार करून त्यांची विक्रीदेखील केली. विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंग वापराचे महत्त्व विद्यार्थी व पालक यांना पटवून दिले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस चालना मिळाली. संस्थेच्या सचिव ज्योती कोल्हे यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## म्हाळसाकोरे-सिन्नर रस्त्यालगत उघड्यावर मृत कोंबड्या

**दुर्गंधीमुळे परिसरातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात; ग्रामपंचायतीला निवेदन**

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**म्हाळसाकोरे (ता. निफाड) येथील सिन्नर रोडलगत असलेल्या पडोळ वस्तीवर एका खासगी मालकीच्या शेतजमिनीत असलेल्या पोल्ट्रीफार्ममधील मृत पावलेल्या कोंबड्यांचा उघड्यावर खच पडल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरल्याने साथीचे आजार वाढू लागले असून, परिसरातील अनेक लोक आजारी पडत असल्याने खासगी मालकीच्या हक्कातील पोल्ट्री फार्म लवकरात लवकर बंद करण्यात यावे, अशी मागणी येथील शेतकरी तानाजी पडोळ यांनी पत्राद्वारे ग्रामपंचायत प्रशासन व स्थानिक आरोग्य केंद्राकडे केली आहे.**



म्हाळसाकोरे येथील सिन्नर-म्हाळसाकोरे रोडलगत असलेला सिन्नर माथा येथील परिसरात साधारण तीनशे ते चारशे लोकांची पडोळ डोकफोडे व मुरकुटे वस्ती वास्तव्यास आहे. येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीलगतच समाधान बळीराम मंडलिक या शेतकऱ्यांच्या खासगी मालकीची शेतजमीन गट नं. ५८१ जमिनीमध्ये साधारण ५००० कोंबड्यांचे पोल्ट्री फार्म उभारलेले असून, त्यामध्ये मृत पावलेल्या कोंबड्या या उघड्यावरती टाकल्या जातात. त्याची दुर्गंधी परिसरात पसरत असून, अनेकांना वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील अनेक शेतकरी एकत्र येत त्यांनी ग्रामपंचायत व आरोग्य विभागाला पोल्ट्री फार्म बंद करण्याबाबत अर्ज दिला आहे. सदर अर्जात म्हटले आहे की, येथे राहणाऱ्या अनेक लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, सदर व्यवसाय करताना घ्यावा लागणाऱ्या नियम व अटी-शर्तींचे पालन केलेले दिसत नसून, शेजारी राहणारे लहान मुले, प्रौढ व वृद्ध व्यक्ती यांच्या जीवितास हानी पोहोचू नये, अशी कुठलीही उपाययोजना या ठिकाणी केलेली नसून, सदर व्यवसायामुळे परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. अनेकांना फुफ्फुसाचे आजार, न्यूमोनिया असे आजार झाले असून, संबंधित इसमाने पोल्ट्री फार्मचे खराब पाणी शेजारीच असलेल्या बंधाऱ्यात सोडले जात आहे. त्यामुळे नाल्यात व विहिरींना खराब दुर्गंधीयुक्त पाणी उतरले असून, अनेकांचे आरोग्य धोक्यात आल्याने गंभीर आजाराला सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये परवानगी एका गटाची व पोल्ट्री व्यवसाय दुसऱ्या ठिकाणच्या गटात आहे. असे व्यवसायधारकाने केले असून, बेकायदेशीररीत्या असलेले या पोल्ट्री फार्ममुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात आल्याने सदरचे पोल्ट्री फार्म हे कायमचे बंद करण्यात यावे, अशी मागणी या पत्राच्या निवेदनात म्हटले आहे. येथील तानाजी पडोळ, अशोक आडसरे, अशोक पडोळ, संतोष मुरकुटे, संतोष पडोळ, सोमनाथ डोकफोडे, संतोष डोकफोडे, संदीप मुरकुटे, रामदास मुरकुटे, योगेश बरके आदी शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे.

> ग्रामपंचायत प्रशासनाकडून सदर पोल्ट्री फार्मसाठी योग्य ते उपाययोजना करून पोल्ट्री फार्म चालवावे, अन्यथा ती बंद करण्यात येईल, अशा प्रकारची नोटीस आम्ही बजावली आहे.
> – **कल्पेश बरू,** ग्रा.पं. अधिकारी

> दुर्गंधीयुक्त वास विहिरीला उतरलेले दुर्गंधीयुक्त पाणी यामुळे घरातील लहान मुले, वृद्ध व्यक्ती सतत आजारी पडत आहे. मी स्वतः दुर्गंधीमुळे आजारी असून, दवाखान्यासाठी हजारो रुपये खर्च केले आहे.
> –**तानाजी पडोळ,** शेतकरी



## पक्ष्याला विद्यार्थ्यांनी दिले जीवदान

**निफाड : शहर प्रतिनिधी**

**भूतदया हे फक्त पुस्तकात न वाचता तिचा वापर कृतीतून व्हायला हवा तेव्हाच जीवाला खरा आनंद प्राप्त होत असतो. हाच आदर्श नुकतेच बी. के. कावळे विद्यालयातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी समाजासमोर ठेवला.**

राजारामनगर येथील बी. के. कावळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात एक पक्षी कावळ्यांनी जखमी केल्यामुळे तडफड करताना दिसून आला. ही बाब शिक्षकांच्या लक्षात येताच, व्ही. आर. पगार, सलादे, एम. ए. खुळे व विद्यार्थ्यांच्या मदतीने या पक्ष्याला वाचविण्यासाठी प्रयत्न केले.

> सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असून, प्रत्येक नागरिकाने आपल्या घराजवळ थोडे अन्न व भांड्यात पाणी भरून ठेवावे, जेणेकरून पक्षी, मुके प्राणी, अन्न–पाण्यावाचून मरणार नाही. यामुळे नक्कीच पक्ष्यांना अन्नपाण्याची सोय होईल व मनाला खरी ईश्वर सेवा केल्याचे समाधान मिळेल.
> **– प्रा. व्ही. जे. जाधव,** बी.के. कावळे विद्यालय, राजारामनगर

## महत्त्वाचे



## नीलेश पवार यांचे नाशिकरोडला अन्नत्याग आंदोलन

**नाशिक :** अहिल्यानगर, संगमनेर येथील महसूल विभागाचा अनागोंदी कारभाराबाबत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे संगमनेर तालुकाप्रमुख नीलेश पवार हे गेल्या तीन दिवसांपासून विभागीय कार्यालय नाशिकरोड या ठिकाणी न्याय मागण्यासाठी अन्नत्याग आंदोलनाला बसले आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल विभागातील तहसीलदार, तलाठी आदी जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. प्रदेश सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव यांनी देखील सहाय्यक आयुक्त जितेंद्र वाघ यांच्याशी फोनद्वारे चर्चा केली. यावेळी स्वराज्य पक्षाचे उत्तर महाराष्ट्राचे सचिव ज्ञानेश्वर थोरात, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख उमेश शिंदे, कार्यकारिणी सदस्य पुष्पाताई जगताप, ज्ञानेश्वर भोसले, महानगरप्रमुख रोशन खैरे, विद्यार्थी आघाडीप्रमुख सागर पवार, युवक महानगरप्रमुख नितीन पाटील, संदीप काजळे, साईनाथ बोराटे, आकाश चतुर्भुज, साहिल गडाख, ओम जाधव, धनंजय भडांगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सहाय्यक आयुक्त वाघ यांच्याशी शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली असता तत्कालीन जिल्हाधिकारी यांची बदली झालेली असून, नवीन जिल्हाधिकारी यांच्याकडून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर आम्ही कार्यवाहीचे आदेश देऊ शकतो, असे त्या ठिकाणी त्यांनी आम्हाला पत्र दिले. परंतु उपोषणकर्ते नीलेश पवार आणि शिष्टमंडळ यांना समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे उपोषण हे सुरू ठेवलेले असून, काय कार्यवाही होते यावर पक्ष आणि पक्षाचे प्रमुख लक्ष ठेवून आहेत.

## के. के. वाघ महाविद्यालयात आज चित्र-शिल्प प्रदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकच्या के. के. वाघ कॉलेज ऑफ फाइन आर्ट्स महाविद्यालयात वार्षिक चित्र-शिल्प प्रदर्शनाचे आयोजन शनिवार दिनांक ८ मार्च रोजी संध्याकाळी ५ वाजता करण्यात आले आहे. या वार्षिक चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन अजिंक्य वाघ व डॉ. व्ही. एम. सेवलीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या प्रदर्शनानिमित्त प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. रविवार दिनांक ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता भारतातील शिल्पकला क्षेत्रातील तज्ज्ञ प्रा. मधुकर वंजारी-शिल्पकला विभागप्रमुख जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई यांचे व्यक्तिशिल्पाचे आयोजन केले आहे.

## लाड सुवर्णकार संस्थेतर्फे महिलांचा सन्मान

**नाशिक : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना श्री संत नरहरी महाराज लाड सुवर्णकार संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवारी (दि.८) दुपारी १ वाजता बालाजी कोट येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार देवयानी फरांदे आणि प्रा.डॉ. दिलीप बेलगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र शहाणे, उपाध्यक्ष राजेंद्र कुलथे, सचिव संजय मंडलिक, खजिनदार गणेश बाणाईतकर, महिला मंडळ अध्यक्षा संगीता नागरे, उपाध्यक्ष मंजुषा कुलथे यांनी केले आहे.

**यांचा होणार सन्मान**

डॉ. संगीता नांदूरकर, स्मिता कुलथे, डॉ. मंजुषा कुलथे, यशोदा पर्वतकर, डॉ. जयश्री शहाणे, विद्या शहाणे, प्रा. तेजल कपिले, श्रद्धा कुलथे, सुरेखा मैड, हर्षा उगावकर, ॲड. विनया नागरे, ॲड. ज्योती नागरे, ॲड. नम्रता नागरे.

## गोरक्षनगरमधील घरातून ४० हजारांचा ऐवज लंपास

**पंचवटी : वार्ताहर**

आर.टी.ओ. कॉर्नर गोरक्षनगरमधील चंद्रगंगा अपार्टमेंटमधील फ्लॅटचा दरवाजा उघडा असताना घरात शिरून ४० हजार २०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की गुरुवार दि.६ रोजी सकाळी ७.३० ते ७.५० वाजेदरम्यान आर.टी.ओ. कॉर्नर, गोरक्षनगर, या त्यांची मोठी बहीण माया किरण वाघ, रा. फ्लॅट नं. ४ चंद्रगंगा अपार्टमेंट, आर.टी.ओ. कॉर्नर, गोरक्षनगर यांच्या घरी राहावयास आल्या असताना घर उघडे असताना घरात प्रवेश करून हॉलमध्ये ठेवलेल्या बॅगमधील ३० हजार रुपये किमतीचा एस्सर कंपनीचा राखाडी रंगाचा लॅपटॉप, एच.डी.एफ.सी. बँकेचे ए.टी.एम. कार्ड , आधार कार्ड, पॅन कार्ड, बॅग चोरून नेली. तर एटीएमद्वारे एटीएमचा पिन, पावती नंबर वापरून त्यातून ९ हजार रुपये काढून घेतले. याबाबत शितल विठ्ठल दिवटे (३३,), रा. आर.टी.ओ. कॉर्नर गोरक्षनगर यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार खराटे करीत आहेत.

## महिला दिनानिमित्त रोजगार मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

महिला दिनानिमित्त रविवार दिनांक ९ मार्च रोजी सहकार भारतीतर्फे महिलांना रोजगार मार्गदर्शन उपक्रम शंकराचार्य संकुलामध्ये दुपारी चार वाजता आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख अतिथी विजयाताई पाटील सेवानिवृत्त अधिव्याख्याता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांचे महिलांना विविध व्यवसायाच्या संधी आणि सरकारी योजना याबद्दलचे मार्गदर्शन असणार आहे. स्नेहाताई कोकणे पाटील आणि संगीता ताई पिंगळे यांची जाहीर मुलाखत होणार आहे. कार्यक्रम नानाराव ढोबळे सभागृह, शंकराचार्य संकुल, गंगापूर नाका, नाशिक येथे रविवार दिनांक ९ मार्च रोजी दुपारी चार वाजता होणार आहे. सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. प्रशांत पुरंदरे आणि उपाध्यक्ष वृंदाताई लवाटे यांनी केले आहे.

## भाग्योदय ज्योतिष केंद्रातर्फे नारीशक्तीचा सन्मान

**नाशिक : प्रतिनिधी**

महिला दिनाचे औचित्य साधून सातपूर, ध्रुवनगर येथील भाग्योदय ज्योतिष व आध्यात्मिक केंद्रातर्फे आनंदवली, पाइपलाइन रोड येथील आनंदी सखी मंडळ हॉल येथे नारीशक्ती सन्मान सोहळा आयोजित केला होता. यावेळी ७० गृहिणींचे औक्षण करून फेटा बांधून सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान केला जातो. मात्र, गृहिणींचा सत्कार शक्यतो केला जात नाही. हाच विचार समोर ठेवून ज्योतिष व आधात्मिक केंद्राचे संचालक पंकज पाठक यांनी प्रत्येक महिलेचा सत्कार व्हायला हवा, या उद्देशाने गतवर्षीप्रमाणे यंदाही गृहिणींचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. यावेळी मोठ्या संख्येंनी शहरातील महिला उपस्थित होत्या. सविता पाठक, विजया पाठक, डॉ. अनिता भेंडाळे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. यावेळी लता पाटील, वैशाली लोंढे, प्रियंका पवार, साधना गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पंकज पाठक यांनी मानले.

# म्हसोबा महाराज यात्रेत रंगल्या कुस्त्या

## २१ हजार व गदा बंटी आहेरने पटकावली

**नाशिकरोड : वार्ताहर**

**देवळालीगावचे ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराज यांच्या कुस्ती फडात अखेरची कुस्ती मालेगावचे मुकेश अहिरे विरुद्ध देवळाली गावचे बंटी आहेर या मल्लांमध्ये अतिशय अटीतटीची झाली. त्यात बंटी आहेरने ती जिंकली. साई श्रद्धा पालखीच्या वतीने ही कुस्ती लावण्यात आली होती. २१ हजार रुपये रोख व चांदीची गदा असा इनाम या कुस्तीसाठी ठेवण्यात आला होता. ही कुस्ती चीतपट होताच सर्वांनी जयघोष करत आहेर याचे अभिनंदन करत त्याला उचलून घेतले. यापूर्वी सहा हजारांची कुस्ती येवल्याचे रोहन परदेशी या पैलवानाने जिंकली होती.**



देवळाली गावातील कुस्त्यांची ही परंपरा कायम गाजत आहे. पंच कमिटीनेही ५० रुपयांपासून सुरू केलेल्या कुस्त्या १०१, २०१, ३०१, ५०१, १००१, ११००, २१०० पर्यंत लावण्यात आल्या होत्या. यात अक्षदा झनकर व संस्कृती शिरसाठ या पहिलवान मुलींनी प्रत्येकी १००१ रुपयांच्या कुस्त्या जिंकल्या. मुलांसोबत त्या बिनधास्त खेळल्या. शिवजयंती जन्मोत्सव समितीतर्फेही योगेश गाडेकर यांनी स्मृतिचिन्ह व २१०० रुपयांची कुस्ती लावली होती. नाशिकचे मनपाचे कर्मचारी व झटपट कुस्ती करण्यात पटाईत असलेले शफी पहिलवान यांनीसुद्धा १५०० रुपयांची कुस्ती झटपट मारून प्रेक्षकांच्या टाळ्या घेतल्या. या कडयात पंच म्हणून मनोहर कोरडे सोमनाथ मोरे, प्रमोद बुवा, बबनराव गवळी आदी पंचांनी उत्तम कामगिरी बजावली. प्रारंभी माजी मंत्री बबनराव घोलप, व्यापारी बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष योगेश गाडेकर, माजी अध्यक्ष विकास भागवत, शिवाजी हांडोरे, माजी नगरसेवक सूर्यकांत लवटे, शांताराम भागवत यांच्यासह अनेकांनी कुस्त्या लावल्या. बाल मल्लांच्या कुस्त्या मात्र डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या ठरल्या. दंडे हनुमान, अखिल भारतीय वाल्मिक नवयुवक संघ यांच्या वतीनेही कुस्त्या लावण्यात आल्या होत्या. या कुस्त्या बघण्यास जुने मल्ल सीआयएसएफचे रावसाहेब किरकाडे, उत्तम दळवी, बाळासाहेब मते, संपत खोले तसेच पाच बंगला म्हसोबा महाराज देवस्थानचे अध्यक्ष दशरथ कदम आदी उपस्थित होते. पंच कमिटीचे रुंजाजी पाटोळे, प्रदीप पाटील देशमुख, शिवाजी लवटे, सुनील गायकवाड, राजेंद्र गायकवाड, जयंत गाडेकर आदींनी उत्तम नियोजन केले होते.

# फ्लाइंग ऑफिसरचे स्वप्न साकारले

## ओजल जावळेची आकाशाला गवसणी!

**नाशिक : प्रतिनिधी**

**यूपीएससीच्या ए.एफ. कॅट परीक्षेमध्ये पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होऊन २६ वर्षीय ओजल जावळेने फ्लाइंग ऑफिसरचे पाहिलेले स्वप्न पूर्ण केले आहे. या यशाबद्दल तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**



बॉइज टाऊन येथे शालेय शिक्षण, तर आर.वाय.के. कॉलेज, नाशिक येथे अकरावी, बारावी आणि त्यानंतर बी.टेक कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे, असे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून ओजल जावळे हिने यू.पी.एस.सी.ची पहिली एफ. कॅट परीक्षा, दुसरी एस.एस.बी. परीक्षा, तिसरी मेडिकल परीक्षा उत्तीर्ण होऊन फ्लाइंग ऑफिसरचे पाहिलेले स्वप्न पूर्ण केले.

आई गृहिणी, वडील खासगी नोकरीत व घरची परिस्थिती सामान्य असतानाही लहान बहीणही इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. ओजल हिने खासगी नोकरी करून तिचे स्वप्न पूर्ण केले. त्यामुळे कुटुंबाच्या डोळ्यांत आनंदाश्रू अनावर आले.

सामान्यज्ञान मिळवण्याच्या आवडीतून ओजल जावळेने पाहिलेले स्वप्न पूर्ण करून आजच्या युवतींना प्रेरणा दिली आहे.

ओजल जावळे हिच्या लक्ष्मीनगर, कामटवाडे येथे परिसरातील रहिवाशांच्या आणि कुटुंबीयांच्या खास महिला दिनानिमित्त आणि तिने बघितलेले स्वप्न पूर्ण करून आजच्या युवतींना एक प्रेरणा दिली. त्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. तिच्या या यशाबद्दल कुटुंबीयांच्या डोळ्यात आनंदाश्रू अनावर झाले होते. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी जिद्द आवश्यक असते. हे तिने दाखवून दिले आहे.

# म्हसरूळ परिसरात दोन ठिकाणी आग

## लाखोंचे नुकसान : सुदैवाने जीवितहानी टळली

**पंचवटी : वार्ताहर**

**म्हसरूळ परिसरातील म्हसरूळ आणि पोकार कॉलनी भागात दोन वेगवेगळ्या ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. यात सकाळी पोकार कॉलनीत रोहित्राने अचानक पेट घेतला, तर दुपारी म्हसरूळ गणेशनगर भागातील बांधकाम साहित्याच्या गोदामाला भीषण आग लागली. सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.**

गुरुवारी (दि.६) सकाळी पोकार कॉलनीतील एका रोहित्राने अचानक पेट घेतला. स्थानिकांनी तातडीने अग्निशमन विभाग आणि राज्य विद्युत महावितरण कंपनीला माहिती दिली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून रोहित्र विझवण्याचा प्रयत्न केला. अग्निशमन दलाच्या त्वरित हस्तक्षेपामुळे काही मिनिटांतच आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला.

**म्हसरूळमध्ये गोदामाला आग**

म्हसरूळ येथील दिंडोरी रोडवरील स्वामी समर्थ केंद्राजवळ असलेल्या मोकळ्या जागेत बांधकाम साहित्य ठेवण्याचे गोदाम आहे. स्थानिक रहिवासी कचरा जाळण्याचा सर्रास प्रकार करत असल्याने गुरुवारी (दि.६) दुपारी तीनच्या सुमारास कुणीतरी कचरा जाळला. कचऱ्यातून उठलेल्या आगीने हळूहळू संपूर्ण गोदामाला विळखा घातला. आगीची तीव्रता वाढत असल्याचे लक्षात येताच स्थानिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला तातडीने कळवले. यावेळी मुख्य केंद्र तसेच पंचवटीतील क.का. वाघ महाविद्यालयाजवळील केंद्रावरून सुमारे आठ अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले. स्लॅब टाकण्यासाठी लागणाऱ्या लोखंडी पट्ट्या, लाकडी खांब, सिमेंटच्या रिकाम्या गोण्या आणि इतर साहित्याने पेट घेतल्याने आगीचा भडका उडाला. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाला तब्बल एक तास झगडावे लागले. धुराचे प्रचंड लोट दूरपर्यंत पसरल्याने परिसरातील अनेक घरे काळवंडली होती. शहरात वारंवार लागणाऱ्या आगी चिंतेचा विषय म्हसरूळ आणि पोकार कॉलनीतील या घटनांमुळे शहरात वारंवार लागणाऱ्या आगींचा विषय ऐरणीवर आला आहे. बांधकाम साहित्य साठवलेल्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना न केल्याने आगीच्या घटना वाढत असल्याचे दिसून येते. तसेच, विद्युत रोहित्रांच्या देखभालीकडेही महावितरण विभागाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा अनर्थ घडण्याची शक्यता आहे. प्रशासनाने या घटनांमधून बोध घेऊन तत्काळ प्रतिबंधात्मक पावले उचलावीत याबाबत अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे.

# आग विझवताना तिरंग्याचेही संरक्षण

## म्हसरूळ पोलिसांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

**पंचवटी : वार्ताहर**

**दिंडोरी रोडवरील ग्लोबल स्कूल परिसरात दुपारच्या सुमारास डोंगरावरील गवताला आग लागल्याची घटना घडली. दरम्यान, ग्लोबल स्कूलमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी झाडाच्या फांद्या तोडून आग आटोक्यात आणून तेथे लावण्यात आलेल्या तिरंग्याचे ही रक्षण केल्याने म्हसरूळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पोलिस ठाण्याला भेटीचे आमंत्रण दिले.**



शुक्रवार दि.७ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास दिंडोरी रोड वरील ग्लोबल स्कूल परिसरात असलेल्या डोंगरावर आग लागल्याची माहिती नाशिक शहर नियंत्रण कक्षाला ११२ वरून कॉल मिळताच म्हसरूळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल डहाके यांनी डिबी मोबाइलवरील कर्मचाऱ्यांना पाठवले. त्या ठिकाणी डिबीच्या कर्मचाऱ्यांनी ग्लोबल अध्ययन अकादमीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने आग आटोक्यात आणून विझवली. तसेच डोंगरावर लावण्यात आलेल्या तिरंग्यापर्यंत आग पोहचू दिली नाही. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आपले रक्षण करण्याबरोबरच डोंगरावरील असलेल्या झाडांच्या फांद्या आणि इतर वस्तूंनी आग विझवली. यावेळी विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या धाडसाबद्दल वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके यांनी घटनास्थळी जाऊन विद्यार्थी, विद्यार्थिनींचे कौतुक केले. तसेच त्यांना पोलिस ठाण्याला भेट देण्याचे आमंत्रण देखील दिले. डोंगराला लागलेली आग ही ढकांबे शिवारात असून, डिबीच्या कर्मचाऱ्यांनी पोलिस ठाण्याच्या हद्दीचा विचार न करता त्या ठिकाणी तात्काळ पोहचत कारवाई केली. त्याबाबत शाळा प्रशासनाकडून आभार व्यक्त करण्यात आले.

# के. के. वाघ फार्मसी महाविद्यालय येथे कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

**के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ फार्मसी महाविद्यालय नाशिक येथे नुकतेच डीओई आणि क्यू.बी.डी. ऑप्टिमायझेशन या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**

डॉ. बाबासाहेब तंत्रशिक्षण विद्यापीठ, लोणेरे आणि सिस्टेक टेक्नो क्राफ्ट सर्व्हिसेस, मुंबई यांनी मोलाचे सहकार्य केले. यात उद्योग व्यावसायिक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञ यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. योगेश्वर बच्छाव, डॉ. शैलेश चालिकवार, डॉ. मनीषकुमार यादव व डॉ. केतन रांच उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. किशोर साळुंखे, विभाग प्रमुख डॉ. दीपक पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज डांगरे व आदी उपस्थित होते. पहिल्या सत्रात डॉ. योगेश्वर बच्छाव व डॉ. शैलेश चालिकवार यांनी क्यू.बी.डी. या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. मनीषकुमार यादव यांनी डेटा डिझाइन या विषयावर मार्गदर्शन दिले. तिसऱ्या सत्रात डॉ. केतन रांच यांनी सॉफ्टवेअरवरील कार्यशाळेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. किशोर साळुंखे यांनी केले. औषध निर्मिती, उत्पादन आणि संशोधन यासह विविध उद्योगांमध्ये प्रक्रिया ऑप्टिमायझेशन आणि गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रयोगांच्या डिझाइन (डी.ओ.ई.) आणि क्वालिटी बाय डिझाइन (क्यू.बी.डी.) पद्धतींवर कार्यशाळेत मान्यवरांनी लक्ष केंद्रित केले. कार्यशाळेस संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, समन्वयक डॉ. एन. एस. पाटील, प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.



कार्यशाळेस उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थी

# राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

## ११ मार्चला नाशिकला यलो अलर्ट

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यातील काही जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा देत हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आला आहे. येत्या तीन ते चार दिवस तापमानात वाढ होणार आहे. त्यामुळे वाढत्या उष्णतेचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

आयएमडीच्या अंदाजानुसार नाशिक जिल्ह्यात ११ मार्चला उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. कमाल तापमान ३७-३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

पुढील चार दिवसांत किमान तापमानात तीन ते पाच अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. नाशिक शहराचे कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३४.९ अंश आणि १२.४ अंश नोंदवण्यात आले आहे. नाशकात ११ मार्चला कमाल आणि किमान तापमानात वाढ होऊन उष्णतेची लाट पसरण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली होती.

राज्यातील कमाल तापमानात वाढ होत असून, अनेक ठिकाणी उष्णतेची लाट पसरली आहे. दिवसेंदिवस उष्णता वाढत असल्याने लोकांच्या घामाच्या धारा वाहत आहेत. राज्यातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नाशिक या जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.



### उष्णतेच्या लाटेचा आरोग्यावर परिणाम होऊन

डिहायड्रेशन, उष्माघाताचा धोका होऊ शकतो. त्यासाठी नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत, जेव्हा तापमान सर्वाधिक असते. नागरिकांना हायड्रेटेड राहण्याचा, उष्णतेच्या वेळी जास्त काळ सूर्यप्रकाशात राहण्याचे टाळण्याचा आणि उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका कमी करण्यासाठी योग्य कपडे घालण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### तापमानातील बदलाने नाशिककर आजारी

उन्हाचे चटके अधिक तीव्र झाले असून, दिवसा कडक ऊन तर सायंकाळी आणि सकाळी गारवा या वातावरणामुळे शहरात सर्दी, खोकल्याच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. दिवसा कडक उन्हाच्या झळा सोसणाऱ्या नाशिककरांना पहाटे काहीसा दिलासा मिळत आहे. परंतु, कमाल आणि किमान तापमानातील फरक तापदायक ठरत आहे.

### उन्हापासून असा करा बचाव

१. पुरेसे पाणी प्या, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या. २. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा. ३. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा. ४.अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शनिवार, दि. ८ मार्च २०२५



मनविसेच्या दणक्यानंतर संदीप फाउंडेशन उचलणार जखमी विद्यार्थ्यांचा खर्च पान ६

काळ्या फिती लावून शासनाचा निषेध पान ६



**महत्त्वाचे**

### थकीत कर असलेल्या वाहनांचा १९ मार्चला होणार जाहीर लिलाव

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे मोटार वाहन कर न भरलेल्या व मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या ३६ वाहनांचा १९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जाहीर ई-लिलाव करण्यात येणार आहे. या ई-लिलावात सहभाग घेण्यासाठी इच्छुकांनी ११ मार्च २०२५ पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन कराधान प्राधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. जाहीर ई-लिलावात सहभाग घेण्यासाठी इच्छुक नागरिकांनी ७ ते ११ मार्च २०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत www.eauction.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे ५० हजार रुपये रकमेचा आरटीओ, नाशिक या नावाने अनामत धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) सह नोंदणी करून कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. लिलाव करण्यात येणाऱ्या ३६ वाहनांत ऑटोरिक्षा, टॅक्सी, बस व मालवाहू वाहने यांचा समावेश आहे.

# म्हसरूळ भूसंपादन घोटाळ्याची एसआयटी चौकशी

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महापालिकेचे भूसंपादन घोटाळे राज्यात गाजत असून, म्हसरूळ क्रीडा मैदान भूसंपादनाचा मुद्दा विधानसभेत गाजला. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने मनपा नगररचना विभागाने मूल्यांकन विभागाकडून म्हणजे मुद्रांक महानिरीक्षक कार्यालयाकडून जाणूनबुजून खातरजमा न करता हरित क्षेत्रातील जमिनीला पिवळ्या पट्ट्यातील चारपट अधिक दर दिला, असा ठपका ठेवला आहे. मनपा प्रशासनाच्या अंगलट आले असून, विधानसभेने हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून, या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.**

## नगररचना विभाग अडचणीत



> हरित जमीन पिवळ्या पट्ट्यात असल्याचे दाखवत चार पट अधिक दर देण्यात आले. या प्रकरणी शासनाने एसआयटी चौकशीचे आदेश दिले आहेत. म्हसरूळ शिवारातील क्रीडा मैदान भूसंपादनात ११० कोटींचा घोटाळा झाला आहे.
>
> **- ॲड. राहुल ढिकले, आमदार**

या प्रकरणात ११० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप होत असून, चौकशीमुळे मनपा प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. मनपाच्या म्हसरूळ शिवारात सर्व्हे क्र.२५० मध्ये क्रीडांगण आहे. मनपा नगररचना विभागाने हरित क्षेत्रातील जागा संपादित करताना पिवळ्या पट्ट्यातील चारपट अधिक मोबदला म्हणजे ११० कोटी दिले. नाशिक पूर्वचे आमदार राहुल ढिकले यांनी विधानसभेत या मुद्यावर लक्षवेधी मांडली होती. या संशयास्पद घोटाळ्यात मनपा नगररचना विभाग व मुद्रांक शुल्क विभागाचा सहभाग असल्याने कार्यसन अधिकारी धैर्यशील पाटिल यांनी एसआयटी नेमून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

याबाबत महाराष्ट्र नगररचना संचालक पुणे, नाशिक जिल्हाधिकारी, नाशिक मनपा आयुक्त यांना याबाबत सूचित केले आहे. दरम्यान, मनपा तत्कालीन आयुक्त डॉ. करंजकर यांनी रात्रीतून विशिष्ट बिल्डर लॉबीसाठी भूसंपादनाचा ५५ कोटींचा धनादेश काढला होता. त्याबाबत मोठा गदारोळ झाला होता. आमदार ढिकले यांनी या प्रकरणी विधानसभेत लक्षवेधी मांडली आहे. विधानसभा अध्यक्षांनी ती मान्य केल्याने डॉ. करंजकर यांचा पाय आणखी खोलात गेला आहे. दरम्यान, शासनाकडून आयुक्तांमार्फत या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

# जात वैधता दाखल न करणाऱ्या ग्रामपंचायत उमेदवारांना स्मरणपत्र

## खुलासा सादर न केल्यास उमेदवारीवर बंदी

**नाशिक : प्रतिनिधी**

**ग्रामपंचायत निवडणुकांच्या उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र दाखल न झाल्याबद्दल ९९७ निवडणूक लढलेल्या यापूर्वीही नोटीस बजावलेल्या आहेत. लवकरच त्यांना स्मरणपत्र देण्यात येणार असून, त्यानंतरही प्रमाणपत्र सादर न सादर केल्यास त्यांच्या उमेदवारीवर फुली मारली जाणार असल्याचे दिसून येत आहे.**

जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये ७७ सरपंच व २०४५ सदस्यांनी निवडणुकीत सहभाग घेतला होता. त्यातील २१२२ जणांना जिल्हा प्रशासनाने जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत नोटीस बजावली होती. यातील पेठमधील दोन तर दिंडोरीमधील एक सदस्य मयत असल्यामुळे हे तीन सदस्य वगळता ११२२ जणांनी याबाबतचे खुलासे सादर केले आहेत. मात्र स्मरणपत्र दिल्यानंतरही ९९७ सदस्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्राबाबतचे खुलासे दाखल न केल्यामुळे त्यांना स्मरणपत्र बजावले जाणार आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुका समोर येऊ घातलेल्या असल्याने या सदस्याची उमेदवारी धोक्यात येण्याची शक्यता आहे.


| तालुका | सदस्य | प्रलंबित |
|---|---|---|
| पेठ | २३८ | ३९ |
| त्र्यंबकेश्वर | ३५३ | ८० |
| सुरगाणा | २१२ | १०० |
| निफाड | ६३ | ४६ |
| दिंडोरी | १५८ | १२३ |
| नाशिक | ९६ | ३६ |
| येवला | ९२ | ५१ |
| सिन्नर | १४३ | ८० |
| इगतपुरी | ६७ | ६५ |
| चांदवड | ४१ | २६ |
| नांदगाव | १५० | ७८ |
| बागलाण | १३० | ७३ |
| कळवण | ७८ | ४५ |
| देवळा | ३२ | १५ |
| मालेगाव | २६९ | १४० |
| एकूण | २१२२ | ९९७ |

# पेडणेकर ज्वेलर्सच्या ग्रॅन्ड एक्झिबिशन सेलला दिमाखात प्रारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**







मुंबईची सुप्रसिद्ध पेढी असलेल्या जगन्नाथ गंगाराम पेडणेकर यांच्यातर्फे हॉटेल एमराल्ड पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रॅन्ड एक्झिबिशन सेलला कालपासून प्रारंभ झाला. नाशिकमधील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अशोक तलवारे, पेडणेकर पेढीचे मॅनेजर सागर हलडणकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाला प्रारंभ दीपप्रज्वलनाने करण्यात आला. चार दिवस चालणाऱ्या या दागिन्यांच्या प्रदर्शनात आकर्षक दागिने मांडण्यात आलेले आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर पंधरा टक्के सूट देण्यात आली आहे. आकर्षक बांगड्या, मंगळसूत्र, कानातील टॉप्स, नेकलेस, गंठण, राणी हार, पोहा हार याबरोबरच खास डिझाइन केलेले आकर्षक दागिन्यांची खरेदी ग्राहकांना करता येणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाला काल पहिल्या दिवशी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद लाभला. सोन्याच्या दागिन्यांच्या शेकडो डिझाइन या ठिकाणी उपलब्ध असून, आकर्षक डिझाइनमुळे ग्राहकांची मोठी पसंती या प्रदर्शनाला मिळत आहे. आजवर कुठेही न पाहिलेल्या दागिन्यांच्या डिझाइन या ठिकाणी प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या आहेत. सकाळी साडेदहा ते रात्री साडेआठपर्यंत हे प्रदर्शन ग्राहकांसाठी खुले आहे.

## हातमाग कापड स्पर्धांचे १९ मार्च रोजी आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी व विणकरांनी उत्पादित केलेल्या उत्कृष्ट वाणाला सन्मान मिळावा यासाठी मुंबई विभागात विभागीय हातमाग कापड स्पर्धांचे आयोजन १९ मार्च २०२५ रोजी दुपारी ३ वाजता प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग मुंबई कार्यालय येथे केले आहे. हातमाग विणकरांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त वस्त्रोद्योग मुंबई यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाचा पत्ता प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग मुंबई, भोरूका चॅरिटेबल ट्रस्ट, ट्रान्स्पोर्ट हाऊस, ५ वा मजला, १२८- ब, पूना स्ट्रीट, मशीद (पूर्व) मुंबई यावर किंवा ०२२-२३७००६११ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# रांगोळीच्या रेषांतून साकारल्या स्त्रीच्या भूमिका

**नाशिक : प्रतिनिधी**

**महिलांचे कर्तृत्व आणि त्यांचे समाजातील विविध पैलू साकारण्यासाठी चांदोरीतील सुप्रसिद्ध रांगोळी कलाकार राणी सूर्यवंशी यांनी एक अनोखा उपक्रम राबवला. महिला दिनाचे औचित्य साधून, त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून स्त्रीच्या वेगवेगळ्या भूमिका साकारत समाजाला एक संदेश दिला.**




> रांगोळी ही केवळ सजावटीसाठी नाही, तर ती समाजाला संदेश देणारे प्रभावी माध्यम आहे. महिलांनी कोणत्याही क्षेत्राला कमी न समजता स्वतःच्या क्षमतांचा पूर्ण उपयोग करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, हाच संदेश मी या माध्यमातून देऊ इच्छिते.
>
> **- राणी संतोष सूर्यवंशी, चांदोरी**

राणी सूर्यवंशी या गेल्या अनेक वर्षांपासून चांदोरी व परिसरात रांगोळी कलेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृत करण्याचे काम करत आहेत. यंदाच्या महिला दिनानिमित्त त्यांनी स्त्रीच्या विविध भूमिका जशा की माता, शिक्षिका, शास्त्रज्ञ, डॉक्टर, पोलिस, सैनिक, कलाकार आणि उद्योजिका यांच्या रेखाटनाची सुरेख मांडणी केली. त्यांच्या या अनोख्या सादरीकरणाने कलाप्रेमींना आकर्षित केले. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे, हे दाखवण्यासाठी राणी सूर्यवंशी यांनी विशेष रांगोळी काढली. यामध्ये त्यांनी रांगोळी ही फक्त कला नाही, तर एक विचारधारा राणी सूर्यवंशी यांच्या या कलाकृतींनी महिलादिनाच्या उत्सवाला एक वेगळे रूप दिले असून, महिला दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या या स्तुत्य उपक्रमामुळे चांदोरी आणि परिसरात सकारात्मक ऊर्जा पसरली आहे. महिलांच्या योगदानाला सन्मान देण्याच्या या रांगोळीमुळे तरुणींना आपल्या क्षमतांचा पुनर्विचार करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# नगर परिषदांच्या अग्निशमन यंत्रणेला मिळणार फायर प्रॉक्झिमिटी ड्रेस

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या अग्निशमन यंत्रणेला फायर प्रॉक्झिमिटी ड्रेस शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. फायर प्रॉक्झिमिटी ड्रेस हा अत्यंत उच्च तापमानापासून अग्निशामक किंवा ज्वालामुखी शास्त्रज्ञांचे संरक्षण करण्यासाठी डिझाइन केलेला ड्रेस आहे.**



### प्रॉक्झिमिटी ड्रेसचा मदतीसाठी उपयोग

मोठी आगीची दुर्घटना घडल्यास जीवितहानीचा धोका असतो, अशावेळी अग्निशमन यंत्रणेकडे पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याने बचावकार्यास अडथळे निर्माण होतात, मात्र फायर प्रॉक्झिमिटी सूटमुळे आगीमध्ये प्रत्यक्ष जाऊन बचावकार्य करणे जवानांना शक्य होते. त्यामुळे प्रॉक्झिमिटी सूटचा नगरपरिषदेच्या अग्निशमन यंत्रणेला मोठा उपयोग होणार आहे.

हे नगरपरिषदांना ड्रेस उपलब्ध झाल्यानंतर आगीसंदर्भातील कोणती मोठी दुर्घटना घडल्यास बचावकार्य करण्यास फायदा होणार आहे. हा सूट १ हजार डिग्री सेल्सिअस एवढ्या प्रचंड तापमानामध्येही जवानाचे रक्षण करण्यासाठी सक्षम असतो.

दरम्यान, राज्यातील २४४ नगरपरिषदांच्या अग्निशमन केंद्राकरिता प्रत्येकी ६ प्रमाणे एकूण १हजार ६६४ फायर प्रॉक्झिमिटी सूट उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्या मागणीनुसार सर्व जिल्ह्यातील नगरपरिषदांच्या अग्निशमन केंद्राकरिता फायर पॉक्झिमिटी ड्रेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. फायर प्रॉक्झिमिटी सूट संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या कार्यालयास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यानंतर ते संबंधित नगरपरिषदांच्या अग्निशमन केंद्राला वितरित करण्यात येणार आहेत.

**या नगरपरिषदांना मिळणार ड्रेस** प्रत्येक नगरपरिषदेला ६ फायर प्रॉक्झिमिटी सूट मिळणार आहेत. यात मनमाड, येवला, सिन्नर, ओझर, सटाणा, नांदगाव, भगूर, इगतपुरी, चांदवड, त्र्यंबकेश्वर या नगरपरिषदांना पॉक्झिमिटी ड्रेस मिळणार आहेत.



आरओसी-2024-25/क्र-5/C६९७५



शेअर बाजारात चढ-उतार, सेन्सेक्स लाल रंगात बंद पान ३

नाशिक आज
# गांवकरी



'टोयोटा किर्लोस्कर मोटर' साजरा करणार अनोखा महिला दिन पान ३

नाशिक, शनिवार, दि. ८ मार्च २०२५

**महत्त्वाचे**

## महिला दिनानिमित्त १५ रोजी कर्करोग शिबिराचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

कॅन्सर केअर सेंटर, स्त्री उद्यमी फाउंडेशन, अखिल भारतीय मारवाडी युवा मंच, मिडटाऊन नाशिक रोटरी क्लब ऑफ नाशिक नॉर्थ आणि आधारशिला हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त दि. १५ रोजी कर्करोग पडताळणी व निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आधारशिला हॉस्पिटल, गोविंदनगर लिंक रोड, तिडकेनगर येथे शनिवारी (दि.१५) सकाळी ९.३० ते ४.३० पर्यंत शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिरात स्तनाच्या कर्करोगाची पडताळणी, ४० वर्षे आणि त्यापुढील महिलांची आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची पडताळणी वय ३५ वर्षे आणि त्यापुढील महिलांची तपासणी करण्यात येणार आहे.चाचणी पूर्णपणे विनामूल्य असून, नावनोंदणी आवश्यक असणार आहे. प्रथम येणाऱ्या ७५ महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहे. नावनोंदणीसाठी स्वाती देवरे ९४०३२७८३६६, योगिता पांडे ८८८८८७३७६३ या क्रमांकावर संपर्क करावा. या शिबिरासाठी जास्तीत जास्त महिलांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन स्त्री उद्यमी फाउंडेशनच्या अध्यक्षा दीपाली चांडक यांनी केले आहे.

# सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर मनपाची खबरदारी

## शहरातील पस्तीस पुलांचे करणार ऑडिट

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक शहरात होऊ घातलेल्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याकरिता महापालिका प्रशासनाकडून नियोजन सुरू आहे. ज्या ठिकाणी थेट सिंहस्थ कुंभमेळ्याशी संबंध येतो, त्या परिसराचा विकास करण्याबरोबरच विविध उपाययोजना केल्या जात आहेत. दरम्यान, कोट्यवधी भाविक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येण्याचा अंदाज असल्याने त्यादृष्टीनेच प्रशासनाची तयारी सुरू आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आता शहरातील छोट्या-मोठ्यांसह तब्बल ३६ पुलांचे स्ट्रक्चर ऑडिट केले जाणार आहे. या ऑडिटद्वारे धोकेदायक पुलांची माहिती समोर येणार आहे.**

महापालिकेने याआधी शहरातील कमानींचे ऑडिट केले असून, कमकुवत झालेल्या कमानी हटवल्या जाणार आहेत. शहरात चोहोबाजूंनी येणाऱ्या मुख्य रस्त्यावर शेकडो कमानी लावण्यात आलेल्या आहेत. त्यातील काहींची अवस्था खराब झाल्याने त्य कोसळण्याची भीती आहे. हे पाहता महापालिकेच्या ट्रॅफिक सेलकडून कमानींचे ऑडिट करण्यात आले आहेत. आता मनपाच्या बांधकाम विभागाकडून शहरातील पुलांचे स्ट्रक्चर ऑडिट केले जाणार आहेत. यामध्ये नाशिकरोड येथील बिटको चौकातील उड्डाणपुलासह पंचवटीतील कन्नमवार पुलासह सर्व पुलांची स्थिती तपासली जाणार आहे. सदर स्ट्रक्चर ऑडिट थर्ड पार्टी (बाह्य यंत्रणेकडून) केले जाणार आहे. यापूर्वी सदर पुलांचे ऑडिट २०१५ साली झालेल्या सिंहस्थ





कुंभमेळ्यापूर्वी करण्यात आले होते. दरम्यान, काही मुख्य पूल वगळता इतर पुलांची स्थिती कमकुवत झाल्याचे बोलले जात आहे. सिंहस्थामध्ये भाविकांच्या सुरक्षेबाबत कसलीही तडजोड नको, याकरिता महापालिका प्रशासन आतापासूनच तयारी करत आहेत. अगदी वैद्यकीय सुविधा देण्यापासून ते पार्किंग, वाहतुकीचे नियोजन याकडे विशेष लक्ष देण्यात

> शहरातील जी काही लहान-मोठी पूल आहेत. त्या सर्वांचे ऑडिट केले जाणार आहे. याद्वारे पुलांच्या मजबुतीची स्थिती समजणार आहे. खासगी कंपनीद्वारे सदर ऑडिट होईल.
>
> **-संजय अग्रवाल**, शहर अभियंता, मनपा

आले आहेत. शहरात शाही स्नानाच्या दिवशी एकाचवेळी लाखो भाविक शहरातील विविध भागातून दाखल होणार आहे. यावेळी हजारो वाहने थेट पुलावरून येणार आहेत. अशावेळी पुलांची स्थिती मजबूत असण्याची गरज आहे. सुरक्षेसाठीच पालिकेकडून या पुलांचे ऑडिट करणार आहेत. सदर अहवालामध्ये जे काही निष्कर्ष येतील. त्यानुसार बांधकाम विभागाकडून पुलांची दुरुस्ती केली जाणार आहे.

## जिल्हा परिषद करणार आज 'नारीशक्ती'चा सन्मान

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागांतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकास प्रकल्पांतर्गत सन २०२४-२५ या वर्षामध्ये उत्कृष्ट काम केलेल्या महिला कर्मचारी व स्वयंसेवी संस्थेचे महिला पदाधिकारी यांचा ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्ताने 'नारीशक्ती' सन्मान देऊन सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.**

कालिदास कलामंदिर येथे सकाळी ११ वाजता या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महिला व बालविकास विभागामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील एकूण २६ प्रकल्पांतील ६ बालविकास प्रकल्प अधिकारी, ६ विस्तार अधिकारी, ३४ पर्यवेक्षिका तसेच प्रकल्पातील प्रत्येकी ३ अंगणवाडीसेविका, ३ मदतनीस यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. महिला व बालविकासमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेतील १० महिला पदाधिकारी व जिल्हा परिषदेमधील विविध विभागात काम करणाऱ्या १० महिला अधिकारी यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्कारार्थींची निवड प्रामुख्याने अंगणवाडी केंद्रामध्ये पायाभूत सुविधांची पूर्तता करणे, विद्युतीकरण करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, स्वच्छता उपक्रमांची अंमलबजावणी करणे, अंगणवाडीची रंगरंगोटी व सुशोभीकरण करणे, पूर्व प्राथमिक शिक्षण देणे, पोषण टॅकरवर कामकाज करणे, लेक लाडकी योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये उत्कृष्ट काम करणे या प्रमुख उपक्रमांच्या अंमलबजावणीनुसार करण्यात आल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील यांनी दिली.

### शालिमार चौकात आंदोलन : जोरदार घोषणाबाजी

# भैयाजी जोशींविरोधात ठाकरे गट आक्रमक



**नाशिक : प्रतिनिधी**

**मराठी भाषेच्या विरोधात वक्तव्य करणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी भैयाजी जोशी यांचा राज्यव्यापी निषेध म्हणून शिवसेना ठाकरे गटातर्फे शालिमार चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले.**

मुंबईत वास्तव्य करणाऱ्या सर्वांनाच मराठी आली पाहिजे असे काही नाही. घाटकोपरची भाषा गुजराती आहे, अशी मुक्ताफळे भैयाजी जोशी यांनी उधळल्याने महाराष्ट्रीयन जनतेत संतापाची लाट आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यास शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते शालिमार चौकात जमले होते. यावेळी भैयाजी जोशी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. हिम्मत असेल तर कर्नाटक किंवा तमिळनाडूत अशी वक्तव्ये करून दाखवा, असा इशाराही ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी जोशी यांना दिला. यावेळी उपनेते सुनील बागूल, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, माजी आमदार वसंत गिते, उपजिल्हाप्रमुख जगनराव आगळे, देवानंद बिरारी, सचिन मराठे, मामा राजवाडे, गुलाब भोये, कन्नू ताजने, युवासेना जिल्हाधिकारी राहुल ताजनपुरे, भाविसे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, श्रमिक सेना जिल्हाध्यक्ष अजय बागूल, विधानसभाप्रमुख बाळासाहेब कोकणे, राहुल दराडे, शिवसेना पदाधिकारी देवा जाधव, शैलेश सूर्यवंशी, सुभाष गायधनी, ऋषी वर्मा, संजय चिंचोरे, नीलेश साळुंखे, विशाल कदम, मसूद जिलानी, बंडूशेठ दळवी, सुनील जाधव, प्रथमेश गिते, ऋतुराज पांडे, प्रशांत दिवे, योगेश देशमुख, वैभव खैर, राजेंद्र सूर्यवंशी, गोरख वाघ, सुनील निरगुडे, महेंद्र आव्हाड, रवींद्र गामणे, हर्षद पटेल, दादाजी अहिरे, नाना पाटील, अजय काकड, स्वप्निल आवटे, साहेबराव जाधव, आकाश उगले, लखन कुमावत, बबलू साबळे, मयूर जुन्नरे, भूषण भामरे, कुंदन मिश्रा, सुनील भालेकर, संदीप जाधव, राहुल मैद, संजय थोरवे, राजू राठोड, विजय काकड,नितीन जाधव, महिला आघाडी पदाधिकारी स्वाती पाटील, सीमा डावकर, शोभा दोंदे, सुवर्ण काळुंगे, शोभा वाढले, योगिता गायकवाड, रंजना थोरवे, माधुरी पाटील, आदी उपस्थित होते.

## विद्यापीठ प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांतील पदवी, पदव्युत्तर आणि एकात्मिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत १३ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षा या आधी मे-जूनमध्ये होत असत. मात्र, विद्यार्थी व पालकांची मागणी आणि नव्या शिक्षण धोरणाची अंमलबजावणी विचारात घेऊन यंदा फेब्रुवारीतच प्रवेशपरीक्षा घेण्याचे विद्यापीठाने ठरवले. त्यानुसार १२ फेब्रुवारीपासून ऑनलाइन प्रवेश अर्ज खुले करण्यात आले. ही मुदत ३ मार्चपर्यंत होती. हे अर्ज भरण्याची मुदत आता १३ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग, संशोधन केंद्रे आणि प्रशाळांमध्ये विविध पदवी, पदव्युत्तर पदवी आणि एकात्मिक अभ्यासक्रम राबविले जातात. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेशपरीक्षा अनिवार्य आहे.

विद्यापीठातर्फे पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ४ एप्रिल रोजी, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन प्रवेशपरीक्षा १८ ते २० मार्चदरम्यान घेण्यात येणार आहेत. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेचे निकष आणि प्रवेशप्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी पुढील संकेतस्थळ पहावे, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे. https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx





# गिफ्ट व्हाऊचरच्या फेक लिंक्सचा सुळसुळाट

### लिंक्स ओपन न करण्याचे सायबर पोलिसांचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

**सायबर भामटे नेहमीच फसवणूक करण्याची संधी शोधत असतात. महिला दिनाच्या निमित्ताने सोशल मीडियावर काही ब्रॅण्ड्सच्या नावाने विशेष सूट किंवा गिफ्ट व्हाऊचर मिळणार असण्याचा दावा करणारे मेसेज फिरत आहेत. यात बनावट मेसेजसह बनावट (फिशिंग) लिंकही दिली जात आहे.**

महिला दिनानिमित्त व्हॉट्सॲप या सोशल मीडियावर डीमार्ट, मिशो आदी शॉपिंग साइट्सच्या फेक लिंक्स आणि मेसेजेस व्हायरल होत आहेत. सध्या सायबर गुन्हे वाढले आहेत. शॉपिंग आणि ऑफर्स म्हटले की, महिलांचा आवडीचा विषय त्यामुळे या प्रकारांना महिलावर्ग फसण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून अशा लिंक्स् ओपन करू नये, असे आवाहन पोलिस विभागाच्या सायबर सेलतर्फे करण्यात आले आहे.



सणवार वा विशेष दिनानिमित्त ई बाजार तेजीत असतो. त्यामुळे प्रत्येक इव्हेंट कॅश करण्याचा ई बाजाराचा फंडा असतो. त्यामुळे विविध ऑफर्सचे आमिष ग्राहकांना दाखविले जाते. परंतु याचा सायबर भामटे गैरफायदा घेत फेक लिंक्स आणि मेसेजेस व्हायरल करतात. यातून अनेकांचे बँक अकाउंट रिकामे होऊ शकते. त्यामुळे अनोळखी मेसेजेस् आणि लिंक्स ओपन करू नये, असे सायबर तज्ज्ञही सांगतात.

सध्या महिला दिनानिमित्त अनेकांच्या व्हॉट्सॲपवर या लिंक्स व्हायरल होत आहे. ही लिंक ओपन केली असता यामध्ये प्रश्न उत्तरांची एक सिरीज दिली जाते. सोपे प्रश्न विचारत वैयक्तिक व बँक खात्याची माहिती, बँक, एटीएम कार्ड नंबर, पासवर्ड, सीव्हीव्ही नंबर, इंटरनेट बँकिंग आयडी पासवर्ड घेतले जात आहे. त्यानंतर सायबर गुन्हेगार नमूद बँक खात्याच्या माहितीचा वापर करून लोकांची फसवणूक करीत आहेत.



> अनोळखी लिंकला, मेसेजला, मेलला नागरिकांनी बळी पडू नये. कोणीही मोफत काही देत नसतात. अशा आमिषाला बळी पडल्यास नुकसान होऊ शकते. अशा लिंक्स् ओपन करू नका, शेअर करू नका.
>
> **- प्रशांत बच्छाव**, पोलिस उपायुक्त (गुन्हे)



> बनावट मेसेजसह बनावट (फिशिंग) लिंकही दिली जात आहे. लिंक ओपन केल्यास ब्रँडच्या नावाने आणि लोगोचा वापर करून एक पेज दिसते. त्यात यूजरची माहिती मागितली जाते. ही फसवणूक आहे. अशा भूलथापांना बळी पडू नये.
>
> **- ओंकार गंधे** (सायबर सुरक्षा तज्ज्ञ)

### नागरिकांसाठी सूचना

आपली गोपनीय माहिती बँक खाते क्रमांक, बँक एटीएम कार्ड नंबर, पासवर्ड, इंटरनेट बँकिंग पासवर्ड असे कोणतेही संवेदनशील माहिती कोणालाही शेअर करू नये. अशा कोणत्याही मेसेजवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही ब्रँडच्या नावाने आलेल्या फिशिंग किंवा बनावट लिंकवर क्लिक करू नये. आपली माहिती, आर्थिक तपशील, ओटीपी कोणालाही कोणत्याही परिस्थितीत देऊ नये. फसवणुकीसंदर्भात संशय आल्यास सायबर हेल्पलाइनवर संपर्क करावा.

# संपादकीय

## तस्करीत अडकली अभिनेत्री



महसूल गुप्तचर संचालनालय म्हणजे डायरोक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्सने (डीआरआय) गेल्या सोमवारी कन्नड अभिनेत्री रान्या राव हिला बंगळुरूच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करुन सुमारे १५ किलो सोने जप्त केले. ही देशात एक चर्चेची बातमी ठरली. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आणखी काही गोष्टी बाहेर येण्याची शक्यता आहे. कर्नाटकमधील वरिष्ठ भारतीय पोलिस प्रशासन अधिकारी रामचंद्र राव यांची रान्या हा सावत्र मुलगी आहे. अभिनेत्री असल्याने ती सोन्याच्या तस्करीत गुंतली असल्याचा घ्यायला जागा नव्हती. त्यातही आपण एका पोलिस अधिकाऱ्याची मुलगी असल्याने संशय घेतला जाणार नाही, असा तिचा समज असावा. परंतु, सुरक्षा यंत्रणा डोळ्यांत तेल घालून काम करणारी असते, हे तिच्या लक्षात आले नसावे. गेल्या वर्षात तिने दुबईचा तब्बल ३० वेळा प्रवास केला म्हणजे ती दर महिन्याला दुबईला जात होती. गेल्या १५ दिवसांत चार वेळा दुबईला प्रवास करून ती आली होती. तिचा सातत्याने आंतरराष्ट्रीय प्रवास सुरू असल्यामुळे पोलिस तिच्यावर नजर ठेवून होते. पोलिसांना संशय आल्याने तिची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मोठ्या प्रमाणात सोने सापडले. रान्या राव सोने तस्करी करत होती, असे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. संशयावरून गेल्या सोमवारी रात्री तिला प्रथम तपासणीसाठी आणि नंतर चौकशीसाठी रोखण्यात आले. तपासादरम्यान, तिच्याकडून मोठ्या प्रमाणात सोने जप्त करण्यात आले. तिच्या अंगावर मोठ्या प्रमाणात सोने होते आणि सोन्याच्या काही विटा तिने आपल्या कपड्यांमध्ये लपवून ठेवल्या होत्या. तिने किलोच्या हिशोबाने सोने भारतात आणल्याचा आरोप आहे. प्रति एक किलो सोन्याच्या तस्करीसाठी तिला १ लाख रुपये मिळत होते, असे वृत्त आहे. याचा विचार करता दुबईच्या प्रत्येक वारीसाठी तिला सुमारे १२ ते १३ लाख रुपये मिळत होते, असा अंदाज आहे. तस्करीसाठी खास बनवलेले जॅकेट्स आणि कमरेच्या पट्ट्यांचा ती वापर करायची. सोन्याचे बार लपवण्यासाठी ती वारंवार तेच जॅकेट्स आणि पट्टे वापरत होती. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी तिने परिधान केलेल्या विशेष जॅकेटमधूनच सोन्याचे बार हस्तगत केले. तिला विमानतळावर थांबवले. त्यावेळी तिने स्वतःला पोलिस अधिकारी रामचंद्र राव यांची मुलगी असल्याचे सांगितले, मात्र आधीपासूनच माहिती असलेल्या अधिकाऱ्यांनी तिची झडती घेतली आणि सोन्याचा मोठा साठा जप्त केला. या प्रकरणात आतापर्यंत एकूण १७.२९ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी तिच्या बंगळुरूतील घरावर छापा मारून तब्बल २.०६ कोटींचे सोन्याचे दागिने आणि २.६७ कोटी रोख रक्कम जप्त केली. विमानतळावर तिने वडिलांचे नाव सांगितले यावरुन झडती आणि तपासणी टाळण्यासाठी ती आपल्या वडिलांच्या नावाचा वापर करत होती, असे दिसून येते. परंतु, तिच्या वडिलांनी याबाबत कानावर हात ठेवले आहेत. ही घटना धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी आहे. मला या प्रकरणाची कोणतीही कल्पना नव्हती. अन्य कोणत्याही पित्याप्रमाणे हे माझ्यासाठीही धक्कादायक आहे. ती आमच्यासोबत राहत नाही, ती पतीसह स्वतंत्र राहते. असे म्हणत रामचंद्र राव यांनी या प्रकरणाची आपणास माहिती नसल्याचे सांगितले आहे. चार महिन्यांपूर्वीच तिचा विवाह झाला. त्यानंतर ती आमच्याकडे आली नाही. तिच्या किंवा तिच्या पतीच्या व्यावसायिक व्यवहारांविषयी आम्हाला कोणतीही माहिती नाही, त्यांच्या काही कौटुंबिक समस्या असतील, तर काही माहिती नाही, असेही त्यांनी सांगितले. ते कर्नाटक राज्य पोलिस गृहनिर्माण महामंडळाचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. रान्या रावने विमानतळावरील सुरक्षा यंत्रणेला चकवा देण्याचा प्रयत्न केला होता. इतकेच नव्हे, तर एका पोलिस कॉन्स्टेबलने तिला कोणतीही सुरक्षा तपासणी न करता विमानतळाबाहेर काढण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती समोर आली आहे. तपास अधिकारी आता या दाव्याची सत्यता पडताळत असून, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या कोणत्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती होती किंवा कोणी तिला मदत केली का, याचा शोध घेत आहेत. ती एकटी तस्करी करीत होती की की दुबई आणि भारतामधील मोठ्या तस्करी नेटवर्कचा भाग आहे, याची सखोल तपासणी सुरू आहे. या तस्करीत कोणाकोणाचा संबंध आहे काय? हे तपासातून स्पष्ट होईल. एका पोलिसाच्या मदतीने ती तस्करी करत होती, असे म्हटले जात आहे. जतीन हुक्केरी हा रान्याचा पती आहे. तो प्रतिथयश आर्किटेक्ट आहे. त्यांचे किंवा त्यांच्याशी संबंधित कोणाचेही काम दुबईत सुरू नाही अशीही माहिती पोलिसांना मिळाली. रान्या दुबईत तस्करीसाठी जात असावी, असा संशय पोलिसांना आला होता. तिचे वडील रामचंद्र रामचंद्र राव हे कर्नाटक राज्य पोलिस गृहनिर्माण महामंडळाचे महासंचालक आहेत. त्यांनी याआधी अतिरिक्त पोलिस महासंचालक आणि इतर उच्चपदांवरही काम केलेले आहे. कर्नाटक राज्य पोलिस निवास आणि विकास निगम लिमिटेडचे प्रबंध संचालक म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. सोने तस्करीशी आपला काहीही संबंध नाही, असे त्यांनी म्हटले असले तरी ते यापूर्वी वादांमध्ये अडकले होते. मैसूर येथील बस लुटीच्या घटनेत त्यांचं नाव समोर आलं होते. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांना निलंबित करण्यात आले होते. एका बंदुकधारी माणसाने काही पोलिसांनी बसची लूट करुन सव्वा दोन कोटी रुपये चोरले होते. या प्रकरणाची सीआयडी चौकशी झाली. ज्यानंतर बंदुकधारी माणसाला अटक झाली आणि राव यांची बदली करण्यात आली होती. इतरही छोट्या वादांमध्ये त्यांचे नाव आले होते. ३३ वर्षीय रान्या राव ही दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने कन्नड आणि तामिळ भाषेतील अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिचा जन्म कर्नाटकातील चिकमंगलूर या गावात झाला. तिने आपले प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण बेंगळुरूमधून पूर्ण केलं. सिनेसृष्टीत पाऊल ठेवण्याआधी रान्याने अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. सन २०१४ मध्ये रान्या रावने 'मानिक्य' या प्रसिद्ध कन्नड चित्रपटातून सिनेसृष्टीत पाऊल ठेवले. तिने अभिनेता सुदीपबरोबर चित्रपटात मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारली होती. प्रेक्षकांनी या चित्रपटाला भरभरून प्रतिसाद दिल्याने अत्यंत कमी वेळात तिला मोठी लोकप्रियता मिळाली. आता तिची प्रतिमा डागाळली गेली आहे.

## विचारधन



### प्रपंचाच्या अपूर्ण गोष्टींत केव्हाही समाधान मिळणार नाही

सर्व अनुभवांत आत्मप्रचिती ही खरी. दुसऱ्याने पुष्कळ अनुभव सांगितले, परंतु स्वत:ला येईल तो अनुभव हाच खरा महत्त्वाचा. आत्मप्रचितीने जागरूकता येईल, भाव वाढेल, साधनाला जोर येईल आणि भगवत्प्राप्ती लवकर होईल. संतांनी पुष्कळ गोष्टी आजवर आपल्याला सांगितल्या परंतु त्यांना देव जसा हवासा वाटला तसा आपल्याला वाटतो का? प्रपंच करीत असताना भगवंताची आपल्याला आवश्यकता वाटते का? आपण असा विचार करावा की, आपण लहानाचे मोठे झालो, विद्या संपादन केली, नोकरी मिळाली, लग्न झाले, मुलेबाळे झाली, घरदार केले परंतु आपल्याला अजून काहीतरी हवेसे वाटतेच आहे! हे आपले 'हवेपण' केव्हा संपणार? आपण नोकरी करतो, कोणी वकिली, डॉक्टरकी; नोकरी करणारा, मालकाला आपल्याशिवाय दुसरा कोणी नोकर मिळणार नाही म्हणून काही नोकरी करीत नाही किंवा अशिलाला कोणी दुसरा वकील मिळणार नाही म्हणून वकील वकिली करीत नाही. म्हणजेच नोकरीवाला काय, डॉक्टर काय, वकील काय कोणीही आपापले कर्म केवळ त्या कर्मासाठीच करीत नाही, तर त्यातून आपल्याला सुख मिळेल या ईर्ष्येने तो ते करीत असतो. परंतु आपण पाहतोच की सर्व काही केले, आयुष्यही संपले, तरी काहीतरी करण्याचे राहूनच जाते; त्याला पूर्णता येत नाही. एखादी गोष्ट आपल्याला मिळाली की, आता यापुढे काही करायचे उरले नाही असे काही वाटत नाही. आता काहीएक नको आहे, जेवढे आहे त्यात समाधान आहे असे कधी वाटते का? पुढे कसे होईल, हे सर्व टिकेल का, यात आणखी भर कशी पडेल याची विवंचना कायमच ! एखाद्याचे लग्न ठरले ते झाले की, आता प्रपंचाची काळजी मिटली असे वाटते का? लग्न झाल्यावर, समजा पाच वर्षे मूल झाले नाही तरी हा काळजी करतोच आणि समजा, मुलेच मुले झाली तरीही याची काळजी आहेच! तेव्हा या प्रपंचाच्या गोष्टी अपूर्ण आहेत. त्यांतून समाधान लाभेल हे कसे शक्य आहे? या गोष्टी एकातून एक निर्माण होणाऱ्या आहेत. ज्या ज्या म्हणून सुखाच्या गोष्टी मानल्या त्या सर्व जरी एकत्र केल्या तरी त्यांतून समाधान निर्माण होणार नाही.

**- गोंदवलेकर महाराज**

# स्त्री म्हणजे कणखर कर्तृत्व....

दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन अर्थात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. प्रत्येक महिलेसाठी हा सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. महिलांच्या योगदानाला आणि समाजातील त्यांच्या कर्तृत्वाला आंतरराष्ट्रीय मान्यता देण्यासाठी आणि समाजात त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.या दिवसाचा इतिहास असा कि मार्च १९०८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो महिला कामगारांनी रुटगर्स चौकात जमून ऐतिहासिक निदर्शने केली. १९१० मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या आंदोलनाच्या स्मरणार्थ हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून स्वीकारण्याचा ठराव झाला. महिलांना समाजात विशेष स्थान आणि सन्मान देण्यासाठी २८ फेब्रुवारी १९०९ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला, परंतु १९७५ मध्ये अमेरिकेने हा दिवस ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला. यानंतर दरवर्षी ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. ८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे १९७५ हे वर्ष युनोने ऋजागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. यंदाच्या जागतिक महिला दिवस २०२५ ची थीम -ccelerate



-ction ठेवण्यात आली आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांसाठी जे काही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये निर्णय घेतले जात आहे त्यावर कारवाईचा वेग वाढवावा. महिलांना समानता देण्याची प्रक्रिया वेगाने करणे आहे.

**दृष्टिक्षेप**

**डॉ. रत्ना चोपडे**

९४०३०२०२५०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते. त्यांच्यावर गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रचंड प्रभाव होता. असे म्हणतात कि प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो , परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगती मागे फक्त एकाच महापुरुषाचा हात आहे डॉ . बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. भारतीय स्वतंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही अनेक स्त्रीस्वतंत्र विरोधी अनेक रूढी परंपरा आजही कायम आहेत. समाज आजही कितीतरी मागासलेला आहे. स्त्रीभ्रूण हत्या अजूनही होत आहे, स्त्रियांवर होणार कौटुंबिक हिंसाचार आज हि कायम आहे, कितीतरी स्त्रियांवरील अत्याचाराचे न्यालयीन खटले विलंबित आहे, न्यायासाठी स्त्रिया लढत आहे, राजकीय किंवा सत्तेतील लोक पदाचा गैरवापर करून स्त्रियांवर अन्याय करत आहे व त्यांना कोणतीही शिक्षा होत नाहीये म्हणून अश्या राजकीय वरदहस्त असलेल्या लोकांमध्ये कोणावर अन्याय करण्याची भीती उरलेली नाही . मुलींची छेडछाड, बलात्कार , अल्पवयीन मुलींवरील अत्याचार याचे प्रमाण वाढत आहे. ज्यांच्या हातात न्याय यंत्रणा आहे ते देखील पैसे आणि सत्तेचे गुलाम झाले आहे. तेव्हाच तर न्यायप्रक्रिया मंदावली आहे. या सर्व बाबींचा विचार करता येणाऱ्या पिढीला आपण विशेषतः. मुलींना आपण स्वावलंबनाचे धडे देणे महत्वाचे आहे. मुलींना मुलांच्या बरोबरीने शिक्षण देणे त्यांना स्वतः च्या पायावर उभे करणे ही प्रत्येक पालकांची जबाबदारी आहे. मुलींचे शिक्षण करून त्या स्वावलंबी होण्याआधीच कित्येक पालक हुंडा देऊन मुलींचे लग्न करतात आणि त्यांना वाटते कि आपले कर्तव्य पूर्ण झाले पण त्यानंतर मुलींना अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते, जसे कि एखादी दुर्घटना, अकाली विधवा होणे, वाढते घटस्फोट,एकटीवर येणाऱ्या कौटुंबिक जबाबदारी या अशा संकटाना अनेक जणींना सामोरे जावे लागते. तेच जर त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्या तर ते सहज या संकटावर मात करू शकता,खूप सारा हुंडा देऊन लग्न करण्यापेक्षा त्यांना योग्य ते शिक्षण देऊन स्वावलंबी होण्यास पाठींबा देणे हे आजच्या समाजात खूप गरजेचे आहे. महिलांचे आरोग्य हा आजच्या समाजात सर्वात जास्त लक्ष देण्याचा विषय आहे. एक स्त्री खूप साऱ्या जबाबरदाऱ्या हाताळत असते यात त्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, स्त्री जर मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या सुदृढ असेल तरच ती एक आदर्श समाज घडवू शकते. स्त्रीने स्वतः आपल्या आरोग्याकडे लक्ष देऊन वेळेवर तपसण्या व उपचार करणे गरजेचे आहे. कारण त्यांच्याशिवाय घराला घरपण आणि समाजाला पूर्णत्व येणार नाही.

**ज्याला स्त्री आई म्हणून कळली, तो जिजाऊचा शिवबा झाला... ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली, तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला...**
**ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली, तो राधेचा श्याम झाला...**

# एक दिवस 'ति'च्यासाठी

**एक दिवस तिच्यासाठी म्हणजेच आपल्या प्रत्येकाच्या घरातील आपली आई, बहीण, पत्नी, वहिनी व आपली आजीबाई आणि आपल्या आजूबाजूच्या सर्वच महिलांसाठी आनंदी दिवस म्हणजे जागतिक महिला दिन आज महिला दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण सोशल मीडियाच्या माध्यमातून अक्षरशा शुभेच्छांचा वर्षाव करतो. आपल्या सोबत काम करणाऱ्या महिला तसेच आपल्या मैत्रिणी यांना शुभेच्छा देतो व सोबत आपण काम करत असलेल्या ठिकाणी महिला दिन साजरा करत असतो. पण हाच महिला दिन आपण आपल्या घरातील महिला भगिनींसोबत साजरा करतो का? व त्या दिवशी त्यांना साध्या शुभेच्छा तरी देतो का? हाच घरोघरी विरोधाभास दिसून येतो.**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने घरातील पूर्ण कामाला सुट्टी घेऊन घरातील सर्व महिलांना एखाद्या महिला दिनाच्या कार्यक्रमाला व त्यांच्या मनाप्रमाणे जगण्यासाठी हा एक दिवस दिला गेला तर त्यांचा आनंद नक्कीच द्विगुणित झालेला पाहायला मिळेल. पूर्वीच्या काळानुसार आता समाजामध्ये खूप मोठा बदल झालेला आपण पाहतो. पूर्वी महिला चूल आणि मूल या बंधनामध्ये अडकत होत्या. सध्या महिला या पुरुषांपेक्षा मोठमोठ्या पदावर व समाजामध्ये एका विशिष्ट उंचीवर पोचलेल्या आपण रोजच्या जीवनामध्ये अनुभवत असतो. हा बदल फक्त शिक्षणामुळे आणि पूर्वीची एक म्हण आहे मुलगी शिकली प्रगती झाली या म्हणीप्रमाणे एखाद्या घरामध्ये तीन मुली असतील तर ते तीनही मुली उच्च शिक्षण घेऊन तसेच काही मुली उच्च शिक्षण घेऊन व्यवसायामध्ये उंच भरारी घेतलेल्या आपण पाहतो. व त्यामुळे त्या आपल्या घराचा पाया स्वतःच्या ंषमतीवर व कर्तुत्वावर मजबूत करत असतात. महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये संधी मिळत असल्यामुळे त्या स्वतः च्या कर्तृत्वावर व त्यांच्याकडील

**विशेष**

**अजित सांळुके**

९४२०४१५१२९

गुणवैशिष्ट्यांमुळे ते संधीचे सोनं केलेला आपण पाहतो. काही स्त्रियांच्या नशिबी लवकरच घरातील सर्व जबाबदारी त्यांच्यावरती पडलेले आपण पाहतो. त्यावेळी त्या स्त्रिया आलेल्या संकटांना तोंड देऊन ती एक सक्षम व धाडसी महिला म्हणून वावरत असते.

तसेच सर्व महिला नोकरी व्यवसायाबरोबर स्वतःचे घर मुलं व नातेवाईक व घरातील ज्येष्ठांची काळजी घेत ही सगळे नातेसंबंध अत्यंत चोखपणे बजावत असतात. महिलांच्या जीवनामध्ये कितीही मोठी संकट आली तरी सर्वच महिला त्या संकटाला घाबरून माघार घेतलेली एकही महिला भगिनी सापडणार नाही. आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक स्त्रीला लक्ष्मीची उपमा दिलेली आहे. आणि ती खरंच कुटुंबामध्ये लक्ष्मीचा रूप घेऊन काम करत असते. आणि आपल्या घराला विशिष्ट उंचीवर घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करत असते. त्यामुळे आपल्या घराला घरपण येतं आपल्या घरातील स्त्रि म्हणून जसं ती घरातील प्रत्येक व्यक्तीला सांभाळून घेते. तसेच तिलाही आपल्या हक्काच्या व्यक्तीने सांभाळून घ्यावं अशी तिचीही अपेक्षा असते. आणि ती या महिला दिनी घरोघरी पूर्ण होईल हीच महिला दिनाच्या निमित्ताने अपेक्षा... तसेच सर्व महिलांना महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा...

# महिला दिन उत्साहाने साजरा करताना

**जागतिक महिला दिन म्हणजे महिलांना त्यांच्या आत्मसन्मानाची जाणीव करून देणारा दिवस! ८ मार्चच्या जागतिक महिला दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वत्र विविध कार्यक्रमांचे यथोचित आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे यंदाही मोठ्या जल्लोषात जागतिक महिला दिन साजरा होईल.**

आज केवळ जागतिक पातळीवरच नव्हे तर आपल्या देशातही असे एकही क्षेत्र नाही जेथे महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवलेला नाही. मग त्या गगनभरारी घेणाऱ्या वैमानिक महिला असोत, क्रीडा क्षेत्र गाजवणाऱ्या तसेच जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या महिला असोत वा बँकिंग क्षेत्रातील, कॉर्पोरेट जगतातील उच्चपदस्थ महिला, राजकारणात येऊन मंत्रिपद, मुख्यमंत्रिपद भूषविणाऱ्या स्त्रिया असोत किंवा प्रशासनातील उच्चपदस्थ नोकरशहा महिला असोत, अशा वेगवेगळ्या क्षेत्रात वावरणाऱ्या, पुढारलेल्या उच्चशिक्षित, सुशिक्षित व स्वयंसिद्ध महिलांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. खरेच ही आनंदाची बाब आहे. परंतु दुसरीकडे आजही कौटुंबिक हिंसाचाराला, लैंगिक अत्याचाराला बळी पडणाऱ्या महिलांचे तसेच बेपत्ता होणाऱ्या महिलांचे प्रमाण खूप मोठे आहे. (२०२४ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाला महिलांच्या घरगुती हिंसाचार आणि हुंड्यासाठी छळासंबंधित एकूण ६ हजार २३७ तक्रारी प्राप्त झाल्या.) शिवाय स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह, हुंडाबळी या समस्याही आजही पूर्णत्वाने मिटलेल्या नाहीत. ८ मार्चचा जागतिक महिला दिन उत्साहाने आणि जल्लोषाने साजरा करताना आपल्या या उपेक्षित भगिनींच्या वास्तवाचे भान सर्वांनीच ठेवणे गरजेचे आहे.

**-प्रदीप शंकर मोरे**

# स्वावलंबी स्त्री, सक्षम समाज!

**महिला म्हणून आपण अनेक भूमिका निभावत असतो-आई, बहीण, पत्नी, मुलगी आणि व्यावसायिक. परंतु या सर्व भूमिकांसोबत एक स्त्री या नात्याने, तिची आर्थिक साक्षरता ही देखील तितकीच महत्त्वाची आहे. त्यासाठी तिने स्वत:च्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवायला हवे, आपली बचत, गुंतवणूक आणि कर नियोजन यांची शास्त्रशुद्ध माहिती मिळवून, आपले आर्थिक स्वातंत्र्य सुनिश्चित करणे आवश्यक आहे, कोणावरही अवलंबून राहता कामा नये. आपल्या छोट्यात-छोट्या आर्थिक सवयींनी भविष्यात मोठ्या संधी निर्माण करता येतात.**

शिक्षण, करिअर, व्यवसाय आणि गुंतवणुकीत पुढे जात, स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यास, संपूर्ण समाज अधिक सक्षम आणि समृद्ध बनेल! ग्रामीण किंवा



निमशहरी भागातील शिक्षित महिला आणि मुली या सुद्धा अर्थार्जनासाठी प्रयत्न करू शकतात. त्यांना एकच सांगणे योग्य वाटते ते म्हणजे :

**कौशल्यांवर भर द्या :**

डिजिटल स्किल्स : ग्राफिक डिझाइन, कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, वेब डेव्हलपमेंट यांसारखी कौशल्ये शिकून ऑनलाइन काम मिळवू शकतात.

हस्तकला व लघुउद्योग : जसे की हाताने बनवलेल्या वस्तू, शेतीपूरक उद्योग (हनी बी फार्मिंग, ऑरगॅनिक उत्पादन), अन्न प्रक्रिया व्यवसाय (चटण्या, लोणची, पापड) याला चांगली मागणी आहे.

टेलरिंग व फॅशन डिझायनिंग : स्थानिक बाजारपेठ आणि ऑनलाइन विक्रीसाठी नवीन डिझाइन्स तयार करता येतात.

**विशेष**

**नीता नितीन डोंगरे**

**गुंतवणूक व कर सल्लागार**

शिक्षण व ट्रेनिंग : ट्यूशन क्लासेस, स्पोकन इंग्लिश किंवा डिजिटल मार्केटिंग शिकवून कमावता येईल.

**स्वयंरोजगाराच्या संधी शोधा :**

ऑनलाईन क्लासेस, वेबिनार्सद्वारे नवीन कौशल्ये शिका. व्हॉट्सअँप, फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब यांचा योग्य वापर करून व्यवसाय वाढवा. ऑनलाइन स्टॉक मार्केट कोर्सेस पूर्ण करून ट्रेडिंग आणि गुंतवणुकीचा अभ्यास करा.

महिलांसाठी विशेषत : सुरक्षित गुंतवणूक पर्याय शोधा आणि त्यावर मार्गदर्शन द्या.

कर सल्लागार म्हणून संधी :

लहान-मोठ्या उद्योजकांसाठी फिनान्सियल प्लॅनिंग आणि टॅक्स सेवांचे पॅकेजेस ऑफर करा. बँका, म्युच्युअल फंड कंपन्या, विमा कंपन्यांसोबत टायअप करा.

शिक्षित महिलांसाठी आर्थिक साक्षरता, गुंतवणूक आणि कर सल्लागार म्हणून करिअरच्या मोठ्या संधी आहेत. तुम्ही यापैकी कोणत्या क्षेत्रात काम करायला इच्छुक आहात ते ओळखा. स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हा, आणि इतर महिलांनाही सक्षम बनवण्यासाठी पुढाकार घ्या!

# स्त्रीशक्ती : इतिहास, सामर्थ्य आणि भविष्यातील आव्हाने

स्त्री ही केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शिल्पकार आहे. तिच्या निःस्वार्थ सेवेमुळेच समाजाचा वटवृक्ष बहरू शकला आहे. इतिहासाच्या पानांवर नजर टाकली, तर सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा पाया रचला, रमाबाई रानडे व डॉ. आनंदीबाई जोशी यांनी १९व्या शतकातच स्त्रीच्या बौद्धिक क्षमतेची पताका फडकावली. झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, सरोजिनी नायडू, अरुणा आसफ अली, इंदिरा गांधी, सुचेता कृपलानी यांच्यासारख्या अनेक महिलांनी स्वातंत्र्य, राजकारण आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यात अजरामर छाप सोडली.

स्त्रीचे खरे सामर्थ्य हे अडगळीतून मार्ग काढण्याच्या क्षमतेत आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या बंधनांना छेद देत, आज ती अंतराळशोधापासून ते तंत्रज्ञानापर्यंत, क्रीडांगणापासून संसदेपर्यंत प्रभुत्व मिळवत आहे. पी. व्ही. सिंधूसारख्या खेळाडूंनी भारताचे नाव जगभर गौरवले आहे. इसरोच्या महिला शास्त्रज्ञांचे अंतराळातील यश, ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांची अविश्रांत मेहनत हे तिच्या बहुआयामी सामर्थ्याचे प्रतीक आहेत.

स्त्रीच्या डोळ्यात स्वप्ने, मनात जिद्द आणि हातात प्रेम असते. ती घराला हसवते, समाजाला दिशा दाखवते आणि राष्ट्राला गौरवान्वित करते. मात्र, २१व्या शतकातही तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. लैंगिक असमानता, मजुरीतील तफावत, घरगुती हिंसा, सायबर गुन्हे, मूलभूत आरोग्य व शिक्षणाच्या सुविधांचा अभाव अशा अनेक अडचणी अजूनही तिला भेडसावत आहेत.

समाजाने तिच्या पंखांना बळ देणे आवश्यक आहे. तिला केवळ संरक्षण नव्हे तर संधी देण्याची गरज आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि मानसिक स्थैर्याचे शस्त्र तिच्या हाती दिल्यास ती केवळ स्वतःच नव्हे, तर संपूर्ण समाजाला प्रकाशित करेल.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः या प्राचीन सूक्तीला खरे ठरवायची वेळ आली आहे. चला, तिच्या तेजाला फुलू द्या आणि तिच्या सामर्थ्याला सलाम करा!

**प्रा. भालचंद्र यशवंत पाटील**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

# शेअर बाजारात चढ-उतार, सेन्सेक्स लाल रंगात बंद

**मुंबई : शेअर बाजारात सेन्सेक्समध्ये घसरण झाली त्याच वेळी, निफ्टी वाढीसह बंद झाला आहे. ३० संवेदनशील निर्देशांकांचा समावेश असलेला सेन्सेक्स ७.५१ अंकांनी किंवा ०.०१ टक्क्यांनी घसरून ७४,३३२.५८ अंकांवर बंद झाला. निफ्टी ७.८० अंकांनी किंवा ०.०३ टक्क्यांनी घसरून २२,५५२.५० वर बंद झाला.**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर्स सर्वाधिक ३ टक्क्यांनी वाढले. त्याच वेळी, टाटा मोटर्सचे शेअर्स १.२८ टक्क्यांनी वाढून बंद झाले. दुसरीकडे, इंडसइंड बँकेचे शेअर्स आणि झोमॅटोचे शेअर्स ३ टक्क्यांहून अधिक घसरणीसह बंद झाले. दुसरीकडे, एनटीपीसी २.२९ टक्क्यांनी घसरून बंद झाला. आज निफ्टीमधील २२७ कंपन्यांच्या शेअर्समध्ये अप्पर सर्किट आहे. त्याच वेळी, ५२ कंपन्यांच्या शेअर्समध्ये कमी सर्किट आहे.



जागतिक बाजारपेठेत सकारात्मक संकेत आणि विविध क्षेत्रांमध्ये खरेदीची जोरदार उत्सुकता यामुळे व्यापक बाजारपेठेत झालेल्या जोरदार तेजीमुळे मिडकॅप निर्देशांक जवळजवळ ३ टक्क्याने वाढला. सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले, ज्यामध्ये धातू आणि सार्वजनिक क्षेत्रातील समभाग आघाडीवर होते. आठवड्यात निफ्टीमधील जवळपास ४० समभागांनी वाढ नोंदवली, त्यापैकी चार समभागांनी दुहेरी अंकी वाढ नोंदवली.

निफ्टीवरील टॉप परफॉर्मर्समध्ये बीईएल, टाटा स्टील, बीपीसीएल, हिंडाल्को, अदानी एंटरप्रायझेस आणि अदानी पोर्ट्स हे प्रमुख होते. मिडकॅप सेगमेंटमध्ये इंडिया सिमेंट्स, अदानी एनर्जी, अलेम्बिक फार्मा आणि एचपीसीएल हे सर्वात जास्त वाढले. आठवड्यातील चांगल्या कामगिरीनंतर शुक्रवारी बाजार मंदीच्या स्थितीत बंद झाला. सेन्सेक्स ८ अंकांनी घसरून ७४,३३३ वर बंद झाला, तर निफ्टी ५०८ अंकांनी घसरून २२,५५३ वर बंद झाला. निफ्टी बँक निर्देशांक १३० अंकांनी घसरून ४८,४९८ वर स्थिरावला आणि मिडकॅप निर्देशांक १५८ अंकांनी घसरून ४९,१९१ वर स्थिरावला.

ट्रम्पच्या अप्रत्याशित धोरणांमुळे, विशेषतः मेक्सिकन आणि कॅनेडियन वाहन उत्पादकांवरील कर वाढण्यास विलंब करण्याच्या त्यांच्या अलीकडच्या निर्णयामुळे बाजारातील भावना देखील डळमळीत झाल्या आहेत.

**ट्रम्प यांचा टॅरिफ वॉर**

सध्या सुरू असलेल्या टॅरिफ युद्धाला एक नवीन वळण देत, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोमधून आयात होणाऱ्या वस्तूंवरील टॅरिफ तात्पुरते थांबवले आहेत, ज्यामुळे वाढत्या व्यापार तणावादरम्यान बाजारातील चिंता कमी झाली आहे. उत्तर अमेरिकन व्यापार कराराअंतर्गत आठवड्याच्या सुरुवातीला लागू करण्यात आलेल्या आणि २५% पर्यंत जाणाऱ्या या टॅरिफमुळे आर्थिक व्यत्यय येण्याची भीती निर्माण झाली होती.

# धारावी प्रकल्पाला स्थगिती देण्यास कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली :**

धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) अदानी ग्रुपच्या कंपनीला देण्यास विविध राजकीय पक्षांनी मोठा विरोध केला. मात्र त्यानंतरही धारावी पुनर्विकास प्रकल्पाचं काम अदानी यांच्या कंपनीला देण्यात आला. त्यामुळे दुबईतील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन या कंपनीनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र सर्वोच्च न्यायालयानं अदानी यांच्या कपंनीकडून सुरू असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्यास शुक्रवारी नकार दिला. या अगोदर मुंबई उच्च न्यायालयानंही अदानी ग्रुपच्या कामाला स्थगिती देण्यास नकार दिला. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वात न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाला स्थगिती देण्यासाठी याचिका : दुबईतील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशननं धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. यासाठी सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन या कंपनीनं धारावी पुनर्विकास प्रकल्पाचं अदानी ग्रूप करत असलेलं काम थांबवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र मुंबई उच्च न्यायालयानं ही याचिका फेटाळून लावत धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशननं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र सर्वोच्च न्यायालयानं त्यांच्या याचिकेला फेटाळत त्यांना मोठा धक्का दिला आहे.

अदानी ग्रूपला नवीन निविदा जारी करण्याच्या निर्णयाला आव्हान : दुबईतील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशननं दाखल केलेल्या याचिकेवर खंडपीठानं महाराष्ट्र सरकार आणि अदानी कंपनीला नोटीस बजावली. यूएई फर्मनं धारावी झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी २०१९ ची बोली रद्द करण्याच्या आणि २०२२ मध्ये अदानीला नवीन निविदा जारी करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान दिलं. सेकलिंकनं त्यांची ऑफर २० टक्क्यांनी वाढवणार असल्याचं सांगितल्यानंतर खंडपीठानं ही याचिका विचारात घेतली होती.

**अदानी कंपनीनं सुरू केलं आहे काम :**

दुबईतील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन या कंपनीनं दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी झाली. यावेळी अदानी समूहाच्या वतीनं बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी खंडपीठासमोर जोरदार युक्तिवाद केला. अदानी कंपनीकडून धारावी पुनर्विकास प्रकल्पाचं बांधकाम आधीच सुरू झालं आहे. अदानी कंपनीनं हजारो कामगारांना रोजगार दिला आहे. कोट्यवधी रुपयांची बांधकाम उपकरणं खरेदी करुन करोडो रुपयांचा निधी गुंतवला आहे. त्या जागेवरील रेल्वे क्वार्टर पाडण्याचं काम सुरू झालं आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**काम थांबवण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार :**

ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांची बाजू ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं काम थांबवण्यास नकार दिला. प्रकल्पाच्या ठिकाणी सुरू असलेलं काम थांबवण्याची गरज नाही. मात्र अदानींनी सर्व देयकांसाठी एस्क्रो अकाउंट ठेवावं, अशा सूचना खंडपीठानं दिल्या. त्यामुळे दुबईतील कंपनीला मोठा धक्का असल्याचं स्पष्ट झालं.

# जिओस्टार ११०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढणार

**मुंबई :**

जिओस्टार त्यांच्या ११०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकणार आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये वायाकॉम १८ ची मूळ कंपनी वॉल्ट डिस्नेमध्ये विलीन झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांच्या भूमिका एकमेकांशी जुळत होत्या. म्हणजे एकाच स्थितीत दोन लोक होते. म्हणूनच कंपनीने हा निर्णय घेतला आहे.

वृत्तानुसार, विलीनीकरणानंतरच्या पुनर्रचनेचा भाग म्हणून कंपनीतील टाळेबंदी गेल्या महिन्यात सुरू झाली आणि ती जूनपर्यंत सुरू राहू शकते. कंपनी वितरण, वित्त, व्यावसायिक आणि कायदेशीर विभागांमधील अनावश्यक भूमिका काढून टाकत आहे. कंपनी कर्मचाऱ्यांना ६ महिने ते १ वर्षाचे वेतन देऊन कामावरून काढून टाकत आहे. जर एखादा कर्मचारी एक वर्षापूर्वी रुजू झाला असेल तर त्याला एक महिन्याचा पूर्ण पगार मिळेल आणि इतर कर्मचाऱ्यांनाही तोच पगार मिळेल. यासोबतच एक ते तीन महिन्यांचा नोटीस कालावधी देखील दिला जाईल. डिस्ने स्टार इंडिया आणि रिलायन्सच्या व्हायाकॉम-१८ चे विलीनीकरण गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झाले. यामध्ये डिस्ने हॉटस्टार आणि जिओ सिनेमाचाही समावेश आहे. या दोन्ही कंपन्यांनी गुरुवार, १४ नोव्हेंबर रोजी याची घोषणा केली. विलीनीकरणानंतर, ते देशातील सर्वात मोठे मनोरंजन नेटवर्क बनले आहे. डिस्ने-रिलायन्स एंटरटेनमेंटचे आता २ ओव्हर द टॉप (ओटीटी) आणि १२० चॅनेलसह ७५ कोटी प्रेक्षक आहेत. या संयुक्त उपक्रमासाठी रिलायन्सने ११,५०० कोटी रुपये गुंतवले आहेत. गेल्या एक वर्षापासून विलीनीकरण प्रक्रिया सुरू होती. दोन्ही कंपन्यांनी सांगितले- 'हा करार ७०,३५२ कोटी रुपयांना झाला आहे.' विलीनीकरणानंतर स्थापन होणाऱ्या कंपनीत रिलायन्सचा ६३.१६% आणि डिस्नेचा ३६.८४% हिस्सा असेल. या नवीन कंपनीच्या अध्यक्षा नीता अंबानी असतील. उपाध्यक्ष उदय शंकर असतील. ते कंपनीला धोरणात्मक मार्गदर्शन प्रदान करतील.

# तळेगाव येथे नवीन उत्पादन प्रकल्प सुरू



**मुंबई :**

मेकॅट्रॉनिक्स क्षेत्रातील अग्रणी मार्क्वार्टने भारतातील उपस्थिती वाढवण्याचा निर्णय घेतला असून, आज तळेगाव (पुणे) येथे नव्या उत्पादन प्रकल्पाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. या नवीन सुविधेसह या कुटुंब व्यवस्थापित कंपनीने आपल्या पूर्वीच्या मुंबईतील उत्पादन केंद्राऐवजी तळेगावमधील केंद्र सुरू केले असून उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. यामुळे बदलत्या बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी आणि अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी कंपनीची क्षमता वाढली आहे. या प्रकल्पासाठी इमारत, यंत्रसामग्री आणि उपकरणांमध्ये १८० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली आहे. भविष्यात, या अत्याधुनिक प्रकल्पातून भारतीय ऑटोमोटिव्ह उद्योगासाठी मेकॅट्रॉनिक सिस्टीम सोल्युशन्सचे उत्पादन करण्यात येणार आहे.

मार्क्वार्ट ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्योर्न ट्रेहाउस म्हणाले, भारत ही मार्क्वार्टसाठी मोठ्या संधी असलेली महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथे आम्ही आघाडीच्या वाहन उत्पादकांसोबत सहकार्य करत काम करत आहोत आणि भारतातील टीमच्या नवकल्पनाशक्ती आणि तांत्रिक कौशल्याचा प्रभावी उपयोग करत आहोत. तळेगाव येथील नवीन प्रकल्पाच्या उद्घाटनासह आम्ही भारतातील यशस्वी प्रवास पुढे नेत आहोत आणि भविष्यातील वाहतुकीच्या मेकॅट्रॉनिक प्रणालींचा प्रमुख पुरवठादार म्हणून आमची भूमिका अधिक बळकट करत आहोत.

मार्क्वार्ट इंडियाचे महाव्यवस्थापक विशाल नार्वेकर म्हणाले, तळेगाव येथील नवीन उत्पादन केंद्राचे उद्घाटन हा मार्क्वार्टसाठी भारतातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. भारतीय ऑटोमोटिव्ह उद्योगातील ग्राहकांसोबत आमचे दीर्घकालीन आणि भक्कम संबंध आमच्या वाढीसाठी महत्त्वाचे ठरले आहेत. या विस्ताराच्या माध्यमातून, स्थानिक भागीदारांच्या गरजेनुसार जागतिक दर्जाचे मेकॅट्रॉनिक सोल्युशन्स पुरवण्याची आमची वचनबद्धता आम्ही अधिक बळकट करत आहोत. अत्याधुनिक असेंब्ली लाइन्स, इन-हाऊस इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि प्रभावी लॉजिस्टिक्स सुविधांच्या माध्यमातून, मार्क्वार्ट तळेगाव येथून ग्राहकांसाठी संपूर्ण मेकॅट्रॉनिक सोल्युशन्स पुरवते. यामध्ये ड्राइव्ह ऑथरायझेशन सिस्टिम, गियर सिलेक्टर स्विच आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी मॅनेजमेंट सिस्टिम यांचा समावेश आहे. तसेच, या गुंतवणुकीमुळे पुरवठा साखळी अधिक सुटसुटीत झाली असून, प्रतिसादाचा वेग वाढला आहे आणि उत्पादन प्रक्रिया अधिक लवचिक झाली आहे. पुढील पाच वर्षांत, मार्क्वार्ट या नवीन प्रकल्पामध्ये सुमारे ३०० अतिरिक्त रोजगार संधी उपलब्ध करणार आहे.

# बँक ऑफ इंडियाच्या पाथर्डी फाटा शाखेचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडिया यांच्या पाथर्डी फाटा, नाशिक येथील नवीन शाखेचे उद्घाटन ७ मार्च २०२५ रोजी पार पडले. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बँकेचे उपमहाप्रबंधक लगनजीत दास, आंचलिक प्रबंधक महेश कानविंदे आणि उपआंचलिक प्रबंधक सतीश भराडी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नाशिक शहरातील पाथर्डी फाटा परिसर नागरिकांसाठी ही नवीन शाखा ए विंग शॉप नंबर १, २ व्रज कॅपिटल जी. पी. मिठाई शेजारी, पाथर्डी फाटा, नाशिक येथे सुरू होत असून, परिसरातील ग्राहकांना अत्याधुनिक आणि उत्कृष्ट बँकिंग सेवा पुरविण्यात येणार आहे. स्थानिक व्यापारी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही शाखा उपयुक्त ठरणार आहे.

या नव्या शाखेमध्ये बँक ऑफ इंडियातर्फे विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध असणार आहेत. यामध्ये बचत खाते, चालू खाते, मुदत ठेव योजना, गृह कर्ज, वाहन कर्ज, शिक्षण कर्ज, वैयक्तिक कर्ज, व्यावसायिक कर्ज यांसारख्या कर्ज सुविधा तसेच डिजिटल बँकिंग,



मोबाइल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, एटीएम सेवा, यूपीआय पेमेंट्स आणि इतर अत्याधुनिक सुविधा ग्राहकांना मिळणार आहेत.

या कार्यक्रमासाठी विविध मान्यवर, ग्राहक व इतर बँकेचे अधिकारी तसेच बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. नव्या शाखेमुळे परिसरातील नागरिकांना आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेने करता येतील, असे बँकेकडून सांगण्यात आले आहे. शाखा प्रबंधक आणि त्यांच्या टीमने उपस्थित नागरिकांना उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# केंद्रीय कर्मचाऱ्यांना होळीपूर्वी गुड न्यूज! महागाई भत्ता वाढण्याची शक्यता

**नवी दिल्ली :**

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना लवकरच आनंदाची बातमी मिळणार आहे. याचा फायदा लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनधारकांना होईल. खरंतर, मोदी सरकार होळीपूर्वी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठी भेट देऊ शकते. होळीपूर्वी केंद्र सरकार जानेवारी-जून वेतनवाढीसाठी डीए आणि डीआरमध्ये वाढ जाहीर करणार आहे. अहवालानुसार, सरकार या महिन्यात होळीपूर्वी २ टक्के महागाई भत्ता वाढवण्याची घोषणा करू शकते. वर्षातून दोनदा (जानेवारी आणि जुलैपासून लागू) जाहीर होणारी महागाई भत्ता वाढ, महागाई दरानुसार केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होते.

होळीपूर्वी जाहीर होणाऱ्या महागाई भत्त्यात केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे. यानंतर महागाई भत्ता मूळ पगाराच्या ५३ वरून ५५ टक्के होईल. तथापि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर अंतिम निर्णय घेतला जाईल. होळीचा सण १४ मार्च २०२५ रोजी आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या शेवटच्या महागाई भत्त्यात, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२४ पासून ३ टक्के महागाई भत्ता वाढ मिळाला. या वाढीनंतर, महागाई भत्ता मूळ वेतनाच्या ५० टक्क्यांवरून ५३ टक्के झाला. पेन्शनधारकांनाही महागाई सवलतीत अशीच वाढ मिळाली. सरकारी कर्मचाऱ्यांना डीए दिला जातो, तर पेन्शनधारकांना डीआर दिला जातो.

२ टक्के महागाई भत्त्यात वाढ केल्याने केंद्र सरकारच्या प्राथमिक स्तरावरील कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन सुमारे १८,००० रुपये प्रति महिना आहे, त्यांच्या पगारात १ जानेवारी २०२५ पासून ३६० रुपयांची वाढ होईल. जर एखाद्याचा पगार दरमहा ३०,००० रुपये असेल आणि त्याचा मूळ पगार १८,००० रुपये असेल, तर त्याला आता ९,५४० रुपये महागाई भत्ता मिळेल, जो मूळ पगाराच्या ५३ टक्के आहे. तथापि, अपेक्षित २ टक्के वेतनवाढीनंतर, कर्मचाऱ्याला दरमहा ९,९०० रुपये मिळतील, जे ३६० रुपये जास्त आहे. तथापि, ३ टक्के महागाई भत्त्यात वाढ झाल्यास, कर्मचाऱ्याला महागाई भत्त्यात ५४० रुपयांची वाढ मिळेल जी दरमहा १०,०८० रुपये असेल.

# 'टोयोटा किर्लोस्कर मोटर' साजरा करणार अनोखा महिला दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

महिला सबलीकरणाला बळकटी देत टोयोटा किर्लोस्कर मोटर २०२५ चा आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या थाटामाटात साजरा करणार आहे. ऑटोमोटिव्ह उद्योगात महिलांचे सबलीकरण आणि पुरुषांप्रमाणेच महिला कर्मचाऱ्यांना देखील समान संधी देण्याची आपली वचनबद्धता त्यांनी यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. उद्योगातील लिंगआधारित कर्मचारी समतोल साधताना निर्माण होणारे अडथळे दूर करण्याच्या आपल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, टोयोटा किर्लोस्कर मोटर उत्पादन, तंत्रज्ञान क्षेत्रासह आघाडीच्या पदांमध्ये महिलांना प्राधान्य देणाऱ्या धोरणांना आणि सुविधांना प्राधान्य देत आहे. २०३०



पर्यंत ३०% महिला प्रतिनिधित्व साध्य करण्याच्या उद्देशाने, टीकेएम संस्थेतील महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि उन्नतीसाठी अनेक उपक्रम राबवत आहे.

या वर्षीचा महिला दिन 'ॲक्सिलरेट ॲक्शन्स' या संकल्पनेवर आधारित असणार आहे जो टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. महिलांसाठी सर्वसमावेशक कार्यस्थळ निर्माण करणे, त्यांच्या प्रतिभेला वाव देणे आणि उत्पादन क्षेत्रात त्यांना येणारे अडथळे दूर करणे हा या मागील उद्देश आहे. महिलांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्यासाठी, टीकेएम आपल्या बिडाडी प्रकल्पात एक विशेष कार्यक्रम आयोजित करणार आहे, जिथे ५०० हून अधिक महिला कर्मचारी सहभागी होतील. या कार्यक्रमात प्रमुख अधिकाऱ्यांची चर्चासत्रे, पॅनेल सत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम राहणार असून, उत्कृष्ट योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव केला जाईल. या प्रसंगी टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वित्त आणि प्रशासन विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष जी. शंकरा म्हणाले, टोयोटा किर्लोस्कर मोटरमध्ये आम्ही लिंगआधारित कर्मचारी विविधतेला केवळ एक आकडेवारी म्हणून पाहत नाही, तर नाविन्य आणि प्रगतीसाठी असलेला आवश्यक घटक मानतो. आमची समावेशक कार्यसंस्कृती केवळ धोरणांपुरती मर्यादित नसून, जिथे महिलांचा भरभराट होईल, त्यांना नेतृत्वाच्या संधी मिळतील आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळेल असे वातावरण निर्माण करणे हा आमचा उद्देश आहे. आमच्या सततच्या कौशल्यवृद्धी उपक्रमांद्वारे, आम्ही अधिकाधिक महिलांना या क्षेत्रातील भविष्याचा एक मुख्य भाग बनवण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्यामुळे २०३० पर्यंत ३०% महिला प्रतिनिधित्वाचे आमचे लक्ष्य अधिक दृढ होईल. या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने, आम्ही आमच्या महिला कर्मचार्यांच्या जिद्दीचा, सामर्थ्याचा आणि योगदानाचा सन्मान करतो, ज्या केवळ टोयोटाच्या यशाला नाही तर संपूर्ण ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या भविष्यात आकार देत आहेत. ऑटोमोटिव्ह क्षेत्रात लिंग आधारित कर्मचारी विविधतेला चालना देण्यासाठी कौशल्यविकास महत्त्वाचा आहे आणि टीकेएम महिलांना उद्योग-केंद्रित प्रशिक्षणाद्वारे सक्षम बनवण्यासाठी वचनबद्ध आहे. टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट या प्रयत्नात महत्त्वाची भूमिका बजावत असून, विद्यार्थ्यांची वार्षिक प्रवेशक्षमता १२०० पर्यंत वाढविण्यात आली आहे ज्यातील ५०% जागा महिलांसाठी राखीव आहेत. याचच एक ठोस पुरावा म्हणजे टीकेएमच्या महिला मॅरेथॉन टीमने २०२४ मध्ये झालेल्या ग्लोबल टोयोटा मॅरेथॉन रिले रेसमध्ये १०वे स्थान पटकावले होते. यामुळे केवळ खेळात नव्हे, तर प्रत्येक क्षेत्रात महिलांची जिद्द आणि ताकद अधोरेखित झाली. याशिवाय, ''टोयोटा कौशल्य -लर्न अँड अर्न उपक्रमाने प्रशिक्षणार्थींना जागतिक स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्ये दिली आहेत, ज्यामुळे त्यांचे रोजगार आणि दीर्घकालीन रोजगार संधी वाढल्या आहेत.

## बाजार - कंपन्या - मनोरंजन



### दिमाखात पार पडला 'स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२५'

**मुंबई :** कलाकार आणि प्रेक्षक वर्षभर ज्या पुरस्कार सोहळ्याची आतुरतेने वाट पहात असतात तो स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२५ नुकताच दिमाखात पार पडला. स्टार प्रवाह परिवार पुरस्कारांचं यंदाचं पाचवं वर्ष. त्यामुळे प्रवाह परिवाराच्या उपस्थितीत केक कापून हा आनंद साजरा करण्यात आला. स्टार प्रवाह परिवार सोहळ्याच्या रेड कार्पेट थीमची नेहमीच चर्चा असते. प्रत्येक मालिकेच्या टीमला दिला जाणारा रंग आणि थीम यामुळे रेड कार्पेटवर कलाकारांचा हटके अंदाज लक्ष वेधणारा असतो. यंदाही कलाकारांच्या एकापेक्षा एक पेहरावाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. एरव्ही स्टार प्रवाहच्या लोकप्रिय मालिकांमधील या लोकप्रिय कलाकारांना आपण त्यांच्या व्यक्तिरेखेमध्ये भेटत असतो. पण स्टार प्रवाह परिवार पुरस्काराच्या निमित्ताने या सर्व कलाकारांचा अनोखा अंदाज भाव खाऊन गेला. १६ मार्चला सायंकाळी ७ वाजल्यापासून स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२५ पाहायला मिळणार आहे. स्टार प्रवाहच्या कुटुंबाचा हा कौतुक सोहळा म्हणजे प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची अनोखी पर्वणी असते. यंदा कोणते कलाकार पुरस्कारांवर विजेतेपदाची मोहोर उमटवणार आहेत याची उत्सुकता आहे. खुमासदार सूत्रसंचालन, धमाकेदार परफॉर्मन्सेस आणि विनोदी आतषबाजीने परिपूर्ण असा हा सोहळा पाहायला विसरू नका रविवारी १६ मार्चला संध्याकाळी ७ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

### २५ टक्क्यांनी घसरले रिलायन्सचे शेअर्स

**मुंबई :** मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स इंडस्ट्रीजच्या शेअर्सनी ८ जुलै २०२४ रोजी बीएसईवर १,६०८.९५ रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला होता. तेव्हापासून आतापर्यंत रिलायन्सचे शेअर्स मंदीच्या दबावाखाली आहेत. त्यांच्या शेअर्सच्या किमतीत उच्चांकापासून २५% घट झाली आहे. किरकोळ मंदी आणि कमकुवत रिफायनिंग मार्जिन दरम्यान परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ब्लूचिप स्टॉक विकल्यामुळे गुंतवणूकदारांचे ५.४ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. जानेवारी २०२४ पासून रिलायन्सची कामगिरी निफ्टीपेक्षा १०% कमी राहिली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये निराशा झाली आहे.

### अशी ही जमवाजमवी चित्रपटाचं पोस्टर प्रदर्शित!

**मुंबई :** चित्रपट आणि प्रेमकथा हे आपलं आवडतं समीकरण. अशीच एका नव्या प्रेमाची नवी परिभाषा आपल्याला लवकरच




अनुभवायला मिळणार आहे. राहुल शांताराम यांच्या राजकमल एंटरटेन्मेंटद्वारे प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ आणि वंदना गुप्ते अभिनीत नवा मराठी चित्रपट अशी ही जमवा जमवी लवकरच आपल्या भेटीला येत आहे. त्याची दमदार घोषणा काही काळापूर्वी झाली होती, आजच या सिनेमाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित झालं आहे. नव्या दमाच्या तसंच अनुभवी कलाकारांचं मिश्रण असलेल्या या चित्रपटाचं लक्षवेधी पोस्टर पाहून अतिशय खुमासदार आणि मनोरंजक अशा या गोष्टीबद्दल प्रेक्षकांच्या मनात नक्कीच उत्सुकता निर्माण झालेली आहे. विशेष म्हणजे, अनेक वर्षांनी दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांची जोडी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. त्यांना ओमकार कुलकर्णी व तनिष्का विशे या नवीन जोडीसह सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर अशा लोकप्रिय कलाकारांची साथ लाभलेली आहे. 'थोडी खट्याळ, थोडी गोंडस, थोडी हळवी' अशी ही अनोखी गोष्ट लोकेश गुप्ते आपल्यासमोर घेऊन येत आहेत. १० एप्रिल २०२५ रोजी 'राजकमल एंटरटेन्मेंट'चा हा नवाकोरा चित्रपट आपल्या जवळच्या सिनेमागृहात येणार आहे.

### सहकार क्षेत्राला केंद्र शासनाचे मोठे पाठबळ : तावरे

**पुणे : प्रतिनिधी**

सहकार विषयासंदर्भात केंद्र शासनाशी संबंध येत नव्हता. सर्व अडी-अडचणींसंदर्भात राज्य शासनाशी संपर्कात असायचो. मात्र, सन २०१८ पासून केंद्राशी संबंधात आहोत. दररोज चांगले निर्णय होत आहेत. सहकार क्षेत्राला केंद्र शासनाचे मोठे पाठबळ आहे. राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे यांनी सांगितले पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त 'सहकारी बँकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता- एक गेम चेंजर' या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजनकरण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य हौसिंग सोसायटी फेडरेशनचेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध भागातील ३५० बँकांच्या प्रतिनिधींचा सहभाग परिषदेमध्ये होता. आयुक्त तावरे म्हणाले, सहकारी बँकांची क्षमता केवळ आकडयांमध्ये न मोजता त्यांचे सोशल ऑडिट होणे गरजेचे आहे.सर्व प्रकारचे धोके पत्करुन गरजूंना बँका मदत करतात. यातून मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य उभे रहात आहेत.सहकारी बँकांची ही चांगली बाजू लोकांसमोर यायला हवी. आपण डिजिटल क्षेत्रात गेलो आहोत. सेवा आणि नोंदी या डिजिटल स्वरुपात द्यायला हव्या.एआय च्या माध्यमातून परदेशात अनेक ठिकाणी व्यवहार सुरु आहेत. त्याप्रमाणे पुढचे पाऊल टाकायला हवे.असे ते म्हणाले ॲड. मोहिते म्हणाले, सहकारात सहकार हा मंत्र जपण्याचा प्रयत्न करीत आहोत. बँकिंगमध्ये सर्वत्र डिजिटायझेशन सुरू आहे. आता एआय चे नवे पर्व सुरु होत आहेत.त्यात मागे राहता कामा नये. पूर्वी बँकेत येऊन प्रत्यक्ष काम चालत होते. आता ग्राहकांचे बँकेत येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. बँकेत न जाता बँकिंग करण्याची सवय आहे. शाखा बँकिंग राहिल की नाही, प्रसाद भारदे यांनी सूत्रसंचालन व नीलेश ढमढेरे यांनी आभार मानले.

गांवकरी
नाशिक, शनिवार, दि. ८ मार्च २०२५

जागतिक महिला दिन



# विंचूरची संघर्ष कन्या कॅप्टन गौरी महाडिक

संदीप शिरसाट

एके काळी चूल आणि मूल याच्यातच अडकलेली स्त्री घराबाहेर पडली. शिक्षित झाली. आणि प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. पुरुषांची मक्तेदारी असलेले अंतराळ क्षेत्र असो अथवा सैन्य दलही याला अपवाद राहिले नाही. दृढ निश्चय व स्वकर्तृत्वाने भारतीय सैन्य दलात कॅप्टनसारख्या उच्च पदाला गवसणी घालणारी विंचूरची संघर्ष कन्या कॅप्टन गौरी महाडिकची संघर्षगाथा.

मूळचे विंचूरचे रहिवासी असलेले व नोकरीनिमित्त कल्याण येथे वास्तव्यास असलेल्या शशिकांत विठ्ठल पवार व उषा शशिकांत पवार या दाम्पत्याची गौरी महाडिक ही द्वितीय कन्या. गौरीने कॉमर्स शाखेच्या पदवीबरोबरच सी.एस.व एल.एल.बी. या पदव्या घेऊन मुंबई येथे एका कॉर्पोरेट कंपनीत कंपनी सेक्रेटरीसारखे उच्च पद व उत्तम पगाराची नोकरी मिळवली. उच्च शिक्षित व उच्च नोकरी असलेल्या गौरीचा विवाह दि.१५ फेब्रुवारी २०१५ रोजी विरार येथील मेजर प्रसाद महाडिक यांच्याशी थाटामाटात झाला. प्रसाद महाडिक हे भारतीय सैन्य दलात ७ बिहार रेजिमेंटचे मेजर म्हणून अरुणाचल प्रदेशात भारत-चीन सीमेवर तैवांग येथे कार्यरत होते. मनासारखे जोडीदार मिळाल्याने दोघेही आनंदी होते. व आपल्या सुखी संसारात रममाण झाले होते. मात्र, नियतीला हे सुख बघवले नाही. विवाहानंतर अवघ्या अडीच वर्षांतच दि.३० डिसेंबर २०१७ रोजी भारत-चीन सीमेवर झालेल्या एका दुर्घटनेत मेजर प्रसाद महाडिक यांना वीरमरण आले. आणि गौरीवर दु:खाचा डोंगर कोसळला. गौरीचे सुखी संसाराचे स्वप्न भंग पावले. पती शहीद झाल्यानंतर समाजाकडून गौरीला वीरपत्नीचा बहुमान मिळण्याऐवजी अवहेलना वाट्याला येऊ लागली. परंतु जिद्दीला पेटलेल्या गौरीने स्वत:ला सावरले. आणि पतीचे अधुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय सैन्य दलात जाण्याचा मनाशी निश्चय केला व त्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले.

गौरीने कंपनी सेक्रेटरीपदाचा राजीनामा देऊन भारतीय सैन्य दलाची सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाची (एस.एस.बी.) परीक्षा दिली. पहिल्या वेळेस तिला अपयश आले. परंतु पतीची वर्दी परिधान करण्याचा चंग बांधलेल्या गौरीने दुसऱ्या प्रयत्नात अव्वल क्रमांक पटकावला व चेन्नई येथे ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमीत ४९ आठवड्यांची खडतर ट्रेनिंग घेऊन ७ मार्च २०२० रोजी वयाच्या ३३ व्या वर्षी भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट म्हणून रुजू झाली व आज कॅप्टन होऊन ड्रोन पायलट म्हणून भारतीय सैन्य दलात कर्तव्य बजावत आहे.

एकदा मेजर प्रसाद महाडिक यांची टोपी सहजच गौरीने घातली होती. तेव्हा कडक शिस्तीच्या मेजर प्रसाद महाडिक यांनी गौरीला ही टोपी घालण्यासाठी मेहनत घ्यावी लागते, रक्ताचे पाणी करावे लागते. तुला ही टोपी घालण्याची एवढीच इच्छा असेल तर तू ही मेहनत कर आणि सैन्यात भरती हो मगच ही टोपी घाल, असे रागावून सांगितले होते. गौरीने पतीच्या मनातील सुप्त इच्छा पूर्ण करूनच शहीद पती प्रसाद महाडिक यांना श्रद्धांजली अर्पण केली. शहीद प्रसाद महाडिक यांचे अस्तित्व गौरीच्या रूपाने आजही जिवंत आहे. अनेक संकटांचा सामना करीत गौरीने जिद्दीने आपले ध्येय साध्य केले. जीवनात संघर्षाला पर्याय नाही. संघर्ष मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशोशिखर गाठता येते. हेच गौरीने सिद्ध केले.



# सौंदर्य शाप की वरदान?

देवयानी सोनार, नाशिक



आज जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा केला जाईल. महिला दिन महिलांशी संबंधित सर्व गोष्टींचा ऊहापोह या निमित्ताने केला जाईल. आई, मुलगी, बहीण, पत्नी, मैत्रीण आदी अनेक नात्यांतून महिलेबद्दल कनवाळूपणाचे गोडवे गायले जातील. महिला दिनानिमित्ताने अनेकविध उपक्रम राबविले जातील. विविध ऑफर्सपासून ते कुटुंबातील महिलांसाठी विविध सेलिब्रेशनचे प्लॅन आखले जातील. अशा रीतीने महिला दिनाचा एक दिवस साजरा केला जाईल. पण खरंच महिलेच्या आयुष्यात महिला दिन साजरा करण्यासाठी वा तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण पात्र आहोत का, हा पुरुषांनी विचार करायला हवा.

एक स्त्री दिसली की तिच्या कपड्यांपासून ते तिच्या कांतीपर्यंत नखशिखांत न्याहाळले जाते. त्यावेळी तिची बुद्धिमत्ता, तिचे पद, ती कोणत्या कामासाठी तुमच्याकडे आली, तिला कोणती गरज आहे. कसली मदत हवी आहे, या सर्व गोष्टीकडे नंतर पाहिले जाते.

कल्पना माझी मैत्रीण. तिच्या आयुष्यात सौंदर्य म्हणजे शाप अशी तिची धारणा झाली आहे. त्याला कारणही तसंच आहे. नव्वदीचा काळ होता. नुकतीच तिने दहावी परीक्षा पास होऊन कॉलेजात प्रवेश घेतला. परंतु त्या काळी मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण जास्त असल्याने (तिच्या वडिलांचे मत) तुमची मुलगी अतिशय सुंदर आहे. असे शेजारीपाजारी, नातेवाईक सतत बोलत असे. वडिलांना मुलगी म्हणजे विस्तव वाटत असते. त्यामुळे मुलीला पुढील शिक्षण न घेता लग्नबंधनात अडकवायचे ठरविले. नात्यातच लग्नाची बोलणी केली. कल्पना एके दिवशी कॉलेजमधून घरी आली आणि लगेच सुपारीचा कार्यक्रम केला. तिला विचार करण्याची संधीही दिली नाही. तिचे मतही विचारात घेतले नाही. मुळातच ती सुंदर गोरीपान, अभ्यासात, स्वयंपाकातही हुशार आणि कलाकुसरीचे कामे, शिवणकाम सर्वगुणसंपन्न म्हणावी अशी कल्पना कुटुंबीयांच्या शब्दाला मान देत लग्नाच्या बोहल्यावर चढली. सुरुवातीला स्वप्नवत वाटणारा संसार मुलाच्या जन्मानंतर अधिकच बहरला. परंतु तिचे सौंदर्याने तिच्याच सासरच्या कुटुंबात कुणाच्या नजरेत खुपत होते. तिच्या पतीच्या मोठ्या भावाला ती सुरुवातीपासून आवडली होती. परंतु तो गावी शेती करीत असल्याने कल्पनाच्या वडिलांनी तिला मोठ्या भावाला न देता शहरात राहणाऱ्या नोकरी करणाऱ्याला मुलगी दिली होती. हा राग मनात तसाच ठेवत तिच्या मोठ्या दिराने लग्न केले संसार सुरू झाला परंतु कल्पना मनातून जाईना. एका प्रसंगी तिला घरी बोलवत त्याने आणि त्याच्या बायकोने तिच्यावर अन्नातून विषप्रयोग केला. त्या प्रसंगातून ती कशीबशी वाचली आणि तिने घर गाठले तर काही दिवसांत तिच्या पतीने अचानक दुसरे लग्न केले. आणि दुसऱ्या बायकोला घरी कल्पना समोर आणले. या कृत्यामुळे कल्पनाला धक्का बसला. तिने मुलाला घेत माहेरी राहण्याचा निर्णय घेतला. तिला वाटले थोड्या दिवसांत नवऱ्याला आपली चूक कळेल परंतु तीन वर्षे तिचा नवरा तिला घ्यायला आला नाही. दरम्यानच्या काळात ती आईवडिलांकडे राहत असताना वेगवेगळे कोर्सेस केले. पुढचे शिक्षण घेतले.परंतु माहेरी लग्न झालेली आपलीच मुलगी पालक आणि इतर भावंडांना खुपायला लागते. हे तिच्या बाबतीतही घडले. तिच्या भावंडांना वाटले ही कायमची इथे राहिली तर प्रॉपर्टीवर हक्क सांगेल. आपली लग्न जमायला अडचण होईल. त्यामुळे काही कारणास्तव वाद करीत भावाने घराबाहेर काढले. येथेच तिची सहनशक्ती संपली. ती मुलाला घेत नवऱ्याने घेतलेल्या फ्लॅटमध्ये कुलूप तोडून रहायला गेली. नवरा दुसऱ्या बायकोसोबत दुसऱ्या गावी निघून गेलेला होता. परंतु नवऱ्याला ही आपल्या फ्लॅटमध्ये रहायला आली हे समजल्यावर वाद केला. कल्पनाने कायदेशीररीत्या समजून आणि पोलिसी खाक्या दाखविताच सुतासारखा सरळ झाला आणि त्यानंतर रीतसर घटस्फोटासाठी अर्ज केला. आज ते विभक्त झाले आहेत. लग्न ते आजमितीस विभक्त होण्याच्या प्रवासात खूप काही घडून गेले आहे. एक एक अनुभवाने तिला एवढे मजबूत बनविले आहे की, तिचा परीसस्पर्श प्रत्येक स्त्रीला व्हावा, असे व्यक्तिमत्त्व घडले आहे.

आईवडिलांकडे राहत असताना तिने शिक्षण पूर्ण केले. वेगवेगळे कोर्सेस, परीक्षा देत एका सरकारी संस्थेत नोकरी लागली पण नोकरीच्या ठिकाणीही तिला तिच्या दिसण्यावरून कपड्यावरील कमेंटला तोंड दिले. त्यानंतर स्वतःमध्ये बदल केला. योगा क्लासेस, हास्यवर्ग, विविध आरोग्यविषयक अभ्यास करून स्वतः एक मोटिव्हेशनल स्पीकर व्हावी असे खंबीर आणि कणखर नेतृत्वगुण विकसित केले. या प्रवासात अनेक पुरुषांनी तिला सौंदर्यावरून तिची छेडखानी किंवा त्रास देणे सुरूच ठेवले होते. पण तिने न डगमगता तिचा प्रवास सुरू ठेवला. मुलाला उच्च शिक्षण देत त्याचे लग्न एकटीच्या हिमतीवर लावून दिले.

कल्पना सांगते तिचे शिक्षण आणि हिंमत कोणी हिरावून घेऊ शकत नाही. हीच आपली शिदोरी असून, महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची गरज आहे. कोणत्याही प्रसंगाला हिमतीने तोंड दिले पाहिजे. समाजात वावरताना स्त्री म्हणून जेव्हा आपल्याकडे पाहिले जाते तेव्हा स्त्री म्हणजे भोगवस्तू म्हणून नाही तर आपल्यातील क्षमता आणि कर्तृत्व दाखविण्याची वेळ आली आहे. त्यामुळे समाजाची मानसिकता आजही स्त्री एकटी राहते याबद्दल नकारात्मक आहे. एकटी स्त्री आहे. तिला मानसिक आधाराची गरज असताना तिला ओरबाडण्यात समाजाला धन्यता वाटते ही मोठी शोकांतिका असल्याचे कल्पना सांगते.

आजही कामाच्या ठिकाणी तिला वारंवार येणारे मेसेजेस ती मैत्रिणींना दाखवते आणि समोरचे किती कमकुवत मनाचे आहेत. मेसेज करणाऱ्यांना माहिती नाही की माझा संघर्ष काय आहे. कोणत्या परिस्थितीत मी घडले आहे. सर्वांना सहज सोपी मी हवी असते. सौंदर्य माझ्यासाठी शापच आहे असे तिचे मत आहे.

# परंपरागत भूमिका आणि बदलत्या सामाजिक जबाबदाऱ्या

मृणाल पाटील, नाशिक

स्त्री ही संस्कृतीचा कणा आहे, कारण ती सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक मूल्ये जपण्याचे काम करत आली आहे. तिच्या स्नेह, समर्पण आणि धैर्यामुळे समाजाची घडी सुस्थितीत राहते. मात्र, केवळ परंपरा जपणारी भूमिका निभावणारी स्त्री पुरेशी नाही; ती समाजातील बदलांची वाहक देखील आहे. शिक्षण, अर्थार्जन, नेतृत्व आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसह स्त्रीची भूमिका झपाट्याने बदलत आहे.

परंपरागत भूमिका संस्कृतीचा कणा.....

भारतीय संस्कृतीत स्त्री ही मातृशक्ती मानली गेली आहे. तिच्या कष्टाने आणि सहनशक्तीने कुटुंब, समाज आणि राष्ट्र एकत्र बांधले जाते. स्त्री ही आई, बहीण, पत्नी आणि कन्या या नात्यांनी घराचा आधारस्तंभ राहिली आहे. पारंपरिक काळात ती मुख्यत: घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणारी होती. भारतीय समाजात स्त्रीने आपल्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी, संस्कृतीच्या रक्षणासाठी मोठे योगदान दिले आहे.

शिक्षणाच्या अभावामुळे आणि सामाजिक बंधनांमुळे पूर्वी स्त्रियांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. पण तरीही, सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर अशा अनेक स्त्रियांनी समाज बदलण्याचे कार्य केले. यावरून स्पष्ट होते की स्त्री केवळ संस्कृती जपणारी नसून, समाज बदलण्याची ताकद तिच्यात आहे.

बदलत्या सामाजिक जबाबदाऱ्या

आधुनिक काळात स्त्रीच्या भूमिका वेगाने बदलत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया आत्मनिर्भर होत आहेत. पूर्वी ज्या क्षेत्रांमध्ये पुरुषांचे वर्चस्व होते, तिथेही स्त्रियांनी आपले स्थान निर्माण केले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, राजकारण, कला, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रिया महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळताना स्त्री आज 'मल्टिटास्किंग' झाली आहे. आजची स्त्री केवळ कुटुंबापुरती मर्यादित राहिलेली नाही तर ती उद्योजक, संशोधक, समाजसुधारक आणि देश चालवणारी नेतृत्वप्रवृत्ती बनली आहे. ती न्यायासाठी लढते, आपल्या हक्कांसाठी आवाज उठवते आणि अन्यायाविरुद्ध उभी राहते.

परंपरा आणि परिवर्तन यांचा समतोल आवश्यक आहे.



# मितभाषी अभिनेत्री रेवती अय्यर



अभिनेत्री रेवती अय्यर या छत्रपती संभाजीनगरच्या असून, त्यांचे संपूर्ण शिक्षण संभाजीनगर येथील सरस्वती भुवन कॉलेजमध्ये झालं. आपल्या नाट्य प्रवासाविषयी माहिती देताना त्या म्हणाल्या, मी कॉमर्सची विद्यार्थिनी होते. त्याच कॉलेजमध्ये दिलीप घारे हेही होते. ज्यांनी अनेक अभिनेते-अभिनेत्री घडवले. घारे सर स्वतः ही उत्तम अभिनेते असल्याने त्यांचे अनेक नाट्यप्रयोग मी बघितलेत. ज्यात त्यांचं गाजराची पुंगी हे माझं आवडतं नाटक होतं. मकरंद अनासपुरे हेही आमच्याच कॉलेजमधील विद्यार्थी होते. आमच्या कॉलेजातील अनेक मुलं-मुली आज कलाक्षेत्र गाजवीत आहेत. मलाही लहानपणापासून नाटकाची प्रचंड आवड होती, मात्र त्या वेळच्या आमच्या कौटुंबिक कारणास्तव मला नाटकाकडे दुर्लक्ष करीत शिक्षण पूर्ण करावं लागलं. पण लग्न झाल्यानंतर मी काही वर्षांपूर्वीचं नाशिकला स्थायिक झाले व आता मला कुटुंबातून संपूर्ण सहकार्य मिळाल्यानं मी माझ्या आवडत्या क्षेत्रात सामावून घेत राजेश शर्मा सरांच्या सुरभि थिएटरच्या माध्यमातून माझा खेळ मांडू दे.आषाढ का एक दिन. संध्या छाया. या माईलस्टोन नाटकातून प्रमुख भूमिका मला सादर करायला मिळाल्यात. प्रेक्षकांनीही प्रचंड प्रेम दिलं. याचबरोबर मी झी मराठीवरील तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं. सोनी मराठीवरील तुझं माझं सपान. सन मराठीवरील सावली होईल सुखाची या मालिका केल्या. आता मी एक हिंदी वेबसिरीज करीत असून, त्यासोबतच गाढवाचं लग्न या लोकप्रिय नाटकातील प्रसिद्ध गंगीची भूमिका साकारत आहे. आयुष्यात खूप काही शिकण्यासारखं असतं हे या क्षेत्रात काम करताना जाणवलं. या क्षेत्रात मला खूप चांगले कलावंत जवळून बघायला मिळाले, असे रेवती अय्यर म्हणाल्या.

शब्दांकन - सोज्वळ साळी

# महिला सबलीकरण... वास्तव व व्यथा

कुंदा बच्छाव शिंदे
शिक्षिका, नाशिक मनपा शाळा क्र. १८, आनंदवली. ९४२०६९५०६५

दरवर्षी ८ मार्च जागतिक महिला दिवस असो की, नवरात्रीचे नऊ दिवस या दिवशी जागर केला जातो तो स्त्रीशक्तीचा. आणि याच दिवशी किंवा या दिवसापुरतेच म्हटले तरी वावगे ठरणार नाही. समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरुवात केली जाते. या वेळी समाजाला प्रश्न विचारावासा वाटतो, या अशा अभियानांमुळे खरंच महिलांचे सबलीकरण होते काय ?

आज एकविसाव्या शतकात स्त्रीने स्वतःची शक्ती ओळखली आहे. ती आपल्या अधिकारांसाठी जगणे शिकली आहे, आजच्या स्त्रीने सिद्ध केले आहे की, स्त्रिया एकमेकांच्या शत्रू नाहीत तर सहकारी आहेत. स्त्री सशक्त आहे आणि ती तिच्या शक्तीची अभिव्यक्ती करू लागली आहे. स्त्रिया आता आपला आत्मसन्मान जपू लागल्या आहेत. त्याचबरोबर आपल्या घरातील व आजूबाजूच्या स्त्रियांचाही सन्मान त्या करू लागल्या आहेत. घराच्या संरक्षण कवचातून बाहेर येऊन तिने अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्वतःच मिळविले आहे. उच्च शिक्षणासाठी मुली लहान लहान शहरातून मोठ्या शहरांमध्ये येऊन राहणे, नोकरी करणे, आपली ओळख निर्माण करणे यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढीला लागला आहे. आत्मविश्वासाबरोबर आपले मत ठामपणे मांडू लागल्या आहेत. आपल्या देशातच काय तर विदेशात जाऊन त्या शिक्षण घेऊ लागल्या आहेत. आज लग्नासाठी वर पसंत करताना मुलींच्या मताला प्राधान्य दिले जात आहे. शिकून काय करणार शेवटी, त्यांना चूल आणि मूल तर सांभाळायचे आहे. अशा रूढी-परंपरा झुगारून देऊन लग्नाआधीच मुलींना उच्च शिक्षण देणे व त्यांना आत्मनिर्भर करणे ही मानसिकताही आता समाजात स्वीकारली जात आहे. आजची आधुनिक तरुणी स्वतः चा सन्मान करत अन्यायाच्या विरोध करण्याच्या परिणामांना न जुमानता अन्यायाचा विरोध करत आहे. आजची स्त्री खऱ्या अर्थाने सखी सहचारिणी बनली आहे. ती पतीची दु:ख वाटून घेऊन त्याला प्रत्येक सुखसुविधा मिळविण्यात बरोबरीने हातभार लावू लागली आहे. शिक्षित आणि घराबाहेर जाऊन कमावू लागलेली आजची आई मुलांप्रति अधिक जागृत आणि संवेदनशील बनली आहे. मुलांचे पालनपोषण करताना ती त्यांना निर्णय घेण्यातही भागीदार बनली आहे. मुले आपल्या आईच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगू लागले आहेत. आजची स्त्री खऱ्या अर्थाने सासर व माहेर संबंधी आपले कर्तव्य पूर्ण करत आहे. स्त्रीच स्त्रीची शत्रू असते हा कलंक देखील तिने पुसून टाकला आहे. सासू-सून यांच्यातील युद्ध आता फक्त टीव्ही मालिकांमधूनच पहावयास मिळत आहे. कारण आजच्या सासू-सुना एकमेकांच्या वैरी नाही तर मैत्रिणी बनल्या आहेत. म्हणजे आता स्त्रीला बिचारी समजण्याचा, अबला समजण्याचा काळ गेला आहे, असे म्हणायला हरकत नाही. आज स्त्रियांनी स्वतःच्या आत्मसन्मानाचा सन्मान केला तर तिच्या सबलीकरणासाठीच्या कुठल्याही अभियानाची गरज पडणार नाही.



# तुझ्या उत्तुंग भरारीपुढे... गगनही ठेंगणे भासावे

ज्योत्स्ना पाटील
उपशिक्षिका सातपूर

आज ८ मार्च जागतिक महिला दिन स्त्रियांचा सन्मान करण्याचा दिवस आपल्या देशात साजरा केला जातो. आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. कृषीतंत्राची निर्मिती करणारी आद्यराणी युवती, देशाला शांतीचा आणि जगाला क्रांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध आपणा सर्वांना माहीतच आहे. परंतु यांच्या मागे संयमाचा महामेरू म्हणून उभे टाकलेली महाराणी यशोधरा, तेराव्या शतकात जिथे महिला मुक्तीचा महिला क्रांतीचा अशा शब्दांचा लवलेशही नव्हता तिथे महिला पुढे येते आणि म्हणते.. डोईचा पदर आला खांद्यावर भरल्या बाजारी जाईन मी... माझी विठ्ठल भक्ती मी करणार आहे. मला कोणी अडवू शकणार नाही असे म्हणणारी संतश्रेष्ठ जनाबाई, त्यानंतर एक आई जिने पाटील, देशमुख की या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन आपल्या दातृत्वाने, कर्तृत्वाने व मातृत्वाने आपल्या महाराष्ट्राला एक नव्हे तर दोन छत्रपती दिले अशा राजमाता राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ. क्रांतीची ढाल घेऊन उभ्या राहिल्या त्या अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामगिरीची कबर खोदली खरी पण त्यामागे पोलादी पंख म्हणून उभी राहिली ती माता रमाई आणि जिच्यामुळे आपण घडलो अशा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले.

अशा विविध महिलांचा वारसा लाभलेला आपला देश विविध रूढी-परंपरांना तडा देत आपल्या कार्यकर्तृत्वाने आजची पिढी घडविणारी महिला आपण आज बघत आहोत. याही व्यतिरिक्त आजची स्त्री आपले जीवन व्यतित करत आहे. त्याला जोड मिळाली ती आधुनिकतेची, आधुनिक विचारसरणी अवलंबून आजची स्त्री समाजप्रबोधन करताना आपल्याला दिसत आहे. आजची स्त्री अबला नसून सबला झालेली दिसते आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी होती आज तिच्या हाती राष्ट्रध्वजाची दोरी आपणास दिसत आहे. एक स्त्री माता, भगिनी, काकू, मावशी, नणंद, भावजय अशा विविध रूपे साकारताना त्याही पुढे जाऊन शिक्षिका, प्राध्यापिका, अंतराळवीर, बसचालक- वाहक, मेट्रो, विमान चालक, कला, क्रीडा, राजकीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रांत तिने गगनभरारी घेतलेली दिसते आहे. प्रत्येक यशस्वी पुरुष यामागे एक स्त्री असते. ती पुरुषाच्या मागे ढाल बनून ती उभी असते. आपले छंद जोपासा. तुम्ही ज्या क्षेत्रात असाल त्या क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवा. ईश्वराने जगात सुंदर काय बनविले असेल तर ती फक्त स्त्री आहे.

## महत्त्वाचे

### लासलगाव येथे श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रम

**लासलगाव : वार्ताहर**



शहरात होळी ते हनुमान जन्मोत्सव या काळात पंधरा दिवस श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षांपासून या सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. शहरातील विविध मंदिरांमध्ये हनुमान चालीसा पठण कार्यक्रम हा धार्मिक सोहळा संपन्न होणार आहे. शनिवार (दि. १५) रोजी श्री इच्छापूर्ती गणेश मंदिर, मंगळवार ( दि. १८) रोजी सर्वे नंबर ९३ आंबे माता मंदिर, शनिवार (दि. २२) रोजी लक्ष्मीनारायण मंदिर, मंगळवार (दि.२५) गणेशनगर येथील दुर्गा माता मंदिर, २९ मार्च श्री हनुमान मंदिर, ब्राह्मणगाव विंचूर, रविवार (दि.३०) बालाजी मंदिर, मंगळवार (दि. १) एप्रिल रोजी श्रीरामनगर येथील क्रांती चौक, शनिवारी (दि. ५) पिंपळगाव नजीक येथील हनुमान मंदिर, रविवारी (दि.६) श्रीराम नवमीनिमित्त बाबा अमरनाथ मंदिर, वेळ ४ वाजता, सोमवारी (दि. ७) श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर विद्यानगर, मंगळवार (दि.८) श्रीराम मंदिर टाकळी विंचूर, बुधवार (दि.९) साईबाबा मंदिर लासलगाव, गुरुवार दि. १० गणेश मंदिर गणेशनगर, हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखेरचा पाठ शनिवार (दि. १२) एप्रिल रोजी श्रीराम मंदिर येथे संपन्न होणार आहे. सर्व भाविकांनी दररोज रात्री ९ वाजता या श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

### केशव जाधव यांचा टाकळी (विंचूर) ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**लासलगाव : वार्ताहर**

नाशिक येथील गुरू आराध्य फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा मानाचा 'महाराष्ट्र कोहिनूर रत्न पुरस्कार' टाकळी (विंचूर) येथील निफाड तालुका शिवसेनेचे समन्वयक, ग्रामपंचायत सदस्य केशव जाधव यांना नुकताच मिळाल्याबद्दल टाकळी(विंचूर) ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. केशव जाधव यांनी लासलगाव, टाकळी (विंचूर)तसेच परिसरातील गावांत सामाजिक आणि विकासात्मक कार्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत 'महाराष्ट्र कोहिनूर रत्न' पुरस्काराने त्यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. या परिसरातील विविध विकास कामांसाठी तुम्ही हाक द्या, मी साथ देईल, त्याचबरोबर वस्ती तिथे रस्ता हाच आपला संकल्प असून, त्या अनुषंगाने आपण कार्यरत असू, असे प्रतिपादन केशव जाधव यांनी यावेळी केले. याप्रसंगी पंडितराव शिंदे, रावसाहेब जाधव, लक्ष्मण जाधव, देविदास केंदळे, संजय जाधव, ज्ञानेश्वर पवार, महेश पवार, संदिप शिंदे, सुदर्शन जाधव, अक्षय जाधव, दत्तात्रय जाधव, कार्तिक गांगुर्डे, दतू दखने, प्रदिप शिंदे, किरण शिंदे, तेजस केंदळे, अमोल देवरे, अमोल जाधव,चेतन जाधव, धनंजय जाधव,संकेत जाधव, ओम शिंदे, किरण पवार, कार्तिक पवार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### सारोळेथडी येथे हरिनाम सप्ताह




**निफाड : शहर प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील सारोळेथडी येथे ६४ व्या अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली असून, ११ रोजी सांगता होणार आहे. यावेळी ह.भ.प. वैष्णव म. जाधव, ह.भ. प. निवृत्ती म. चव्हाण, ह.भ.प. भगवान म. सावंत, ह.भ.प. शाम म. ठोंबरे, ह.भ.प. अर्जुन म. खाडे, ह. भ.प. रमेश म. वाघ, ह.भ.प. रघुनाथ म. खटाणे यांचे कीर्तन होणार आहे. तर काल्याचे कीर्तन ह. भ. प. सरकटे माऊली हिंगोली यांचे होणार आहे. ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ संजय म. शास्त्री, संगीत विशारद गणेश गुरुजी मृदंगाचार्य हरी म. धोगरड, अनिल महाराज, किसन महाराज, झेंडे महाराज, विवेकी शांतारामभाऊ नागरे, काकडा नानाभाऊ बैरागी, बाळासाहेब नागरे, पहारेकरी शंकर बापू निंबाळकर, भालदार चोपदार बाबूराव नागरे, निवृत्ती सूर्यवंशी, तान्हाजी नागरे असून, या सप्ताहाचे आयोजक ह.भ.प. गणपत बाबा नागरे आहेत.

### शिवसेनेच्या निफाड शहरप्रमुखपदी धारराव

**निफाड : शहर प्रतिनिधी**



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने नाशिक जिल्ह्यातील पेठ व निफाड तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत, अशी माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे. यामध्ये निफाड तालुक्यातील शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय धारराव यांनी निफाड तालुक्यातील शिवसेनेची विविध पदे भूषविली असून, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शिवसेनेच्या वरिष्ठ मान्यवरांनी त्यांची पुन्हा निफाड शहरप्रमुखपदी निवड केली आहे.

# १६ गाव पाणीपुरवठा योजनेसाठी सोलर प्लांटच्या कामाचा मार्ग मोकळा

**लासलगाव : वार्ताहर**

**लासलगाव-विंचूरसह १६ गाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेला घरघर लागलेली होती. कधी वीजबिलामुळे पाणीपुरवठा खंडित तर कधी पाइपलाइन नादुरुस्तीमुळे पाणीपुरवठा खंडित होत होता. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सदर कामांचा पाठपुरावा करून या योजनेच्या दुरुस्तीकामी मोठा निधी मिळवत सुमारे ६ कि.मी.पर्यंतची पाइपलाइन नवीन करण्यात आली. तसेच या योजनेच्या नांदूरमध्यमेश्वर येथील जॅकवेल दोन विद्युत मोटारींनी पाणी उचल करण्यासाठी १५० एच.पी.च्या दोन विद्युत मोटारी तर विंचूर येथील जलशुद्धीकरण केंद्रावरील ४० एच.पी.च्या असून, या विद्युत मोटारी असून, त्यांचे मासिक १३-१४ लाख रुपयांचे वीजबिल येत असते.**



> पाणीपुरवठा समितीला दर महिन्याला सुमारे १३–१४ लाख रुपये वीजबिल येत असल्याने ते भरण्यासाठी समिती अंतर्गत पाणी उचल करणाऱ्या ग्रामपंचायतींवर वीजबिल भरणा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. परंतु आता सोलर प्लांट उभारणीच्या कामाला वीज वितरण कंपनीकडून ना हरकत मिळाल्याने मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मोठा पाठपुरावा केला. सोलरचे काम झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात वीजबिलाची बचत होणार आहे.
>
> **–जयदत्त होळकर,** अध्यक्ष, १६ गाव पा.पु. समिती

पूर्वी शासनस्तरावरून ५० टक्के वीजबिल परतावा मिळत होता. परंतु राज्य शासनाने हे अनुदान देणे बंद केल्याने या सर्व रकमेचा भार समितीवर पडत आहे. त्याचा दुष्परिणाम समितीला पाणीपुरवठा करताना जाणवत आहे. तसेच यामुळे मोठ्या प्रमाणावर होणारे लिकेज आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला. जमा होणारी रक्कम आणि खर्च होणारी रक्कम यांचा ताळमेळ बसविणे अत्यंत जिकिरीचे झालेले आहे. या योजनेचे विज बिल भरण्यासाठी पाणी उचल करणाऱ्या गावांच्या इतर निधीवर त्याचा परिणाम जाणवू लागला होता.

दि. १ मार्च २०२५ रोजी वीज वितरण कंपनीकडून नांदूरमध्यमेश्वर येथील १६ गाव पा.पु. समितीच्या जॅकवेलजवळील जागेवर आणि विंचूर येथील जलशुद्धीकरण केंद्रावर सोलर प्लांट उभारणीकामी ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. त्या अनुषंगाने दि. ७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता मुकेश धकाते (यांत्रिकी), चारुदत्त भावे (उपअभियंता), १६ गांव प्रा.पा. पु. समितीचे अध्यक्ष जयदत्त होळकर, सचिव लिंगराज जंगम यांनी सोलरसाठी लागणाऱ्या जागेची पाहणी केली. तसेच लवकर सोलरचे काम करून द्यावे, असे समितीचे अध्यक्ष जयदत्त होळकर यांनी संबंधित ठेकेदार व अधिकारी यांना सूचना केल्या.



## वेफकोच्या चेअरमनपदी संजय होळकर बिनविरोध

### व्हा. चेअरमनपदी केदू बोरगुडे

**लासलगाव : वार्ताहर**

**हेजिटेबल अँड फ्रूट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी लि. (वेफको), लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक या सहकारी संस्थेच्या सन २०२५-३० या कालावधीसाठी संचालक मंडळाची बिनविरोध निवड एस. के. मुरडनर, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, निफाड यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

संस्थेच्या चेअरमनपदी संजय चांगदेवराव होळकर तर व्हा. चेअरमनपदी केदू पर्बत बोरगुडे यांची एकमताने निवड करण्यात आली तसेच संचालकपदी उत्तम सोमनाथ घोटेकर संचालक खेडलेझुंगे, रत्नमाला प्रल्हाद खडांगळे संचालिका रुई, अनिल संपतराव बोचरे संचालक देवगाव, सुनंदा आनंदराव घोटेकर संचालिका खेडलेझुंगे, शिवनाथ बाबूराव सदाफळ संचालक खेडलेझुंगे, विठ्ठलराव भिकाजी पालवे संचालक वेळापूर, अशोकराव दामोधर नागरे संचालक डोंगरगाव, किशोर चांगदेवराव होळकर संचालक लासलगाव, दशरथ निवृत्ती वावधाने संचालक मानोरी, नानासाहेब वाघुजी वाळूंज संचालक वाकद यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या सर्व संचालक मंडळाचे वेफकोचे संस्थापक अध्यक्ष चांगदेवराव होळकर, संस्थेचे व्यवस्थापक प्रमोद सुर्वे, मार्केटिंग मॅनेजर श्रीराम घाडगे, बाळासाहेब बोरसे, सतीश कुलकर्णी, ज्ञानेश्वर घोडे आदींनी अभिनंदन केले.

## हनुमाननगरला बिबट्याची दहशत कायम

### बिबट्याकडून शेळीचा फडशा

**विंचूर : प्रतिनिधी**

**येथून जवळच असलेल्या हनुमाननगर येथे बिबट्याने शेळीवर हल्ला करून फाडशा पाडला. हनुमाननगर परिसरात गेल्या महिनाभरापासून बिबट्या धुमाकूळ घालत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हनुमाननगर येथे दहा दिवसांपूर्वी दीपक गुंड यांच्या गायीच्या वासरावर हल्ला करून वासरू ठार केले होते.**

> हनुमाननगरला चार दिवस रात्रीचा वीजपुरवठा असतो. परंतु हनुमाननगर परिसरात सध्या बिबट्याचे हल्ले वारंवार वाढत आहे. त्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही. त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी किमान दीड महिना दिवसाचा वीजपुरवठा द्यावा.
>
> **ज्ञानेश्वर भडांगे,** हनुमाननगर

पुन्हा हनुमाननगर येथील शेतकरी भास्कर बाबूराव गुंजाळ यांच्या राहत असलेल्या मळ्यातील घराजवळून दि. ५ बुधवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून शेळीचा फडशा पाडला. हनुमाननगर परिसरात दररोज कोणत्याना कोणत्या शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे.

#### दिवसा वीजपुरवठा देण्याची शेतकऱ्यांची मागणी

हनुमाननगर परिसरात सध्या तीन दिवस दिवसा वीजपुरवठा असतो तर चार दिवस रात्रीचा वीजपुरवठा असतो. उन्हाळ्याचे दिवस असल्याने पिकांना पाणी जास्त लागत असल्याने पाणी भरणे होत नाही. त्यामुळे पिकांना रात्रीबेरात्री पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जावं लागतं. अशातच महिन्यापासून बिबट्याचे दर्शन परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांना झाल्याने तसेच शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर बिबट्याने हल्ले केल्याच्या घटना घडत असल्याने शेतकऱ्यांकडून दिवसा वीजपुरवठा देण्याची मागणी होत आहे.

## निफाड नगरपंचायतीला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**निफाड शहर : प्रतिनिधी**

नगरपंचायत कार्यालय निफाड येथे जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन विविध कामांचा आढावा घेतला. याप्रसंगी बैठकीमध्ये दैनंदिन कामकाज तसेच शहरात सुरू असलेले सर्व विकासकामे, नवीन पाणीपुरवठा योजना व नगरपंचायतीमार्फत देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबत सविस्तर आढावा घेऊन मुख्याधिकारी चौधरी यांच्याकडून माहिती जाणून घेतली. तसेच घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रकल्प व शहरातील अतिक्रमण याबाबत विविध विभाग यांना तात्काळ निर्देश देऊन सदरचे विषय मार्गी लावण्याबाबत आदेश देण्यात आले. सदर बैठकीदरम्यान, प्रांताधिकारी हेमांगी पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अमोल चौधरी व पोलीस निरीक्षक गणेश गुरव, निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, नगरपंचायत नगरसेवक साहेबराव बर्डे, किशोर ढेपले, देवदत्त कापसे, संदीप जेऊघाले, नंदकुमार कापसे आदी नगरसेवक तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

## कैलास बोराडे मारहाण प्रकरणातील आरोपींवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई करा

### सकल धनगर समाजाची तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी

**नांदगाव : प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यातील कैलास बोराडे यांना झालेल्या निर्दयीपणे मारहाणीची घटना गेल्या काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेचा चाळीसगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाने तीव्र निषेध व्यक्त करीत कैलास बोराडे यांना न्याय देण्याची मागणी चाळीसगावच्या तहसीलदारांना निवेदन देत केली आहे.**



भोकरदन तालुक्यातील अनवा येथील कैलास बोराडे यांची अत्यंत निर्दयीपणे माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. कैलास बोराडे यांना गरम सळईचे चटके संपूर्ण शरीरावरती देण्यात आले. संपूर्ण शरीर हे प्रचंड जखमामय झालेले आहे. सदरील घटनेचा व्हिडिओ बघितल्यानंतर अक्षरशः मनाला प्रचंड वेदना झाल्याशिवाय राहत नाहीत. सदरील प्रकार हा अत्यंत चीड येणारा आहे.

सर्व आरोपींना मोका कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात येऊन सदरील खटला हा जलदगती न्यायालयात चालविण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदरील कुटुंब हे अत्यंत गरीब असून, सध्या पीडित कुटुंब झालेल्या घटनेमुळे प्रचंड दहशतीखाली असून, सदरील कुटुंबीयांना पोलिस संरक्षण देण्यात यावे, कैलास बोराडे यांचा सर्व वैद्यकीय खर्च शासनाच्या वतीने करण्यात यावा, अशी मागणी चाळीसगाव येथील धनगर समाज तालुका युवा अध्यक्ष तथा शिवसेना प्रवक्ते विशाल धनगर याने चाळीसगाव येथील तहसीलदारांना निवेदन देत केली आहे. या निवेदनावर मारुती काळे, देवचंद साबळे, संजय गढरी, अनिल गायकवाड, विकास जाधव, किशोर रावते, दिलीप पाटील, संजय पाटील, सोमनाथ गढरी आदींच्या सह्या आहेत.



## मस्साजोगचे सरपंच देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

### येवल्यात शिवसेना 'उबाठा'चे धरणे आंदोलन

**येवला : प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, धनंजय मुंडे यांना सहआरोपी करण्यात यावे, शेतीपिकांना हमीभाव देण्यात यावा, या मागण्यांसाठी शिवसेना उबाठाच्या वतीने येवल्यात धरणे आंदोलन करण्यात आले.**

दरम्यान, शहरातील तहसील कार्यालयात उबाठा शिवसेनेच्या वतीने दोन तास धरणे आंदोलन करण्यात आले. शासनाने मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ फाशीची शिक्षा दिली पाहिजे तसेच कांद्याला हमीभाव दिला पाहिजे, अशी मागणी शिवसेना शहरप्रमुख संजय कासार, माजी तालुकाप्रमुख रतन बोरणारे यांनी बोलताना केली आहे. दरम्यान, येवला तालुका व शहर शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येऊन तहसीलदार आबा महाजन यांना निवेदन देण्यात आले. आगामी काळात तालुक्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाई समस्येबाबत उपाययोजना करण्यात याव्यात. मागण्या मान्य न झाल्यास उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शहरप्रमुख संजय कासार, ज्येष्ठ नेते वाल्मीक गोरे, झुंजार देशमुख, छगन आहेर, शहर उपप्रमुख पप्पू भुसे, अनंता आहेर, गणेश पेंढारी, युवासेना तालुकाप्रमुख संतोष गोरे, भाऊ भागवत, सुरेश कासार, किशोर पवार, मॉन्टी मथुरे, दिनेश पागिरे, हरिभाऊ साळुंके आदी उपस्थित होते.

## देशमुख हत्येप्रकरणी कसबे-सुकेणेत बंद

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ काल दि. ७ रोजी बाणगंगाकाठची बाजारपेठ असलेले कसबे-सुकेणे शहर सकाळपासून कडकडीत बंद होते. काल दिवसभर सर्व व्यवहार बंद ठेवून या गावाने कै. देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली.**




**कसबे-सुकेणे : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ कसबे सुकेणेत पाळलेला कडकडीत बंद.**

कसबे-सुकेणे शहरातील बस स्थानकाजवळील जंगम बाबा चौकात यानिमित्त शोकसभा घेण्यात आली. शोकसभेचे प्रास्ताविक धनंजय भंडारे यांनी केले. यावेळी सरपंच आनंदराव भंडारे, बाळासाहेब जाधव, माजी सरपंच मधुकर पाटील, इंदिरा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबूराव महाराज जाधव यांनी श्रद्धांजली वाहताना तीव्र भावना व्यक्त करत दिवंगत देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी, अशी जोरदार मागणी केली.

शोकसभेला शिवाजी भंडारे, रमेश जाधव, शंकरराव जाधव, संजय जाधव, भाऊराव शेटे, छबू काळे, रमेश उगले,राजेंद्र भंडारे,विष्णू भोज,रामनाथ भंडारे,रमेश उगले, उत्तमराव भंडारे आदींसह शहरातील सर्वपक्षीय व सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते. बाजारपेठ बंद काळात कसबे-सुकेणे पोलिसांनी या ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला.

## चांदवड नगरपरिषदेची थकबाकीदारांवर धडक कारवाई

### नगरपरिषदेने अनेकदा नोटीस देऊनही प्रतिसाद न दिल्याने पाऊल; एक दुकान सील

**चांदवड : वार्ताहर**

**चांदवड नगरपरिषदेने शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ रोजी शहरातील थकबाकीदारांविरुद्ध धडक कारवाई करत एका व्यावसायिक दुकानावर सील ठोकले. कै. रंजना लहानू साळवे यांच्या दुकानावर थकीत कर न भरल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.**



नगरपरिषदेने थकबाकीदारांना अनेकदा नोटीस बजावूनही त्यांनी प्रतिसाद न दिल्याने हे कठोर पाऊल उचलले आहे. शहरातील इतर थकबाकीदारांनीही आपली थकीत घरपट्टी आणि पाणीपट्टी तातडीने भरून नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी दिनेश सिनारे यांनी केले आहे. थकबाकी वसुलीसाठी नगरपरिषदेने विशेष पथक नेमले असून, यापुढेही सील, जप्ती आणि नळकनेक्शन खंडित करण्याची कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

तसेच नागरिकांच्या सोयीसाठी कर विभागाचे कार्यालय शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहे, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले आहे.

सदर कारवाईत मुख्याधिकारी दिनेश सिनारे, कार्यालयीन अधीक्षक सचिन कापडणीस, कर व प्रशासकीय अधिकारी विद्या साबळे, कर व प्रशासकीय अधिकारी आकाश पवार, लेखाधिकारी चेतन गांगुर्डे, लेखाधिकारी प्रशांत मगर, शैलेंद्र पवार, संदीप महाले, संजय गुरव, मुफिज शेख, संतोष सोदे, यशवंत बनकर, सुनीता शेजवळ, श्रावण कापसे, सोपान केदारे, बाबूलाल थोरात आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## निफाड इंग्लिश स्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांची शाळा

**निफाड शहर : प्रतिनिधी**

**निफाड इंग्लिश स्कूल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर उत्साहात. निफाड येथील निफाड इंग्लिश स्कूल विद्यालय येथे दहावी सन २०१० च्या बॅचच्या माजी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पुन्हा एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला.**

तब्बल पंधरा वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर पार पडला, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत गाऊन व कवायत करून झाला.

यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांना गहिवरून आले होते. १५ वर्षांपूर्वी शाळेत असताना अगदी लहान असणाऱ्या मुलांनी आज आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आपली ओळख निर्माण केल्याचे पाहून शिक्षकांना देखील विद्यार्थ्यांचा अभिमान वाटला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या अनेक आठवणी सर्वांसमोर व्यक्त केल्या.

गांवकरी



## महत्त्वाचे

### सिन्नरला तरुणाची आत्महत्या

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर शहरातील लाल चौकात राहणाऱ्या ३३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (दि.६) संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेत सार्थक अरुण गुजराती (३३) या तरुणाचा मृत्यू झाला. त्याने राहत्या घरात बेडरूममधील फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केली. नातेवाइकांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर याबाबत पोलिसांना माहिती दिली. त्याचा चुलतभाऊ विशाल किरण गुजराती यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिन्नर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### सात नंबर पाणी मागणी अर्ज भरण्यास मुदतवाढ द्यावी : आ. आशुतोष काळे

**वावी : वार्ताहर**



पाटबंधारे विभागाकडून गोदावरी डाव्या-उजव्या कालव्यांच्या अंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांना सात नंबर पाणी मागणी अर्ज दि.६ मार्च २०२५ पर्यंत भरण्याचे आवाहन केले होते परंतु काही शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत शेतकऱ्यांनी आपले सात नंबर पाणी मागणी अर्ज भरलेले नाहीत त्यामुळे सात नंबर पाणी मागणी अर्ज भरण्यासाठी मुदत वाढवून द्या, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाला दिल्या. गोदावरी कालव्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी उन्हाळी हंगामासाठी उन्हाळी हंगामी पिके, बारमाही उभी पिके, चारा पिके, ऊस व फळबागा आदी पिकांसाठी पाटबंधारे विभागाकडून जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतीसाठी सात नंबर पाणी मागणी अर्जावर पाणी देण्यात येणार आहे.त्यासाठी गोदावरी कालव्याच्या लाभधारक शेतकऱ्यांना सात नंबर पाणी मागणी अर्ज दाखल करण्यासाठी दि.६ मार्च २०२५ अखेर पर्यंत मुदत देण्यात आली होती. सदरची मुदत संपली असून पाटबंधारे विभागाकडून देण्यात आलेल्या कालावधीत अनेक लाभधारक शेतकऱ्यांनी पाणी मागणीचे अर्ज वेळेत भरलेले नाहीत. यामुळे अनेक शेतकरी आवर्तनापासून वंचित राहून त्यांचे नुकसान होणार आहे. उन्हाची वाढलेली तीव्रता पाहता लाभधारक सर्वच शेतकऱ्यांना शेतीसाठी आवर्तन मिळणे गरजेचे आहे. या बाबीचा पाटबंधारे विभागाने गांभीर्याने विचार करून सात नंबर पाणी मागणी अर्ज भरण्यासाठी १२ मार्च पर्यंत मुदत वाढ द्यावी, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागास दिल्या आहेत.

### दोडी प्राथ. शाळेतील विद्यार्थ्यांचा कलाविष्कार



**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दोडी बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने पालक-रसिक मंत्रमुग्ध झाले अन् विद्यार्थ्यांच्या कलागुणांवर बक्षिसांचा वर्षाव करत तब्बल ४० हजार रुपयांची रक्कम जमा झाली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभास माजी जिल्हा परिषद सदस्य निलेश केदार, सरपंच ज्योती भालेराव, माजी सरपंच नाथा मामा आव्हाड, माजी उपसरपंच दत्तू आप्पा दराडे, माजी उपसरपंच शरद वाघ, शालेय समितीचे उपाध्यक्ष सुदाम वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गीत, नृत्य, नाटिका अशा विविध प्रकारांनी पालक, रसिकांना मंत्रमुग्ध केले. पालकांकडून बक्षीस रूपात जवळपास ४० हजार रुपयांची रक्कम जमा झाली, ती विधायक कामांसाठी वापरली जाणार असे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप आव्हाड यांनी सांगितले. मनोरंजनातून विद्यार्थ्यांमध्ये खूप चांगले गुण रुजवण्यात आले म्हणून पालक खूपच आनंदित झाले. पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षक व शाळा समितीचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यात शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुदाम वाघ व सर्व सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### महिला दिनानिमित्त गडाख विद्यानिकेतनमध्ये आरोग्यविषयक मार्गदर्शन

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पंचाळे येथील सिन्नरभूषण सूर्यभानजी गडाख विद्यानिकेतन विद्यालयात मंगळवारी (दि.११) माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे सेक्रेटरी राजेश गडाख यांच्या मार्गदर्शनातून जागतिक महिला दिन निमित्त डॉ. वंदना सांगळे-खैरनार यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. आरोग्य हीच धनसंपत्ती या उक्तीप्रमाणे मुली शिक्षिका माता पालक यांचे आरोग्य चांगले राहावे विविध आजारांवर उपाययोजना व आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी याविषयी डॉ. वंदना सांगळे-खैरनार मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी सुनिता सूर्यभान गडाख तथा नानी व स्वातीताई राजेश गडाख कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिसरातील माता पालक यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्याध्यापक विलास पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नवनाथ थोरात, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रमुख प्रवीण शेलार आदींनी केले आहे.

# मूल्यमापन चाचणी वेळापत्रकाला मुख्याध्यापक संघाचा विरोध

## शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन; शिक्षकांपुढे पेचप्रसंग

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचणी २ परीक्षेचे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने(एस सी ई आर टी)जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार दिनांक ८ ते २५ एप्रिल या कालावधीत ही चाचणी परीक्षा घेण्यात येणार आहे. राज्य मंडळाच्या सर्वच शाळांतील परीक्षा एकाच वेळी घेण्यात येणार असल्याने या वेळापत्रकावर नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघ तसेच जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी आक्षेप घेतला आहे.**



याबाबतचे निवेदन माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी प्रकाश अहिरे यांना देण्यात आले आहे. परीक्षा एप्रिल अखेरीस होणार असल्याने या वेळापत्रकावर शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच स्तरातून आक्षेप घेण्यात आला असून,इतक्या उशिरा संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा झाल्यास दिनांक १ मे रोजी निकाल जाहीर करण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होऊन शाळा १ मे रोजी निकाल कसा जाहीर करणार,असा प्रश्न शिक्षण क्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे. एससीइआरटीने दिलेल्या सूचनांनुसार शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खाजगी अनुदानित शाळांमध्ये संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षेसाठी प्रथम भाषा,गणित, आणि तृतीय भाषा इ. विषयांच्या प्रश्नपत्रिका शासनाच्या वतीने पुरविण्यात येणार असून इतर व्यवस्थापनाच्या शाळांनी सर्व प्रश्नपत्रिका शाळा स्तरावर तयार करावयाच्या आहेत. याप्रसंगी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस.बी.देशमुख यांनी वरील परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत व्यथा मांडून सदर परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करून शाळांना निकाल तयार करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून देण्यात यावा.अशी मागणी मुख्याध्यापक संघाच्या वतीने केली आहे. या प्रसंगी जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी देखील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.या परीक्षेच्या वेळापत्रकाबाबतचे निवेदन माध्यमिक शिक्षण विभागाने त्वरीत शासनास पाठवून ग्रामीण भागात पाणी टंचाई, वाडया वस्त्यांवरून शाळेत येणारी मुलं या बाबीचा विचार करून वेळापत्रकात बदल करावे अन्यथा आंदोलन पुकारले जाईल . या वेळी मुख्याध्यापक संघाचे सचिव एस बी देशमुख, उपाध्यक्ष प्रदिप सांगळे , विस्तार अधिकारी पी यु पिंगळकर, रविन्द्र मोरे, मोहन चकोर, भागीनाथ घोटेकर , सी . पी . कुशारे, सचिन पगार, ए .के खालकर, निलेश ठाकुर, भाऊसाहेब शिरसाठ, चंद्रशेखर सावंत, सुभाष दळवी , एस के देवरे, प्रा .बी .ए . बंगाळ, बी . के नागरे, डॉ अनिल माळी, मनोज वाघचौरे,एम.डी.काळे मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उर्धुळ ते पैठण पायी दिंडी आजपासून

**दिघवद : वार्ताहर**

मोजे उर्धुळ ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी वै. सद्गुरू केरोबा महाराज यांच्या आशीर्वादाने व वै. अलंकाताई महाराज पंढरपूर व हभप भाऊसाहेब महाराज ठाकरे यांच्या प्रेरणेने दि. ८ ते २१ या कालावधीत पैठण येथे जाणार आहे. रोज सकाळी काकडा भजन, सायंकाळी हरिपाठ व रात्री मुक्कामी कीर्तनाचे व प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. ठिकठिकाणच्या नामवंत हभप भाऊसाहेब महाराज ठाकरे व हभप नामदेव महाराज गांगुर्डे, हभप स्वातीताई देवरे, शिवाजी महाराज खांगळ, विष्णू महाराज नवले, शंकर महाराज ठाकरे, शिवाजी महाराज ठाकरे, दत्तात्रय महाराज, सुनील महाजन, मंदाताई महाराज व कारभारी महाराज जाधव यांचे प्रवचन होणार आहे प्रथम मुक्काम साळसाणे येथे होणार आहे तर दिंडी प्रस्थान कातरणी, कासारखेडे, सायगाव, गारखेडा, झांबरगाव, कोरेगाव, बोरगाव मार्गे जाणार आहे. यावेळी विणेकरी सोपान महाराज नवले व समस्त भजनी मंडळ उर्धुळ हे उपस्थित राहणार आहे. दगुखुटे केशव ठाकरे, जयवंत महाराज खुटे, तुकाराम टेलर, सुकदेव गोवरणकर, निवृती ठाकरे, दत्तू ठाकरे, शिवाजी कुंटे, भास्कर खुठे, साहेबराव नवले, बाळू ठाकरे, रमेश चोळके, कैलास जाधव, हौसाबाई नवले, धामणे, हरी वाचव उर्धुळ भजनी मंडळ परिश्रम घेत आहे. या पायी दिंडीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन भाऊसाहेब महाराज व तुकाराम शिंदे यांनी केले आहे.

## अवकाळी पावसाच्या नुकसानीचे अनुदान मंजूर

**दिघवद :** दि. १३ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे चांदवड तालुक्यातील शेतीपिकांचे जे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार मदत जाहीर करण्यात आली आहे. चांदवड तालुक्यातील १०८ गावांमध्ये ४१७६४ बाधित शेतकऱ्यांसाठी ७१.३७ कोटी रक्कम मंजूर झालेले आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट हस्तांतरित केले जाणार आहे. त्यासाठी अशा शेतकऱ्यांची माहिती तहसील कार्यालयामार्फत पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहे. त्यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे या कालावधीत नुकसान झाल आहे, त्यांचे पंचनामे त्यावेळी करण्यात आले होते. अशा सर्व शेतकऱ्यांना अनुदान मंजूर झाले आहे.

# ठाम निर्धाराने प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला पोहचता येते

## नाशिप्रच्या महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय शोधनिबंध सादरीकरण परिषद

**सिन्नर : प्रतिनिधी**

**प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला तेच पोहोचू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात. एका स्त्रीचे शिक्षण म्हणजे अवघ्या कुटुंबाचे शिक्षण हे महात्मा फुले यांना समजले होते. त्यासाठीच त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा पुण्यात भिडेवाड्यात सुरू केली. स्त्री शिक्षणासोबतच अस्पृश्य समाजाच्या हक्कांसाठी आणि उद्धारासाठी महात्मा फुले यांनी मोलाचे कार्य केले, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागप्रमुख प्रो.डॉ. श्रुती तांबे यांनी केले.**



येथील नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने चिकित्सा सेतू अंतर्गत विद्यापीठस्तरीय शोधनिबंध सादरीकरण परिसंवाद कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष एम. जी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास व्यासपिठावर केटीएचएम कॉलेजचे माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. संजय सावळे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष बापूसाहेब पंडित, डॉ. उमेश शिंदे, प्रा. वाल्मीक इंदासे, डॉ. प्रवीण कांबळे, डॉ,विकास शेवाळे, प्रा. पंढरीनाथ शेळके, प्रा. किरण सुरवसे, प्रा. पूजा यादव आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. तांबे यांनी महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज व आजचे प्रश्न याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली तसेच आजच्या पिढीला महात्मा फुले यांचे विचार कसे प्रेरणादायी ठरतील याबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रो.डॉ. संजय सावळे यांनी महात्मा फुल्यांच्या सत्य शोधक चळवळीचा समाजाला किती फायदा झाला तसेच समाजात बदल घडवण्यासाठी आजच्या पिढीने त्यांचे विचार आत्मसात करणे किती गरजेचे आहे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. विनोद निरभवणे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. वर्षा गरगटे यांनी केला.या वेळी प्रगती अहिरे, कुलदीप वाघ, प्राजक्ता जाधव, (के. टी. एच. एम. नाशिक), पंडित देवयानी, (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अ.नगर) रोशन जाधव (के. व्हि. एन. नाईक कॉलेज, नाशिक) चंद्रकांत कडाळे (वणी कॉलेज), कार्तिकी गाडेकर, स्नेहा पाबळे, गायत्री थोरवट, देवकी जाधव (कला व वाणिज्य महाविद्यालय सिन्नर) नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे या जिल्ह्यांतील ४० विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांचे विचार व कार्य या विषयावर स्वतः तयार केलेल्या शोध निबंधाचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रा.धनश्री गांगुर्डे यांनी केले तर समाजशास्त्र विभाग प्रमुख तथा समन्वयक प्रा.महेश शिंदे यांनी आभार मानले. या कार्यशाळेसाठी नाशिक, अहील्यानगर व पुणे या जिल्ह्यांतील महाविद्यालयामधून ३० हून अधिक प्राध्यापक व १६४ विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्रा. सुनील गुरुळे, प्रा. कावेरी गोसावी, प्रा. रेखा वरंदळ, प्रा. राजश्री बागूल, प्रा. सोनाली केकान, प्रा. पायल जाधव प्राध्यापकेतर कर्मचारी सौ. दर्शना बिन्नर, संतोष डुंबरे, प्रमोद आंबेकर, योगेश गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## सिन्नर नागरी पतसंस्थेच्या ठेवीदारांचे ठिय्या आंदोलन मागे

**सिन्नर : प्रतिनिधी**

**येथील सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेच्या थकीत कर्जदारांकडून वसुलीची व लिलावाची प्रक्रिया सुरू झालेली असून, एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात वसुली करून ठेवीदारांच्या ठेवी देण्याचे आश्वासन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तथा अवसायक यांनी दिल्याने ठेवीदारांनी सोमवारी (दि.१०) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तथा अवसायक यांच्या कार्यालयात पुकारलेले एकदिवसीय ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले आहे.**

यासंदर्भात ठेवीदारांची पतसंस्थेचे अवसायक यांच्यासोबत नुकतीच बैठक पार पडली. संस्थेने वसुली मोहीम राबविली असून लिलाव प्रक्रिया देखील सुरु असल्याचे अवसायक यांनी सांगितले. या प्रक्रियेत ठेवीदारांनीही सहभाग घेण्याचे ठरवले आहे. तथापि मार्च महिन्यात वस्तूंची किंमत कमी-जास्त होत असल्याने ही प्रक्रिया एप्रिल महिन्यात राबविण्याचे ठरविण्यात आले. ठेवीदारांनी ७०-३० चा फार्म्युला न वापरता १०० टक्के ठेवी परत करण्याचा आग्रह धरला. अवसायक यांनी एप्रिल महिन्यात जोरात वसुली करुन ठेवी परत करण्याचे आश्वासन दिल्याने ठेवीदारांनी आंदोलन मागे घेतले. यावेळी दत्तात्रय डोंगरे, सुभाष जाजु, डॉ. जी. एल. पवार, राजेंद्र घोगे, दिनकर क्षत्रिय, मधुकर ससले, श्रीकांत गुजराथी, मालन इंदुरकर, पंढरीनाथ सांगळे, महादु जाधव, दिवाकर पवार, रामकृष्ण जाधव, भाऊसाहेब सांगळे, सुरेंद्र बैरागी आदींसह ठेवीदार उपस्थित होते.

# ठाणगावला बिबट्याची मादी जेरबंद

**ठाणगाव : वार्ताहर**



**सिन्नर तालुक्यातील ठाणगाव येथील बुरकुल पट्टी येथील गव्हाच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्याची मादी जेरबंद झाल्याची घटना शुक्रवारी (दि. ७) पहाटेच्या सुमारास घडली. दरम्यान, बिबट्या मादी जेरबंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याने परिसरात धुमाकूळ घातला होता.**

ठाणगाव - केळी रोडवर वास्तव्यास असलेले बाळासाहेब वसंत काकड हे वृध्द सकाळी फेरफटका मारत असताना त्यांच्यावर या बिबट्याने ७ दिवसांपूर्वी हल्ला केला होता. त्यात बाळासाहेब काकड जखमी झाले होते. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी पिंजरा लावण्याची मागणी केली होती. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर, वन परिमंडळ अधिकारी एस. पी. झोपे, वनरक्षक किरण गोरडे यांच्या मार्गदर्शनाली काकड यांच्या मालकीच्या गट क्रमांक ४४१ मधील गव्हाच्या शेतात पिंजरा लावला होता. पश्चिमेला डोंगराळ भाग असल्याने या भागात बिबट्याचा नेहमीच वावर असतो. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार वाढल्यामुळे शेतकरीवर्गात भीती निर्माण झाली होती. दरम्यान, शुक्रवारी पहाटे बिबट्याच्या डरकाळ्यांचा आवाज ऐकू येऊ लागला. बिबट्याची मादी अलगद पिंजऱ्यात अडकल्याचे स्थानिक शेतकऱ्यांच्या लक्षात आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. यावेळी वन कर्मचारी सूर्यभान पाटोळे, भारत गांगड, अजय गिरे, सखाराम मेंगाळ, काशिनाथ रावत यांनी पिंजरा उचलून वाहनाने मोहदरी घाटातील उद्यानात आणण्यास मदत केली. बिबट मादी अंदाजे दोन ते अडीच वर्षे वयाची असून, वैद्यकीय तपासणी केल्यानंतर नैसर्गिक अधिवासात सोडणार असल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



## चला जाणूया नदीला अभियानात म्हाळुंगीचा समावेश

### तहसील कार्यालयात आढावा बैठक

**सिन्नर : प्रतिनिधी**

**चला जाणूया नदीला या अभियानात म्हाळुंगी नदीचा समावेश करण्यात आला आहे. नदी संवर्धनाचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्या आराखड्यास लवकरात लवकर मान्यता मिळावी यासाठी तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात आढावा बैठक पार पडली.**

शासनस्तरावर प्रयत्न करून या आराखड्यास मंजुरी मिळावी यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन तहसिलदार देशमुख यांनी दिले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. डी.व्ही. रुपवते, तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे, वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, सहाय्यक गटविकास अधिकारी ढवळे, बांधकाम विभागाचे शिंदे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी म्हाळुंगी नदीचे जिल्हा समन्वयक डॉ. रुपवते यांनी चला जाणूया नदीला या अभियानांतर्गत जिल्हास्तरावर झालेल्या बैठकीची माहिती दिली. विभागीय आयुक्त प्रविण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, उपविभागीय वनपरिक्षेत्र अधिकारी शिरोळकर यांच्याकडे म्हाळुंगी नदी संवर्धनाचा आराखडा दिल्याची माहिती दिली. आराखडा मंजुरीसाठी सामूहिक प्रयत्न केल्यास तो लवकरात लवकर मंजूर होईल व त्यानंतर संवर्धनाचे काम हाती घेण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.



# सिन्नरला भैयाजी जोशींच्या मराठीविरोधी वक्तव्याचा निषेध

**सिन्नर : प्रतिनिधी**

**मराठी भाषेविरोधात गरळ ओकणाऱ्या आरएसएसचे ज्येष्ठ नेते भैयाजी जोशी यांचा सिन्नर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत विविध संघटनांनी निषेध नोंदवला.**

महाराष्ट्रात कायद्याचा धाक उरला नाही. एका बाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात असताना दुसरीकडे भैयाजी जोशींसारख्या व्यक्तींकडून याच भाषेची हेटाळणी केली जात आहे. त्यामुळे बेताल वक्तव्य करणाऱ्या लोकांना शासनाने लगाम घालावा, अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. महागाई, बेरोजगारी याकडे दुर्लक्ष करण्यासाठी शासनकर्त्यांकडून ठराविक मंडळींना पुढे करून महाराष्ट्र पेटवण्याचे काम केले जात असल्याचा आरोप यावेळी आंदोलनकर्त्यांच्या वतीने करण्यात आला.

या आंदोलनात सेवानिवृत्त नायब तहसीलदार दत्तात्रय वायचळे, सिटीचे तालुकाध्यक्ष हरिभाऊ तांबे, किरण कोथमिरे, सुधाकर गुळे, राष्ट्रसेवा दलाचे अजय शिंदे, बलराम भंडारी, साजिद खतीब, हिरामण तेलुरे, गौरव भडांगे, सिराज शेख, शरद लोणारे, गोविंद बाकळे, प्रकाश माळी, रवींद्र चौधरी, पवन भोळे, रवींद्र रणमाळे, नरेश पवार, मोहसीन शेख, चंद्रभान रोडे, रवींद्र गायकवाड आदींसह नागरिक उपस्थित होते.

# इन्स्पायर अवॉर्डमध्ये सिन्नर तालुक्यातील विद्यार्थ्यांचा डंका

## १८ विद्यार्थ्यांची निवड, प्रत्येकी १० हजारांचा पुरस्कार; गेल्या वर्षाच्या तुलनेत संख्या वाढली

**सिन्नर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक कल्पनांना प्रोत्साहन देऊन त्यांना संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात करिअर घडवण्यास मदत करण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या इन्स्पायर अवॉर्ड स्पर्धेत सिन्नर तालुक्याने यांना मोठी मजल मारली आहे. तालुक्यातील तब्बल १८ विद्यार्थ्यांची या इन्स्पायर अवॉर्डकरिता निवड झाली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या तब्बल तिपटीने वाढली आहे. इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झालेल्या या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजारांचा पुरस्कार दिला जाणार आहे.**

इयत्ता सहावी ते दहावीतील शालेय विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेतात. ऑनलाइन नोंदणी करून विद्यार्थी त्यात नावीन्यपूर्ण कल्पना सादर करतात. २०२३-२४ वर्षात तालुक्यातील ५ विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

मात्र यंदा तब्बल १८ विद्यार्थ्यांची निवड झाल्याने सिन्नरने नवा उच्चांक गाठल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे यांनी दिली.

यात शिवडे येथील जनता विद्यालयाचे चार, न्यू इंग्लिश स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी बाजी मारली. तर ब. ना. सारडा विद्याचा मोफत सय्यद या एकमेव सहावीतील चिमुकल्याची या अवॉर्डसाठी निवड झाली.

### या विद्यार्थ्यांची झाली निवड

अनिल हांडोरे ( भैरवनाथ विद्यालय शहा ), ओमकार झाडे (माध्यमिक विद्यालय, चिंचोली), धनश्री आव्हाड ( माध्यमिक विद्यालय, धुळवड), प्रताप कवटे, कार्तिक झाडे, सुरज फोडसे, साक्षी शेळके( जनता विद्यालय, शिवडे ), मुफिज सय्यद (ब.ना.सारडा सिन्नर), रेणुका आव्हाड ( माध्यमिक विद्यालय पाटोळे), प्रसाद देवकर ( माध्य. निऱ्हाळे), श्रद्धा कासार( पी. बी. मिठसागरे), प्रसाद भागवत ( जनता नायगाव), सार्थक खैरनार (देवपूर हायस्कूल, देवपूर), जयश्री क्षीरसागर (जि. प. वडझिरे), श्रावणी पाटील ( पाथरे हायस्कुल), कार्तिक सांगळे, कृष्णा आव्हाड, समाधान आव्हाड ( नू. इंग्लिश स्कूल दापूर).

Innovation in Science Pursuit for Inspired Research
inspire

विषय प्रमुख मंजुषा साळुंखे, विस्तार अधिकारी विजय बागुल, कैलास सांगळे यांचे मार्गदर्शन शाळांना उपयुक्त ठरले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचे शिक्षण विभाग व विज्ञान अध्यापक मंडळ, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन करण्यात आले.